आय / १२५

९क्र ५१७६
का/१६६

विजयसाहित्य

# संतति-नियमन

## ( शास्त्र आणि पध्दति )




प्रो० ना. सी. फडके

आ-१२
०१८२९

मुद्रक

गोपाळ बळवंत जोशी,

आनंद छापखाना, सदाशिव पेठ, पुणे.

# संतति-नियमन

[ शास्त्र आणि पद्धति ]

लेखक

प्रो॰ नारायण सीताराम फडके, एम. ए.

४

विजयसाहित्य, पुणें.

प्रथमावृत्ति ] [ ऑगस्ट १९२५

किंमत १ रुपया

प्रकाशक
अनंत सखाराम गोखले
१७ नारायण, पुणें.

पुढील पुस्तक

## पहांटेपूर्वींचा काळोख !

[ सामाजिक कादंबरी ]

लेखक

श्री० नारायण हरि आपटे

दिवाळीचे सुमारास सचित्र स्वरूपांत प्रसिद्ध होईल.

मुद्रक
अनंत सखाराम गोखले
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

# टीकाकारांस व विरोधकांस
## अर्पण.

विरोधकांच्या टीकेमुळेंच सत्य-तत्त्वांचा प्रसार
झपाट्यानें होतो. मग त्यांच्या ऋणाविषयीं
कृतज्ञ रहावयास नको काय ?

# प्रकाशकाचा खुलासा

श्रीयुत नारायण हरि आपटे यांची 'पहांटेपूर्वीचा काळोख' ही कादंबरी साहित्याचें चवथें पुस्तक म्हणून प्रसिद्ध करतां येईल अशी आमची अपेक्षा होती, व म्हणून त्याप्रमाणें वाचकांस आम्ही तसें आश्वासन दिलें होतें. परंतु कादंबरी पूर्ण होऊन वाचकांच्या हातीं देण्यास अजून कांहीं अवधि लागेल असें वाटल्यावरून प्रो० फडके यांचें हें पुस्तक वाचकांस आम्ही सादर करीत आहोंत. या पुस्तकाचा विषय आज प्रत्येकास अगत्याचा वाटत आहे, व प्रो० फडके यांनीं त्याचें प्रतिपादन अतिशय आकर्षक शैलीनें केलें आहे. आमच्या सर्व वाचकांस हें पुस्तक संग्राह्य वाटेल अशी आमची खात्री आहे.

'विजय साहित्या'च्या पुस्तकांबद्दल जनतेची वाढती सहानुभूति व व्यक्त होत असलेला आदर पाहून आम्हांस अधिक उत्साह वाटत आहे व त्याबद्दल आम्ही वाचकांचे सदैव ऋणी आहोंत.

**व्यवस्थापक**

# संतति-नियमन

## [ शास्त्र आणि पद्धति ]

### प्रकरण पहिलें

### संकटाची सावली

> कांहीं वर्षांपूर्वी एक अमेरिकन गृहस्थ हिंदुस्थानची सफर करून परत स्वदेशीं गेले असतां एका वर्तमानपत्राच्या प्रतिनिधीनें त्यांची मुलाखत घेतली, व 'हिंदुस्थानांतील कोणत्या गोष्टी तुमच्या नजरेंत विशेष भरल्या' असा त्यानें त्यांस प्रश्न केला. तेव्हां ते गृहस्थ उद्गारले,
>
> " हिंदुस्थानांतील हिमालय पर्वत, तेथील दारिद्य आणि तेथील अर्भकांची मृत्युसंख्या या तीन गोष्टी मी कधींच विसरणार नाहीं. तिन्हीही सारख्याच अजस्त्र आहेत !"

हे उद्गार सत्य नाहींत असें कोण म्हणेल? आमच्या देशांतल्या अर्भकांच्या मृत्युसंख्येच्या प्रमाणासारखें प्रमाण पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्या तरी देशांत असेल काय? आमच्या दुर्दैवी हिंदुस्थान देशाच्या शिरगणतीचे रिपोर्ट पाहिले म्हणजे दुःखानें हृदय दुभंगून

जातें. १९२१सालच्या रिपोर्टावरून पहातां मुंबई वगैरे मुख्य शहरीं बालकांच्या मृत्यूचें प्रमाण पुढें दिल्याप्रमाणें आहे. मुंबई शहरांत दर हजारीं ५५६, कलकत्त्यांत ३८६, रंगून येथें ३०३, मद्रासमध्यें २८२, कराचीस २४९, आणि दिल्ली येथें २३३ बालकें एक वर्षाचीं व्हावयाच्या आधींच मृत्युमुखीं पडतात. म्हणजे मुंबईत दर दोन मुलांपैकीं एक मूल वर्षाच्या आंतच नष्ट होतें. शहरांतील परिस्थिति विशेष वाईट असेल म्हणून शहरांसंबंधाचे आंकडे दृष्टिआड केले तरी सबंध देशाचे आंकडेही कांहीं कमी भयप्रद नाहींत. सन १९२१ च्या सेन्सस रिपोर्टांत स्वच्छ म्हटलें आहे कीं, 'ब्रिटिश इंडियामध्यें एकंदर मृत्युसंख्येपैकीं एक पंचमांश मृत्युसंख्या बालकांची असते, आणि एकंदर अर्भकांपैकीं एक पंचमांश पुरीं बारा महिन्यांचीं व्हावयाच्या आधींच इहलोक सोडून जातात.'

अर्भकांचीच गोष्ट कशाला? आमच्या देशांतील एकंदर स्त्री-पुरुषांच्या जीवितयात्रेची कहाणी तरी काय मोठी रम्य आहे! एकीकडे पाहिलें तर हिंदुस्थानची लोकसंख्या वाढत आहे. १८९१ सालीं ती २८,७३,१४,६२९ होती; ती सारखी वाढत वाढत १९२१ सालीं ३१,८९,४२,४८० पर्यंत येऊन पोंचली आहे. वर वर पहाणारास व बाह्य देखाव्यावरून विचार करणारास साहजिकपणेंच वाटेल, कीं ज्याअर्थीं हिंदुस्थानची लोकसंख्या तीस वर्षांत जवळ जवळ तीन कोटी सोळा लाखांनीं वाढली आहे, त्याअर्थीं त्या देशाचे लोक सुखी, दीर्घायुषी आणि आरोग्यसंपन्न असले पाहिजेत. परंतु वास्तविक स्थिति आज काय आहे? 'जगीं सर्वसूखी असा कोण आहे?' या श्रीरामदासांच्या उत्तरगर्भ प्रश्नांतील तात्त्विक खोंच सोडून दिली, आणि केवळ खायला प्यायला ज्याला पोटभर मिळतें तो 'सर्वसुखी' अशी व्याख्या गृहीत धरून हा प्रश्न विचारला, तरी त्याचें उत्तर हिंदुस्थानापुरतें नकारात्मकच द्यावें लागणार नाहीं

काय? सुखी व समाधानी वृत्तीची गोजिरी चमक आपल्या किती देशबंधूंच्या अगर भगिनींच्या चेहेऱ्यावर आपल्याला दिसते? आपल्या देशांतले किती लोक दीर्घायुष्याचा उपभोग घेतात? साठ सत्तर वर्षें जगणाऱ्या लोकांबद्दल आपल्याला कुतूहल वाटतें. चाळिसाची उमर ओलांडली, कीं माणूस आपली स्वतःची गणना म्हाताऱ्यांत करूं लागतो. ऐन तिशींतल्या तरुण स्त्री-पुरुषांना मृत्युलोकाच्या दरवाजाजवळ आपण आतां आलों असें वाटतें. इंग्लंडमध्यें माणसाची सरासरी आपेक्षित आयुर्मर्यादा ४८॥, ऑस्ट्रेलियांत ५९, जपानमध्यें ४३.९७ आहे, तर ती आपल्या हिंदुस्थानांत पुरी २३ ही नाहीं! आपल्या देशांत व त्या मानानें इतर देशांत वीस वर्षांवर जगणाऱ्या लोकांचें दरहजारी प्रमाण काय पडतें तें पहा.

२० वर्षांवर जगणाऱ्या स्त्री-पुरुषांचें दर १०००री प्रमाण

| | देश | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| १ | हिंदुस्थान | ४५१६ | ४५१९ |
| २ | आयर्लंड | ७७६७ | |
| ३ | नॉर्वे | ७७७० | ७९९७ |
| ४ | वेस्ट ऑस्ट्रेलिया | ७७२७ | ८००५ |

मृत्युसंख्येचें प्रमाण पहावें तों तें ऑस्ट्रेलियांत दर हजारीं १७॥; इंग्लंडामध्यें जवळ जवळ २०; जपानांत २२॥; तर येथें ४३॥ आहे! केवळ मृत्यूच्या भयंकर कल्पनेनें हें पमाण शोकप्रद वाटतें असें मुळींच नव्हे. मृत्यु भयंकर आहे किंवा नाहीं हा प्रश्न तत्त्ववेत्त्यांचा असला तरी विचारी माणसाला येवढें खचित कळतें, कीं मृत्यु कितीही भयंकर असला तरी अपरिहार्य आहे. निसर्गाचें तें

एक देणें आहे. तें दिल्यावांचून कोणालाही सुटका नाहीं. 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम् !' या वचनाची सत्यता पटवून द्यावयास कवींची गरज नाहीं. परंतु शोक वाटतो तो केवळ हिंदुस्थानची प्रजा मरते याबद्दल नव्हे तर वार्धक्यानंतर मृत्यु यावयाचा हा क्रम पार नामशेष होऊन, लहान तान्हीं मुलें, तरणेताठे पुरुष आणि तारुण्यांत नुकत्या प्रवेश करणाऱ्या पोरसवदा स्त्रिया यांच्या गळ्यांभोंवतींच मृत्यूचे निर्दय पाश पडतात हें पाहून शोक अनावर होतो.

आमच्या राष्ट्राच्या अवनत आरोग्याची कल्पना यावयास मृत्यु-संख्येचे आंकडेच पहावयास पाहिजेत, किंवा अर्भकांच्या व तरुण स्त्री-पुरुषांच्या हृदयभेदक प्रेतयात्राच दृष्टीस पडल्या पाहिजेत असें नाहीं. मरणाऱ्या लोकांची गोष्ट सोडून दिली, तरी जे जगतात त्यांची स्थिति काय मोठी आल्हाददायक आहे ? आपल्या राष्ट्राची शारीरिक संपत्ति दर पिढीगणिक कशी नाहींशी होत चालली आहे हें येथें नव्यानें सांगावयास नको. पुराणकालांतील स्त्री-पुरुषांच्या विशाल व सुंदर देहांचीं वर्णनें तर बाजूलाच राहूं द्या; परंतु नुकते तीनशें वर्षांपूर्वींच होऊन गेलेले ऐतिहासिक पुरुषदेखील आमच्या आजच्या शरीरसामर्थ्याच्या कल्पनेच्या मापानें आम्हांला कल्पित कथें-तील राक्षस वाटूं लागतात. आगरकर, चिपळूणकर, टिळक या माजी पिढीचें बौद्धिक तेज व शारीरिक बल आजच्या पिढींतल्या कर्त्या माणसांना सहज दिपवूं शकतें. आणि आज शाळा कॉलेजांतून तयार होत असलेली उदयोन्मुख पिढी पहावी तों ती या मंडळीहूनही कमी प्रतीची निपजणारशी भीति वाटल्यावांचून रहात नाहीं. शरीरसंपत्तीच्या दृष्टीनें प्रत्येक पिढी माजी पिढीला बरी म्हणवीत आहे, आणि आज सुमारें शंभर वर्षें चाललेली ही उतरती भांजणी अशीच पुढें चालूं राहिली तर आणखी दोन पिढ्यां-नंतर येणाऱ्या हिंदी स्त्री-पुरुषांची देहसंपत्ति कोणत्या प्रतीची असेल

याची कल्पना करणें फारसें अवघड नाहीं. 'कपाटवक्षाः परिणद्ध-कंधरः ।' अशा शब्दांनीं हिंदी लोकांचें वर्णन करण्याचा काळ पुरा लोपला याविषयीं यत्किंचितूही शंका नाहीं. आजच्या तरुण स्त्री-पुरुषांचें वर्णन करावयाच्या वेळीं चरकांतून निघालेल्या उसाच्या चिपाडासारखे हातपाय, खोल गेलेले डोळे, वर आलेल्या बरगड्या असल्या शब्दप्रयोगांचीच योजना करणें भाग पडेल. यामुळें अनेक प्रसंगीं असा विचार मनांत येतो, कीं या अधोगतीच्या उताराला लागलेलें आमचें राष्ट्र शेवटीं जाणार आहे तरी कोठें? स्वराज्याच्या कल्पना आम्ही मनाशीं मांडतों व त्या सत्यसृष्टींत आणण्यासाठीं राजकीय क्षेत्रांत तुंबळ युद्ध खेळावयास आमची तयारी आहे. पण स्वराज्य मिळविण्यासाठीं झटणाऱ्या प्रत्येक राष्ट्रांतील लोकांची शरीरसंपत्ति व लढाऊ सामर्थ्य अलौकिक प्रकारचें होतें अशी साऱ्या इतिहासाची साक्ष आहे. दीड दोन शतकांपूर्वीं मराठ्यांनीं जें स्वराज्य-वैभव उपभोगिलें त्याचीही हीच साक्ष आहे; व आज घटकेला राज्यक्रांतीचीं साधनें बदललीं आहेत, व हिंदुस्थानास स्वराज्य मिळावयाचें तें शांतताप्रधान क्रांतीनेंच मिळेल, असें क्षणभर गृहीत धरलें तरी स्वराज्यप्राप्तीनंतर स्वराज्यसंरक्षणासाठीं शारीरिक बळाची आवश्यकता उरणार नाहीं असें थोडेंच म्हणतां येईल? शारीरिक संपत्ति हें एक राष्ट्राच्या उन्नतीचें मुख्य साधन होय, हें लक्षांत ठेवून आपल्या देशाविषयीं विचार करूं लागल्यास हिंदुस्थान कांहीं शतकांनीं नामशेष होणार कीं काय अशीही दुष्ट शंका मनांत आल्यावांचून रहाणार नाहीं.

कोणी असें म्हणतील, कीं आपल्या देशांत मृत्युसंख्येचें प्रमाण सर्व देशांच्या प्रमाणापेक्षां अधिक दिसत असलें तरी तेवढ्यानें देश नष्ट होण्याची शंका बाळगण्याइतकें घाबरून जाण्याचें मुळींच कारण नाहीं. हिंदुस्थानची प्रजा आज दुर्बल झालेली आहे व उत्तरोत्तर

अधिक दुर्बल होत चालली आहे, आणि हिंदुस्थानांतील मृत्युसंख्याही फार आहे हें सर्व खरें; परंतु या गोष्टीचें फारसें भय मानण्याचें कारण नाहीं. हिंदी प्रजा नष्ट होण्याविषयींची शंका तर अगदींच वेडेपणाची आहे. कारण आपल्या देशांत मृत्युसंख्येचें प्रमाण अधिक असलें तरी त्याप्रमाणेंच जननसंख्येचेंही प्रमाण मोठें आहे. सेन्सस रिपोर्टांत मुंबई इलाख्यांतील १९१५ ते १९२० ची दरहजारी जनन-संख्येची सरासरी ३३·६६ व सबंद हिंदुस्थानची ३५·९७ दिलेली आढळते. एक रशियाची गोष्ट सोडली तर जननसंख्येचें इतकें मोठें प्रमाण दुसऱ्या कोणत्याच देशांत सांपडणार नाहीं. हिंदी प्रजेपैकीं मृत्युमुखीं पडणाऱ्यांची जागा अशा रीतीनें सारखी भरून निघतच असल्यामुळें हिंदी प्रजा नामशेष होण्याची भीति सर्वथैव अनाठायीं आहे. शिवाय १८९१ पासून १९२१ पर्यंत हिंदुस्थानची लोक-संख्या जवळ जवळ सव्वातीन कोटींनीं वाढली आहे. यावरूनही हिंदी राष्ट्राविषयीं काळजी करण्याचें कारण नाहीं हीच गोष्ट उघड होईल.

अशा रीतीचा युक्तिवाद एखाद्याला करावासा वाटेल; परंतु हा युक्तिवाद सर्वथैव चुकीचा आहे. या युक्तिवादांत कोणकोणत्या भ्रामक व तर्कशून्य कल्पना भरलेल्या आहेत त्याची खुलासेवार चर्चा आम्हीं पुढें एका प्रकरणांत करणारच आहोंत, तेव्हां या ठिकाणीं त्याचा संक्षेपतः विचार करूं. कोणत्याही देशाची विवक्षित काळची लोकसंख्येची वाढ जन्मांच्या प्रमाणांतून मृत्यूचें प्रमाण वजा देऊन ठरवावयाची असते, व या सामान्य गणिताच्या नियमा-प्रमाणें पहातां हिंदी प्रजेची संख्या वाढत असल्याचें दिसून येतें यांत संशय नाहीं. पण या बाबतींत केवळ दोन संख्यांची वजाबाकी केल्यानंतर कांहीं तरी संख्या शिल्लक रहाते कीं नाहीं येवढेंच पहाण्याचा प्रश्न नाहीं. एखाद्या देशांत खूप लोक मरतात व खूप लोक जन्मास येतात, व दुसऱ्या एका देशांत थोडेच लोक

जन्माला येतात पण मृत्यूचें प्रमाणही अगदीं थोडें असल्यामुळें त्या देशाच्या लोकसंख्येची वाढ पहिल्या देशाइतकीच आहे अशी कल्पना केली, व अशा दोन देशांपैकीं अधिक चांगली स्थिति कोणत्या देशाची आहे असा प्रश्न केला तर, सारासार विचाराच्या अनुरोधानें व सर्व शास्त्रांच्या तत्त्वानुसारही दुसऱ्याच देशाचें नांव घ्यावें लागेल. हिंदुस्थानांत मृत्युसंख्येचें प्रमाण फार आहे, पण जननसंख्येचें प्रमाणही मोठें असल्यामुळें एकंदर लोकसंख्येचें प्रमाण प्रतिवर्षीं वाढत आहे ही वरवर वाटते तशी समाधानाची गोष्ट मुळींच नाहीं. कारण अशा स्थितींत एकतर जगणारी प्रजा अतिशय हिणकस गुणांची असते; व लोकसंख्येची वाढ होतांना दिसते खरी, पण ती वाढ होण्यासाठीं व उरणाऱ्या प्रजेच्या कनिष्ठ आरोग्याची सुधारणा करण्यासाठीं राष्ट्राची शक्ति व संपत्ति इतकी खर्च होत असते कीं, तिकडे लक्ष दिल्यास या प्रकारांतील समाधान पार नाहींसें होऊन जातें.

सारांश, हिंदुस्थानच्या प्रजेची सद्यःस्थिति अत्यंत शोचनीय आहे, आणि आपण वेळींच सुविचार केला नाहीं तर कालांतरानें ही स्थिति सुधारण्याचें सामर्थ्य कोणत्याही उपायांत उरणार नाहीं. मग प्रश्न असा उत्पन्न होतो, कीं हिंदुस्थानची सध्यांची 'कुप्रजा' सुधारून पुढें येणारी पिढी 'सुप्रजा' या संज्ञेला पात्र होईल अशा-करितां कोणते उपाय करण्यासारखे आहेत ?

अशा उपायांचा विचार करूं लागल्यावर संततिनियमाचा मार्ग दृष्टीपुढें आल्याशिवाय रहात नाहीं, व हा मार्ग आचरणें श्रेयस्कर होईल किंवा नाहीं याविषयीं पूर्ण चर्चा करणें आवश्यक आहेसें वाटूं लागतें.

परंतु संततिनियमन हा शब्द उच्चारल्याबरोबरच कांहीं लोक एकदम बिथरून जाऊन असें विचारतील, कीं "अहो, पाश्चात्त्य देशांत माजलेलें हें नवें खूळ तुम्ही आपल्याही देशांत आतां पिक-

विणार कीं काय? असले विलायती वेडेचार आपल्या देशाला कधींही कल्याणप्रद होणें शक्य नाहीं. अहो, विवाहानंतर संभोग-सौख्य आणि संभोगानंतर संतति हा उचित क्रमच होय! आणि शिवाय या बाबतींत आमच्या शास्त्रकारांचें म्हणणें काय होतें तें पाहूं गेल्यास तेंही असल्या कल्पनांच्या विरुद्धच दिसेल!"

संभोगसौख्य हें विवाहानुषंगिकच होय, आणि संतति हें क्रम-प्राप्त विवाहफलच होय, या दोन्ही गोष्टींविषयीं कोणी वाद घेणार नाहीं. तसेंच विवाह करण्यामध्यें सुप्रजाजननाखेरीज दुसरा कोणताही हेतू स्त्री-पुरुषांच्या हृदयांत असतां कामा नये यांतही शंका नाहीं. आपल्या पूर्वजांचीं मतें पाहिलीं तर ती अशींच आहेत. 'ही माझी कन्या प्रजोत्पादनासाठीं मी तुला देतों' अशा मंत्रानें पित्यानें कन्यादान करण्याविषयींच शास्त्रकारांची आज्ञा आहे. त्याच-प्रमाणें विवाहहोम-प्रसंगीं वरानें वधूला उद्देशून जे मंत्र म्हणावेत अशी शास्त्राज्ञा आहे त्या मंत्रांचाही 'आपण उभयतां आतां प्रजो-त्पादन करूं' 'आपण पुष्कळ पुत्रांस जन्म देऊं' असाच मति-तार्थ असून, त्या प्रसंगीं देवांची प्रार्थना करण्यासाठींही 'या माझ्या पत्नीच्या ठिकाणीं दहा पुत्र जन्म पावोत' या व अशा अर्थाचेच मंत्र शास्त्रकारांनीं वराच्या तोंडीं घातले आहेत. अर्थात् या सर्व गोष्टींवरून हेंच उघड होतें, कीं विवाहित स्त्री-पुरुषांनीं आपल्या पोटीं शक्य तितकी संतति निर्माण होण्याची इच्छा करावी, असाच शास्त्रकारांचा अभिप्राय होता.

परंतु शास्त्रकारांचा अभिप्राय त्या प्रकारचा होता म्हणून आजही बहुप्रसवितेचाच उपदेश स्त्री-पुरुषांना करणें हितकारक होईल किंवा काय? शास्त्रकारांच्या काळांतील परिस्थिति आणि आजची परिस्थिति यांत कांहीं महत्त्वाचा भेद आहे किंवा नाहीं? भेद अस-ल्यास त्या भेदाच्या आधारावर बहुप्रसवितेच्या ऐवजीं संततिनियमना-

चाच उपदेश स्त्री-पुरुषांस करणें समर्थनीय ठरेल किंवा नाहीं? आणि संततिनियमनाचा उपदेश प्रथमदर्शनीं विवाहहेतूविषयींच्या प्राचीन कल्पनांच्या विरुद्ध दिसला तरी वास्तविक तो तसा नाहीं असें म्हणतां येईल किंवा नाहीं?–इत्यादि प्रश्नांचा विचार करणें अगत्याचें आहे.

पहिली गोष्ट ही, कीं प्राचीन काळीं शास्त्रकारांनीं बहुप्रसविता प्रशस्त मानली होती, याचें कारण तेव्हां ती खरोखरच समाजाच्या कल्याणाची होती. मानवी सुधारणेच्या प्राचीन अवस्थेंत असा एक काळ असतो, कीं तेव्हां कोणत्याही समाजास आपलें अस्तित्व आणि वर्चस्व कायम ठेवावयाचें असेल तर इतर समाजांशीं युद्ध करून त्यांना जिंकण्याची तयारी त्यास नेहमीं ठेवावी लागते. या कारणानें समाजाचा अंतर्गत एकोपा आणि मनुष्यबळ हीं ज्या ज्या गोष्टींनीं वाढतील त्या सर्व गोष्टींचा अंगिकार करण्याचें धोरण त्या समाजास ठेवावें लागतें. या काळास युद्धप्रधानकाळ असें नांव द्यावयास हरकत नाहीं. आपले शास्त्रकार ज्या काळीं होऊन गेले तो अशा प्रकारचा युद्धप्रधान काळच होता. त्यामुळें समाजाचें मनुष्यबळ वाढणें त्यांस इष्ट वाटणें अगदीं साहजिकच होतें, व त्या दृष्टीनें विवाहित स्त्री-पुरुषांच्या पोटीं अधिक संतति झाल्यास 'अधिकस्याधिकं फलम्' असें त्यांस वाटून बहुप्रसवितेचा प्रकार त्यांनीं प्रशस्त मानला यांत नवल नाहीं. श्रुतींच्या काळांत आपले आर्य पूर्वज नुकतेच इकडे येऊन व अनार्य लोकांवर प्रभुत्व स्थापित करून वसाहत करून राहूं लागले होते ही कल्पना जर खरी असली तर अशा झटापटीच्या वेळीं त्यांना आपल्या स्वतःच्या समाजाचें संख्याबल वाढणें अगत्याचें वाटणें अपरिहार्यच होतें; व 'आम्हांस पुष्कळ गाई द्या', 'आम्हांस पुष्कळ पुत्र द्या' अशा प्रकारची त्यांनीं देवाची प्रार्थना केल्याची साक्ष कित्येक वेदऋचांवरून पटते हें ठीकच आहे. श्रुतींनंतर

शास्त्रकारांच्या वेळीं ही परिस्थिति बहुतांशीं अशाच स्वरूपाची होती. समाजाचें संख्याबळ वाढेल तितकें वाढणें इष्टच नव्हे तर अतिशय जरूरीचें होतें. त्या वेळीं आपल्या देशाची लोकसंख्या किती होती त्याचा आंकडा कोठें सांपडण्यासारखा नाहीं. पण त्या आंकड्याची स्थूल कल्पना करण्यासाठीं एक मजेदार विचारसरणी आपल्याला पतकरतां येण्यासारखी आहे. १८९१ पासून १९२१ पर्यंतच्या तीस वर्षांत हिंदुस्थानची लोकसंख्या किती प्रमाणांत वाढत गेली आहे तें दर्शविणारे सेन्सस रिपोर्टांतील आंकडे पुढें दिले आहेत.

हिंदी लोकसंख्येची वाढ

| वर्ष | लोकसंख्या |
|---|---|
| १८९१ | २८७,३१४,६७१ |
| १९०१ | २९४,३६१,०५६ |
| १९११ | ३१५,१५६,३९६ |
| १९२१ | ३१८,९४२,४८० |

यावरून असें दिसून येतें, कीं गेल्या तीस वर्षांत आपल्या देशाची लोकसंख्या ३,१६,२७,८०९ इतक्यानें, म्हणजे तीन कोटी सोळा लाखांनीं वाढलेली आहे. म्हणजे आपली लोकसंख्या प्रतिवर्षीं सुमारें दहा लाखांनीं वाढत जाते. तेव्हां कोणत्याही वर्षांतील आपली लोकसंख्या त्याच्या पुढच्या वर्षींच्या लोकसंख्येंतून दहा लाखांचा आंकडा वजा दिला असतां निघेल अशी कल्पना आपण बसविली व इतिहाससंशोधकांस शास्त्रकारांचा जो काळ मान्य असेल त्या काळापर्यंत आपण गणित मांडीत गेलों तर त्या काळच्या लोक-संख्येचा अंदाज म्हणून एखादा आंकडा आपल्याला पुढें करतां

येईल; परंतु हा सारा गणिताचा खेळ होईल. अशा गणितानें मिळणारा आंकडा विश्वसनीय समजावा असें प्रतिपादन करण्याचें आमच्या मनांत येणेंच शक्य नाहीं. या गमतीदार गणिताच्या संभवाचा उल्लेख करण्यांत आमचा हेतु इतकाच होता, कीं ज्या काळीं शास्त्रकारांनीं बहुप्रसविता प्रशस्त मानली आणि स्त्री-पुरुषांनीं बहुप्रसवितेचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवावें असा पर्यायानें उपदेश केला त्या काळांत लोकसंख्या अगदीं कमी होती व ती जितकी वाढेल तितकें समाजाचें कल्याण होण्यासारखें होतें ही गोष्ट वाचकांस पटावी. आर्य लोकांची वसाहत बहुतांशीं स्थिर झाली होती. ज्या देशांत त्यांनीं वसाहत स्थापन केली होती तो इतका विस्तृत असल्याचें त्यांना आढळून येत होतें, कीं हा देश म्हणजे एक स्वतंत्र 'पृथ्वीच आहे' असें त्यांचें वर्णन त्यांना करावेसें वाटत होतें. आपण जितके हात पाय पसरूं तितके पसरावयास अवकाश आहे अशी त्यांची खात्री होती. नैसर्गिक धनधान्याची इतकी समृद्धि होती, कीं 'देवा तुझें वैभव अमर्याद आहे! तें लुटतां लुटतां आम्ही थकून जातों!' अशा अर्थाचे उद्गार त्यांच्या तोंडून पुनः पुन्हा बाहेर पडत. सारांश, एखाद्या घराण्यांत सर्व प्रकारची रेलचल असून तिचा उपभोग घ्यावयास कोणी मूलच नसलें म्हणजे त्या घराण्यांतील पतिपत्नींना आपल्याला मुलेंबाळें व्हावीं अशी तीव्र इच्छा ज्याप्रमाणें होते त्याच प्रकारची इच्छा त्या काळच्या माणसांना व्हावी यांत नवल नाहीं.

पण आजची परिस्थिति तशी आहे काय? धनधान्याची समृद्धि असून तिचा उपभोग घेणाऱ्या लोकांची संख्या मात्र थोडी अशी स्थिति आज आहे काय? आपला समाज कितीही वाढला तरी त्याला सुखानें हातपाय पसरतां येण्यासारखे आहेत काय? आज आपल्या देशांत धनाची समृद्धि आहे काय? धान्याची समृद्धि आहे काय? लोकसंख्या कितीही वाढत गेली तरी तिचा भार सहन

करण्याची शक्ति आपल्या देशांत उरली आहे काय ? या सर्व प्रश्नांस कोणीही सूज्ञ माणूस नकारात्मकच उत्तर देईल. कारण, कोरडे आणि ओले दुष्काळ, धान्याची टंचाई, वस्त्रप्रावरणाची महागाई, आणि द्रव्याचा तर जवळ जवळ अभावच–हेंच आपल्या देशाच्या आजच्या स्थितीचें सगळयांत सार्थ वर्णन होईल हें आपल्यापैकीं प्रत्येकाला स्वानुभवानें आणि थोड्याशा अवलोकनानें पटलेलें आहे. आपल्या देशांत उत्पन्न होणारें धनधान्य परकी अमलामुळें परदेशांत रवाना होतें त्यामुळें आपल्या देशांतील प्रजेला पोटभर खावयास मिळत नाहीं असें एखाद्यास वाटण्याचा संभव आहे. पुष्कळ विचारवंत लोक ब्रिटिशराज्याची सदोषता दाखवितांना या प्रकारची विचारसरणी पुढें मांडतात. परंतु, या विचारसरणींत सत्याचा थोडासा अंश असला, आणि राजकीय चळवळ करणाऱ्यांना तिचें हत्यार उपयोगी पडण्यासारखें असलें तरी ती सर्वस्वी ग्राह्य नाहीं. कारण परकी राज्य जाऊन हिंदुस्थानांत स्वराज्य किंवा सुराज्य स्थापन झालें आणि देशांतील धनधान्य परदेशीं न जातां येथील लोकांच्या उपयोगासाठीं येथेंच रहावें अशी व्यवस्था झाली, तरी देखील तें एकतीस कोटी व त्याहीपेक्षां अधिक वाढत जाणाऱ्या लोकसंख्येच्या सुखासमाधानाला पुरेसें होईल असें समजतां येणार नाहीं. मालथस नांवाच्या गृहस्थानें तर अठराव्या शतकांत लोकांना सिद्ध करून दाखविलें कीं, आजपर्यंतच्या मनुष्यजातीच्या इतिहासावरून असें दिसतें, कीं कोणत्याही देशाची लोकसंख्या नेहमीं दुप्पट, चौपट, सोळापट अशा प्रमाणांत वाढत जात असून त्या देशाच्या निसर्गोत्पादित द्रव्यांचा सांठा मात्र दुप्पट, चौपट, आठपट अशा प्रमाणांत वाढत जातो; आणि या सिद्धांताचा इशारा देऊन त्यानें अखिल मानवजातीला उद्देशून लोकसंख्येची वाढ कमी करण्याविषयीं कंठरवानें उपदेश केला. मालथसच्या या सिद्धान्ताविषयीं आणि जन्म-

संख्या व मृत्युसंख्या यांच्या परस्पर प्रमाणाबद्दल जो सिद्धान्त विद्वन्मान्य झालेला आहे त्याविषयीं सविस्तर विवेचन या ठिकाणीं करण्यापेक्षां पुढील प्रकरणीं करणेंच आम्हांस अधिक सोयीचें वाटतें. परंतु प्रस्तुत मुद्दा इतकाच, कीं शास्त्रकारांच्या वेळच्या परिस्थितींत आणि आजच्या परिस्थितींत अत्यंत महत्त्वाचा भेद असल्या कारणानें त्यांनीं प्रशस्त मानलेली बहुप्रसविता आपण प्रशस्त न मानली तर तें समर्थनीयच ठरेल.

दुसरी गोष्ट अशी, कीं विवाहित स्त्री-पुरुषांस बहुप्रसवितेच्या ऐवजीं संततिनियमनाचा उपदेश करण्यांत विवाहाचा मूळ हेतू जो सुप्रजाजनन त्याच्याशीं विरुद्ध असा मार्ग आपण पतकरतों ही कल्पना खरी नव्हे. ही गोष्ट लक्षांत यावयासाठीं विवाहाचा हेतू नुसतें **प्रजाजनन** नव्हे तर **सुप्रजाजनन** होय हें वाचकांनीं कधींही विसरतां कामा नये. वर सांगितलेंच आहे, कीं प्राचीन काळची परिस्थितिच अशी होती, कीं वधूवर गुणसंपन्न असतील अशाविषयीं काळजी घेतली, कीं पुढच्या गोष्टींची चिंता वाटण्याचें कारणच नव्हतें. कारण अशा सत्पात्र वधूवरांच्या पोटीं येणारी संतति संख्येनें कितीही मोठी असली तरी तिला सर्व प्रकारचीं सुखसाधनें प्राप्त होतील याविषयीं लोकांना खात्री होती. संतति मूळ जन्माला येतांना गुणविशिष्ट असली म्हणजे पुढें खडतर परिस्थितीच्या अग्नींत ती दग्ध होईल असा संभवच कोणाच्या ध्यानीं मनीं त्या काळीं येत नसे. पण आज तशी परिस्थिति राहिलेली नाहीं. देशकालाचें मान अजीबात बदललें आहे. स्त्री-पुरुषांच्या पोटीं जितकी संतति निपजेल तितकी इष्टच आहे असें वाटण्यास आज कारण नाहीं. उलट देशाची मृत्युसंख्या दिवसानुदिवस वाढत चालली आहे हें आपणांस स्पष्ट दिसत आहे; आणि या अवाढव्य मृत्युसंख्येचें खरें मूलकारण अवाढव्य जन्मसंख्याच होय असें तज्ज्ञ लोकांचें सांगणें आहे. जन्मसंख्या व मृत्युसंख्या

यांचीं प्रमाणें परस्परावलंबी कशीं आहेत व कां आहेत त्याचा सांगोपांग विचार आपण पुढील प्रकरणांत करणारच आहोंत. सध्यां आपल्याला इतकेंच पहावयाचें आहे, कीं जन्मसंख्येचें प्रमाण जसजसें वाढेल तसतसें मृत्युसंख्येचें प्रमाण वाढत जातें, हा जर एक निसर्ग-सिद्ध नियमच असेल, तर अंध बहुप्रसविता हें कांहीं सुप्रजाजननाचें अमोघ साधन म्हणतां येत नाहीं. येंवढेंच नव्हे तर बहुप्रसवितेमुळें 'बहुप्रजा' निर्माण होईल. पण त्या प्रजेपैकीं बराच भाग अल्प-काळांतच मृत्युवश झाल्यावांचून रहाणार नाहीं. तात्पर्य, 'बहुप्रजा' व 'सुप्रजा' यांतील भेद आपण ओळखला पाहिजे. हा भेद ओळखला, आणि आजच्या परिस्थितींत स्त्री-पुरुषांनीं बहुप्रसवितेचें तत्त्व अंगिकारलें तर उत्पन्न होणारी प्रजा अवगुणी आणि अल्पायुषी अशी निपजेल हें ध्यानांत ठेवलें म्हणजे आज संततिनियमनाचाच उपदेश स्त्री-पुरुषांस केला पाहिजे हें प्रत्येकजण कबूल करील. विवाहाचा मूळ हेतू केवळ **प्रजाजनन** नसून **सुप्रजाजनन** आहे याची वाचकांस आम्ही पुन्हा एकदां आठवण देतों. म्हणजे आज संततिनियमन करावयास सांगणें हें त्या मूळ हेतूच्या विरुद्ध नसून त्या हेतूस पोषकच कसें आहे तें त्यांच्या चटकन् ध्यानांत येईल; आणि ज्या संकटाची सावली हिंदी प्रजेवर पडलेली आज स्पष्ट दिसत आहे तें निवारण करण्यास संततिनियमनावांचून गत्यंतर नस-ल्यास त्याविरुद्ध व्यर्थ अढी बाळगणें वेडेपणाचें होय हें त्यांस पूर्णपणें पटेल.

प्रकरण दुसरें

## संततिनियमनाचें अगत्य

जगांतील सर्व देशांत रशिया देश वगळला तर हिंदुस्थानाचाच नंबर जन्मसंख्येच्या प्रमाणांत पहिला लागेल असें सर्व आंकडेशास्त्रज्ञांचें मत आहे. हिंदुस्थानांतील दरहजारी जननसंख्येची सरासरी सेन्सस रिपोर्टांत ३९·९७ अशी दिलेली आढळते. या सरासरीइतकी सरासरी रशियाखेरीज करून कोणत्याच देशांत नाहीं. अर्थात् यावरून कोणीही साहजिकपणेंच असें अनुमान काढील, कीं इतर सर्व देशांपेक्षां हिंदुस्थानांतील लोकसंख्येची वाढ अधिक झपाट्यानें होत असली पाहिजे. परंतु वास्तविक प्रकार याहून फार निराळा आहे. निरनिराळ्या देशांत प्रतिवर्षीं लोकसंख्येची वाढ किती प्रमाणानें होते तें दर्शविणारें एक तुलनात्मक कोष्टक १८९१ सालच्या सेन्सस रिपोर्टांत दिलेलें आढळतें. त्यांतील निवडक भाग आम्ही वाचकासाठीं पुढें दिला आहे:—

लोकसंख्येच्या वार्षिक वाढीचें प्रमाण

| देश | वाढीचें प्रमाण | नंबर |
|---|---|---|
| न्यू साउथ वेल्स | ५·१० | १ |
| हिंदुस्थान | ०·९३ | २० |
| फ्रान्स | ०·०६ | २८ |

म्हणजे लोकसंख्येच्या वाढीप्रमाणें देशांचे नंबर लावले तर हिंदुस्थानाचा नंबर विसावा लागतो. हें पाहून असा प्रश्न उत्पन्न होतो,

कीं जननसंख्येच्या बाबतींत ज्या देशाचा नंबर पहिला आहे, आणि त्यामुळें वास्तविक लोकसंख्येच्या वाढींतही ज्या देशाचा नंबर पहिला असावयास पाहिजे त्याचा नंबर विसावा कां असावा? या प्रकाराचें कारण काय?

हें कारण शोधण्याच्या हेतूनें या विषयावरील अधिकारी लोकांचे ग्रंथ आपण वाचूं लागलों तर, केवळ जन्मसंख्येचें अजस्र प्रमाण म्हणजे देशाची भरभराट असें समीकरण मांडणें चुकीचें होय, असेंच त्या सर्वांचें मत असल्याचें आपणांस आढळून येतें. लोकसंख्येची वाढ ही केवळ जन्मसंख्येवर अवलंबून नसून जन्मसंख्येंतून मृत्युसंख्या वजा केली तरी जी बाकी उरते तिच्या प्रमाणावर अवलंबून आहे. हिंदुस्थानांतील जन्मसंख्येचें प्रमाण जसें विलक्षण तसेंच मृत्युसंख्येचेंही प्रमाण विलक्षण आहे. त्यामुळें वजाबाकीच्या वेळीं या दोन्ही मोठ्या प्रमाणांची काटाकाट होऊन आवशेष रहाणारी लोकसंख्या फारच थोडी असते. यावरून असें म्हणावयास हरकत नाहीं, कीं हिंदुस्थानाची लोकसंख्या वाढावी ही गोष्ट जरी इष्ट समजली तरी त्या कार्यासाठीं बहुप्रसविता हें साधन उपयोगी नाहीं. कारण प्रमाणाबाहेर बहुप्रसविता वाढली, कीं मृत्यूचें प्रमाणही तसेंच वाढतें आणि लोकसंख्येच्या वाढीचा हेतू साध्य होण्याऐवजीं असाध्यप्राय होऊन बसतो. मग, वास्तविक लोकसंख्या वाढणें इष्ट नसतांना बहुप्रसवितेचा मार्ग किती तरी पटींनीं त्याज्य नाहीं काय? शिवाय, एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे ती ही, कीं बहुप्रसविता आणि प्रजानाशबाहुल्य यांची काटाकाट होऊन लोकसंख्येची वाढ मंदगतीनें होणें हा प्रकार अतिशय घातक आणि समाजाच्या सामर्थ्याचा शोष करणारा आहे. कारण या प्रकारांत प्रजोत्पत्तीच्या कामीं समाजांतील स्त्री-पुरुषांच्या सामर्थ्याचा व्यय व्हावयाचा तो होतच असतो, आणि तो होऊन सशक्त, बुद्धिमान आणि दीर्घायुषी अशा

प्रजेचा लाभ मात्र समाजास होत नाहीं. कारण अशा प्रजेपैकीं बहुतेक प्रजा अल्पायुषी निपजून समाजाच्या उपयोगी पडण्याच्या आधींच तिचा नाश होत असतो. शिवाय असलीं अल्पायुषी मुलें जन्मलीं म्हणजे तीं जोंपर्यंत जिवंत असतात, तोंपर्यंत त्यांची हरप्रकारची काळजी घेण्याविषयीं आईबापांस दक्षता ठेवावी लागते. त्यांच्या अन्नासाठीं, कपड्यालत्त्यासाठीं, औषधपाण्यासाठीं आईबापांचा पैसा व त्यांचे शारीरिक श्रम खर्च होतच असतात. अर्थात् अप्रत्यक्षपणें एकंदर समाजाचें द्रव्यबळ व शरीरबळ या अल्पायुषी प्रजेवर व्यतित होतच असतें, आणि ही प्रजा मृत्युवश झाली, कीं हें सारें बल सत्कारणीं लागण्याऐवजीं अगदीं फुकट गेलें असेंच समजणें भाग असतें. सारांश, या दृष्टीनें आपल्या देशांतील सध्यांची बहुप्रसविता अत्यंत दुष्परिणामकारक आहे. या बहुप्रसवितेमुळें लोकसंख्या वाढावयास नको आहे ती वाढते ही पहिली गोष्ट; शिवाय लोकसंख्येची जी थोडी वाढ होते तिच्यासाठीं समाजाचे श्रम आणि द्रव्यही भलत्याच प्रमाणांत खर्च होऊन वायां जातात ही दुसरी; व असल्या क्रमामुळें समाजांत अनेक प्रकारच्या व्याधि मूळ धरून बसतात आणि प्रजेचा एकंदर नैसर्गिक दर्जाच निकृष्ट होत जातो ही तिसरी. असला समाज भरभराटीच्या स्थितींत असेल किंवा त्याच्या हातून कांहीं पराक्रम होतील अशी आशा करणें व्यर्थ होय. आंतून सडत चाललेला वृक्ष चांगला फोंफावेल व त्याचा खूप विस्तार होऊन त्याच्या शीतल छायेंत आपल्याला विश्रांति घ्यावयास सांपडेल अशी आशा करणें जितकें निसर्गनियमांच्या विरुद्ध आहे तितकेंच वरील प्रकारची आशा करणेंही अज्ञपणाचें होय. रूबिन नांवाच्या विद्वानानें ही गोष्ट अनेक प्रमाणांनीं सिद्ध करून दाखविलेली आहे. निरनिराळ्या देशांचे जन्मसंख्येचे व मृत्युसंख्येचे आंकडे गोळा करून आणि त्या त्या देशांच्या इतिहासांत वैभवाचे काळ कोणते होऊन

गेले त्याचा सूक्ष्मपणें अभ्यास करून त्यानें देशाच्या शारीरिक व मानसिक तेजाचा आणि तेथील जन्ममृत्यूच्या प्रमाणाचा संबंध जोडतां येण्यासारखा आहे, असें सिद्ध केलें. रूबिनचा सिद्धान्त असा आहे, कीं 'कोणत्याही देशाच्या मृत्युसंख्येच्या प्रमाणाचा वर्ग घेऊन त्याला जन्मसंख्येच्या प्रमाणानें भागिलें म्हणजे जो विभाग येईल तो त्या देशाच्या अंगच्या तेजाचा दर्शक समजावा.'

रूबिनचा हा सिद्धान्त तो म्हणतो तितका खरा ठरेल किंवा नाहीं ही गोष्ट निराळी. लोकसंख्येसारख्या विषयांत गणिताचा कांटेतोलपणा पतकरून हिशोब करतां येईल किंवा कांहीं सिद्धान्त मांडतां येतील किंवा नाहीं याविषयीं शंका वाटणें साहजिक आहे. परंतु रूबिनच्या गणिताचें पूर्ण सत्यत्व मान्य न केलें तरी इतकें आपल्याला कबूल केलेंच पाहिजे, कीं बहुप्रसवितेमुळें मृत्युसंख्येचें प्रमाण वाढतें आणि लोकसंख्येची वाढ व्हावी त्या गतीनें न होतां अगदीं कमी प्रमाणांत होऊन सुप्रजाजननास मात्र प्रतिबंध होतो, हा प्रकार केवळ यदृच्छेनें घडत नसून त्याच्यामागें निसर्गाचाच एखादा नियम असला पाहिजे.

अगदीं प्रथमावस्थेंतील पेशीपासून दर्जादर्जानें प्राणिजाति अस्तित्वांत येतात ही कल्पना गुणविकासवादाच्या अगदीं मूलसिद्धान्तापैकीं होय. या कल्पनेवरून हें उघड होतें कीं, खालच्या प्रतीच्या प्राण्यांच्या जीवनास जें जननप्रमाण सोयीचें असेल तें वरच्या प्रतीच्या प्राण्यांत नसेल. प्रथमावस्थेंतील पेशींची उत्पादनक्रिया पाहिली तर एक पेशी थोड्याच दिवसांत लक्षावधि पेशींस जन्म देते, पण या पेशीपासून पायरी पायरीनें वरच्या प्राण्यांच्या बाबतींत विकासवादाप्रमाणें उत्पादनक्रियेचा हा वेग कमी कमीच होत गेला पाहिजे आणि मनुष्य जर सर्व प्राण्यांत श्रेष्ठ असेल तर त्याची उत्पादनक्रिया सर्वांत मंद असली पाहिजे.

कोणत्याही प्राणिजातीची उत्पादनक्षमता अशी असली पाहिजे कीं, तीमुळें ज्या विशिष्ट परिस्थितींत ती असणार त्या परिस्थितींत तिचें संख्याबल जसेंच्या तसें कायम राहील, व ती नाश पावणार नाहीं किंवा उगीचच्या उगीच संख्येनें फुगणार नाहीं. विकासवादाची स्थूल कल्पना ज्याला आहे त्याला हें चटकन पटेल. पण याचाच अर्थ असा होतो, कीं कोणत्याही प्राणिजातीच्या ठिकाणचा 'जीवनाग्रह' (vitality) आणि त्या जातीचा उत्पादनवेग या दोहोंचें नेहमीं व्यस्त प्रमाण असतें. म्हणजे एखाद्या जातीचे जंतू दोन घटका जिवंत राहून मरणारे असे असले तर त्या जंतूंची उत्पादनक्रियाही अतिशय वेगानें चालत असते, आणि अशा क्रमामुळें त्या जंतूंची जाति नामशेष न होतां तिची परंपरा कायम टिकते. उलट एखाद्या जातींतील प्राण्यांचें स्वाभाविक आयुष्य बरेंच दीर्घ असलें व त्यांची उत्पादनक्रियाही वेगाची असली तर थोड्याच अवधींत ती एकच जाति प्रमाणाबाहेर संख्येनें फुगेल आणि इतर प्राणिजातीस तें एक संकटच उपस्थित होईल. ही आपत्ति टाळण्यासाठीं निसर्गानें अशी खुबीची योजना केली आहे, कीं अशा दीर्घायुषी प्राण्यांची उत्पादनक्रिया त्या मानानें मंद असावी. म्हणजे जसजसें मृत्युसंख्येचें प्रमाण कमी कमी होईल तसतसें जन्मसंख्येचें प्रमाणही कमी कमी व्हावें, अशी निसर्गाची व्यवस्था आहे. हा निसर्गनियम स्पष्ट करतांना डार्विन या शास्त्रज्ञानें आपल्या 'प्राणिजातींचा उगम' (Origin of species) या ग्रंथांत असें उदाहरण दिलें आहे, कीं 'कॉंडर नांवाचा पक्षी ज्या अवधींत दोनच अंडीं घालतो तेवढ्या अवधींत शहामृग वीस घालतो, तरी शहामृगापेक्षां कॉंडर पक्ष्यांचीच संख्या पहावी तों ती इतर किती तरी जातींच्या पक्ष्यांहून अधिक असल्याचें आढळून येतें. एखाद्या पक्ष्यानें खूप अंडीं घालणें याचा हेतु इतकाच दिसतो कीं त्या पक्ष्याच्या जातीचा मृत्यूकडून

जो सारखा नाश होत असतो त्याचा खड्डा भरून निघावा. आपल्या अंड्यांचें किंवा पिलांचें पूर्ण संरक्षण व संवर्धन करण्याची बुद्धि व शक्ति एखाद्या प्राणिजातीच्या ठिकाणीं असली म्हणजे उत्पादनक्रिया वेगानें न होतांही तिचें अस्तित्व भूतलावर कायम राहूं शकतें. पण एखाद्या प्राण्याचीं अंडीं किंवा पिलें जर झपाट्यानें नष्ट होत असतील तर उलट खूप अंडीं घालण्याचा गुण त्या प्राण्याच्या ठिकाणीं असणें अगत्याचें आहे; कारण, नाहीं तर त्या प्राण्याची जाति निर्मूलित व्हावयास विलंब लागणार नाहीं.

सारांश, कोणत्याही प्राणिजातीच्या बाबतींत जननप्रमाण व मृत्युप्रमाण यांचा मेळ असला पाहिजे हा विकासयोजनेचा मुळीं पायाच आहेसें दिसतें. कारण असा मेळ नसेल तर कांहीं प्राणिजाती भराभर नष्ट होत जातील, तर कांहीं भराभर वाढून इतर जातींना नाहींशा करून टाकतील,सुव्यवस्थित सूत्र मुळींच रहावयाचें नाहीं,आणि निकृष्टापासून उत्कृष्टाकडे असा प्राणिजातींचा प्रवाह सुरळीतपणें वाहणें अशक्य होऊन बसेल. म्हणूनच निसर्गानें असा नियम घालून दिलेला दिसतो कीं, प्राण्यांचा जीवनाग्रह ( capacity for survival ) आणि उत्पादन वेग यांचें नेहमीं व्यस्त प्रमाण असावें. या नियमाचा अधिक खुलासा करण्याचें कारण दिसत नाहीं. किंबहुना हा नियम इतका अबाधित असल्याचें सिद्ध झालें आहे, कीं जी जी प्राणिजाति आज पृथ्वीतलावर टिकाव धरून राहिलेली आपणांस दिसते तिच्याविषयीं खुशाल असें विधान करतां येईल कीं, तिच्या परिस्थितीच्या योगानें तिच्या अंगीं जो कांहीं जीवनाग्रह असेल त्याच्याशीं तिच्या उत्पादनवेगाचें व्यस्त प्रमाण असलेंच पाहिजे. चार्लस एडवर्ड पेल या ग्रंथकारानें असें एक उदाहरण दिलें आहे, कीं 'मोठा पिंगट उंदीर आणि लहान उंदीर अशा उंदरांच्या दोन जाती आहेत. यांपैकीं लहान जातीचे उंदीर आपल्या घरांत असले तरी आपण

फारसें मनावर घेत नाहीं, आणि मोठ्या पिंग्या उंदरांचा मात्र आपण विध्वंस करूं पहातों. लहान जातीच्या उंदरांची गोष्ट अशी आहे कीं, ते येवढेसे असल्या कारणानें कुठेंही शिरकाव करूं शकतात, आपल्या डोळ्यावर फारसे येत नाहींत, आणि अन्नाच्या लहानसहान तुकड्यांवरही त्यांची उपजीविका होऊं शकते. मोठ्या पिंगट उंदराला यांपैकीं कोणतीही सवलत मिळत नाहीं. याचा परिणाम असा होतो, कीं या उंदरांची जात जरी शरीरानें, सामर्थ्यानें आणि धूर्ततेनें सुद्धां लहान उंदरांपेक्षां मोठी आहे तरी तिचा उत्पादन वेग त्यांच्या वेगापेक्षां कमी असून चालत नाहीं.'

आणखी उदाहरणें देत बसण्याचें कारण नाहीं. येवढ्या विवेचनानें वाचकांची खात्री पटलीच असेल, कीं (१) एक तर मनुष्य हा सर्व प्राण्यांहून श्रेष्ठ प्रतीचा असल्यामुळें, त्याची आयुर्मर्यादा सर्वांहून अधिक असल्यामुळें, आणि बुद्धि व स्वसंरक्षणपात्रता या गुणांच्या योगानें जीवनाग्रहाची परमावधि त्याच्या ठिकाणीं झालेली असल्यामुळें, त्याची प्रसविता इतर सर्व प्राण्यांहून कमी असावी हेंच साहजिक होय; आणि शिवाय, (२) मानवी जातीच्या बाबतींतही **जन्मप्रमाण आणि मृत्युप्रमाण यांचा मेळ निसर्गाकडून ठेवला जात असला पाहिजे. म्हणजे हीं बरोबरच कमी व्हावयाचीं किंवा वाढावयाचीं असाच निसर्गाचा नियम असला पाहिजे.**

या दोन गोष्टींपैकीं पहिलीपेक्षां दुसरीच आपल्या प्रस्तुत विषयाच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाची आहे. कारण तिच्यावरून हें स्पष्ट होतें, कीं बहुप्रसविता ही नेहमींच सुपरिणामी असते असें नसून एका विवक्षित मर्यादेच्या पलीकडे तिच्यापासून मृत्युबाहुल्य व कुप्रजाजनन याखेरीज दुसऱ्या कशाचीच प्राप्ती होत नाहीं. कोणत्याही प्राण्याच्या ठायीं उत्पादनशक्ति निसर्गानें कशासाठीं ठेवलेली असते? तर त्या प्राण्याच्या जातीची **परंपरा कायम रहावी म्हणून.** अर्थात्, या

कारणासाठीं प्रसवितेचें कांहीं तरी एक विशिष्ट प्रमाण निसर्गानें योजलेलें असतें. या प्रमाणाला आपण 'निसर्गप्रमाण' म्हणूं. हें प्रमाण अबाधित असलें म्हणजे जन्म व मरण या दोन्ही गोष्टींचा योग्य मेळ बसलेला असतो, आणि ती प्राणिजाति सुव्यवस्थितपणें पृथ्वीवर नांदत असते, परंतु एखाद्या प्राणिजातीनें या प्रमाणांत ढवळाढवळ केली आणि उत्पादन कार्य वाजवीपेक्षां फाजील वेगानें सुरूं केलें तर निसर्ग त्या बंडखोरीची उपेक्षा करीत नाहीं. त्या जातीचें मृत्यु-प्रमाणही निसर्ग ताबडतोब वाढवितो आणि चलित झालेलें मूळ प्रमाण त्या उपायानें पुन्हा प्रस्थापित करतो. मानवी जातही या निसर्ग नियमाच्या अंमलाखालींच आहे. त्यामुळें कोणत्याही देशांत जन्म-संख्येचें प्रमाण अतिशय वाढलें कीं ताबडतोब निसर्गाच्या योजने-नुसार मृत्युसंख्येचें प्रमाणही तितकेंच वाढतें. हिंदुस्थानांतील जन्म-संख्येचेंच नव्हे तर त्याबरोबरच मृत्युसंख्येचेंही प्रमाण जगांतील सर्व देशांपेक्षां अधिक आहे, आणि लोकसंख्येची वाढ होण्याच्या बाबतींत मात्र हिंदुस्थानाचा क्रम विसावा लागतो हें सर्व निसर्गनियमांस अनुसरूनच कसें आहे याविषयीं वाचकांची आतां खात्री पटली असेल. जन्मप्रमाण व मृत्युप्रमाण हीं बरोबरच वाढावींत आणि कमी व्हावींत असा जर निसर्गाचा नियमच आहे व आपल्या देशांतील मृत्युसंख्येचें प्रमाण भयंकर वाढलें असल्याचें स्पष्ट दिसत आहे, तर हें प्रमाण कमी करण्याचा उपाय कोणता तें आतां आपल्याला समजूं नये काय? आपल्या देशांतील जन्मसंख्येचें मान कमी करणें हा एकच उपाय आपल्या देशाची सांप्रतची दुःस्थिति सुधारूं शकेल याविषयींची शंका बाळगण्याचें यापुढें कांहीं कारण आहे काय? म्हणूनच आपल्या देशाच्या सांप्रतच्या परिस्थितींत विवाहित स्त्री-पुरुषांस बहुप्रसवितेऐवजीं संततिनियमनाचाच उपदेश करण्याच्या इष्टतेविषयीं आतां सूज्ञ लोकांची एकवाक्यता व्हावयास लागली आहे.

बहुप्रसवितेमुळें मृत्युबाहुल्य आणि कुप्रजाजनन असे परिणाम निसर्गनियमानुसार घडवावयाचेच हें येथपर्यंत आम्ही स्पष्ट केलें. या बाबतींत आणखीही एक गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे. ती ही, कीं एकंदर मानवजातीचा विचार करणाऱ्या पंडितांची अशी खात्री झालेली आहे, कीं सध्यां ज्या प्रमाणांत प्रजाजनन होऊन मानवजातीची संख्या वाढत आहे तें प्रमाण जर असेंच चालू राहिलें तर कालांतरानें पृथ्वीच्या पोटांतून जितकें धनधान्य निघणें शक्य आहे तितकें काढलें तरी तें देखील अपुरें पडून माणसांना अर्धपोटीं रहावयाची आणि शेवटीं भुकेनें मरावयाची वेळ येईल, व मानव-जातीवरील हें भयंकर संकट टाळण्यासाठीं प्रजाजननाचें प्रमाण कमी करणें हेंच सर्व स्त्री-पुरुषांचें कर्तव्य आहे.

मानवी जातीवरील या आपत्तीचा इशारा स्पष्टपणें देण्याचें काम प्रथम मालथस यानें केलें. सन १७९८ च्या सुमारास त्यानें 'लोक-संख्येविषयीं' (Essay on population) या नांवाचा जो ग्रंथ प्रसिद्ध केला त्यांत त्यानें लोकसंख्येची वाढ कोणत्या तत्त्वानु-सार होत असते आणि त्या वाढीचे मनुष्यजातीच्या हिताहितावर कोणकोणते परिणाम होण्यासारखे असतात, या प्रश्नांचा अगदीं नवीन दृष्टीनें विचार केला, आणि या विचाराच्या आधारावर त्यानें जो एक मध्यवर्ति सिद्धान्त प्रतिपादिला त्यांतील नाविन्यामुळें आणि संकटसूचनेमुळें तर सारे लोक थक्कच होऊन गेले. मालथसनें असें प्रतिपादिलें कीं, 'लोकसंख्येची वाढ नेहमीं भूमितिश्रेढीनें होत असते आणि देशाची उत्पादक शक्ति गणितश्रेढीनें वाढत असते. म्हणजे कोण-त्याही देशाची लोकसंख्या दोनशेंची चार हजार, चार हजाराची एक अब्ज साठ कोटि अशी वाढत जाते आणि तेवढ्याच काळांत देशांत उत्पन्न होणारीं धान्य वगैरे उपजीविकेचीं द्रव्यें मात्र दोनशेंचीं चारशें, त्याचीं आठशें अशीं वाढत जातात. हेंच निराळ्या शब्दांनीं

सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल, कीं जेवढ्या अवधींत एखाद्या देशाची लोकसंख्या मूळ संख्येच्या आठपट वाढेल तेवढ्या अवधींत त्या देशांतील उपजीविकेचीं द्रव्यें सारीं चौपटीनेंच वाढतील. या दोन गोष्टींची वाढ अशा भिन्न प्रमाणांत व्हावी असा निसर्गाचा नियमच आहे ही गोष्ट सिद्ध करण्यासाठीं मालथसनें पुष्कळ देशांच्या लोकसंख्येचा अभ्यास केला व आपल्या ग्रंथांत अनेक प्रकारचा पुरावा पुढें मांडला; आणि या वाढीचें भिन्न प्रमाण सिद्ध करूनच तो थांबला असें नाहीं, तर त्याकडे बोट दाखवून तो लोकांना उद्देशून म्हणाला, "बाबांनो! या गोष्टीपासून बोध घेण्यासारखा आहे तो घ्या. तुम्ही खुशाल प्रजोत्पादन करीत आहांत खरें; पण त्याचे दूरवर परिणाम कोणत्या प्रकारचे होतील तिकडे तुम्ही लक्ष द्याल कीं नाहीं! तुम्ही प्रजोत्पादनाचा क्रम असाच निर्वेधपणें चालविलात तर भूमितिश्रेढीनें जगावरची लोकसंख्या वाढत जाईल, पृथ्वीवरचीं उत्पादक द्रव्यें मात्र गणितश्रेढीच्या मंदगतीनें वाढतील, एकंदर प्रजेच्या मानानें या द्रव्यांचा पुरवठा हलके हलके अपुरा पडूं लागेल, आणि शेवटीं अशी एक भयंकर वेळ येईल कीं, अन्नपाण्यावांचून तडफडत मरण्याखेरीज मानवी प्रजेला गत्यंतर उरणार नाहीं."

मालथसचें हें झणझणीत अंजन डोळ्यांत जातांच समाज खडबडून जागा झाला. समाजांतील स्त्री-पुरुषांच्या अनिर्बद्ध प्रजोत्पादन कार्याचा व लोकसंख्येच्या वाढीचा आणि एकंदर जगताच्या कल्याणाचा कांहीं निकट संबंध आहे कीं काय इकडे लक्ष देण्याचें पूर्वीं कोणाला कधीं सुचलें नव्हतें. पण मालथसचा ग्रंथ बाहेर पडल्यावर लोकसंख्येच्या विषयाकडे आणि प्रजाजननाच्या परिणामांकडे लोकांचें लक्ष चांगलेंच वेधलें गेलें. जो तो या विषयाचा विचार करूं लागला.

मालथसनें आपल्या सिद्धान्ताची मांडणी लोकांपुढें केल्याला आतां सवाशें वर्षें होऊन गेलीं आहेत. या अवधींत त्या सिद्धान्ताची सर्व

प्रकारें छाननी झालेली आहे. त्या सिद्धान्ताचें खंडण करणारे व मंडण करणारे अनेक पंडित होऊन गेले आहेत. या साऱ्या वादविवादाचा निष्कर्ष काढला, आणि मालथसच्या सिद्धान्ताविषयीं शास्त्रज्ञमंडळांत आज बहुमत काय आहे तें पाहिलें तर असें दिसतें, कीं ज्या स्वरूपांत मालथसनें आपला सिद्धान्त पुढें मांडला त्या स्वरूपांत आज तो कोणालाच मान्य नाहीं. लोकसंख्येची वाढ भूमितिश्रेढीनें होते ही मालथसची समजूत चुकीची असल्याचेंच आतां बहुतेक पंडित सांगतात. ती वाढ तशी व्हावी इतकी उत्पादनशक्ति मनुष्याच्या अंगीं संभवते हें खरें. पण या संभवाचें प्रत्यक्षांत रूपांतर होत नाहीं असा अनुभव आहे. शिवाय लोकसंख्येची वाढ भूमितिश्रेढीनें झाली, तरी धनधान्यांची वाढ मात्र गणितश्रेढीनें होईल ही मालथसची कल्पनाही भ्रामक आहे. कारण चार्लस पेल यांनीं आपल्या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें, 'जमिनीची मशागत करून तिच्यांतून धनधान्य काढण्याचें काम हें केव्हांही झालें तरी लोकच आपल्या हातांनीं करणार. लोकसंख्येची वाढ झाली म्हणजे अन्न खाणारीं तोंडें जशीं वाढतील तसेच अन्नासाठीं राबून काम करणारे हातही वाढतील यांत संशय नाहीं. अर्थात् लोकसंख्येबरोबर जवळ जवळ त्याच गतीनें उपजीविकेचीं द्रव्यें वाढावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं.'

सारांश, मालथसच्या सिद्धान्तांत अतिशयोक्तीचा अंश बराच आहे. किंबहुना मालथस स्वतःच एके ठिकाणीं म्हणतो, कीं 'धनुष्य एका बाजूला फारच वांकलेलें मला आढळल्यामुळें मलाही तें उलट बाजूला वाजवीपेक्षां फाजील वांकवावेंसें वाटलें.' प्रजाजननाविषयीं लोक अगदीं बेफिकिर आणि अंधदृष्टि बनलेले पाहून त्यांना झोपेंतून जागृत करण्यासाठीं मालथसनें आपला सिद्धान्त अतिशयोक्त स्वरूपांत पुढें मांडला हेंच खरें. पण मालथसनें स्वतः कबूल केलेली ही अतिशयोक्ति वगळली, तरी जो सत्यांश रहातो त्याचें महत्त्व कांहीं कमी नाहीं.

मानवी जात अन्नपाण्यावांचून तडफडून मरेल अशा प्रकारच्या ज्या एका भविष्यकाळाची कल्पना माल्थसनें केली, ती केवळ कल्पना-गम्यच असून इतकी निकराची अवस्था कधींच प्रत्यक्ष प्राप्त व्हावयाची नाहीं हें जरी खरें असलें तरी, आतां यापुढें बहुप्रसवितेचें ध्येय सोडून संततिनियमनाच्या धोरणानेंच जगांतील स्त्री-पुरुषांनीं वागलें पाहिजे हा माल्थसचा उपदेश ग्राह्य मानण्याविषयीं कोणाचेंच दुमत नाहीं. एडवर्ड ईस्ट या गृहस्थांनीं आपल्या 'आतां पुढें काय ?' (Mankind at the cross roads) या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत असे उद्गार काढले आहेत, कीं 'जगाच्या लोकसंख्येची वाढ कशी होत आहे, आणि त्या मानानें जगाची शेतीभाती व उपजीविकेच्या इतर द्रव्यांची उत्पत्ति यांची स्थिति काय आहे या गोष्टींचा सूक्ष्मपणें विचार करूं लागलें म्हणजे एखादे वेळीं असें वाटतें, कीं मनुष्यजातीच्या नाशाविषयींची माल्थसची भविष्यवाणी आपल्या हयातींत आपल्या डोळ्यांदेखत खरी होणार कीं काय कोण जाणे ! मनुष्यजातीपुढें आज दोन मार्ग आहेत–संततिनियमन करून आपल्यावरची अंतिम आपत्ति टाळणें, किंवा बहुप्रसवितेच्या भोंवऱ्यांत राहून प्रवाहाचे धक्के खात खालीं खालीं जाणें ! या दोन मार्गांपैकीं कोणत्या मार्गानें जावंयास आपण तयार आहोंत तें आपल्याला ठरवावयाचें आहे.

## प्रकरण तिसरें

# प्रत्यक्ष पुरावा व आक्षेपनिरसन

हिंदुस्थानची लोकसंख्या वाढावी अशी आपली इच्छा असती तरी त्या इच्छेच्या पूर्ततेसाठींदेखील बहुप्रसवितेचा मार्ग त्याज्यच ठरला असता; आज तर तशी इच्छा करण्यासारखीही परिस्थिति नाहीं; शिवाय बहुप्रसवितेमुळें मृत्यूचें प्रमाण वाढतें, समाजाच्या शारीरिक व द्रव्यबलाचा अपव्यय होतो आणि कुप्रजेची परंपरा सुरू रहाते; इत्यादि कारणांसाठीं सुप्रजाजननाविषयीं जर आपल्याला खरोखरच प्रयत्न करावयाचा असेल तर विवाहित स्त्री-पुरुष सत्पात्र असतील अशी खबरदारी तर आपण घेतलीच पाहिजे, पण शिवाय संततिनियमनाचें अगत्य पतिपत्नींच्या मनावर बिंबविलें पाहिजे हें आम्ही मागील प्रकरणांत विशद केलें. परंतु या गोष्टी स्पष्ट झाल्या-नंतरही कांहीं लोक कदाचित् म्हणतील, कीं संततिनियमनाचा मार्ग तात्त्विक चर्चेपुरता कितीही सुपरिणामी दिसला तरी त्याचा प्रथम प्रयोग आमच्या देशावर करून पहाण्याचें धाडस आम्ही करणार नाहीं. अशा लोकांची भीति दूर करणें सोपें आहे. प्रगमनशील पाश्चात्य लोकांनीं संततिनियमन प्रत्यक्ष आचरणांत आणून पाहिलें आहे, व त्याचें हित झालें किंवा नाहीं याचा पुरावा आपल्याला सहज मिळण्यासारखा आहे. या प्रकरणांत तो पुरावा प्रथम देऊन नंतर त्या बाबतींत उद्भवणाऱ्या दोन तीन आक्षेपांचें निरसन करण्याचें आम्हीं योजिलें आहे. संततिनियमनाचा प्रयोग ज्या राष्ट्रांनीं करून पाहिलेला आहे त्यांचीं उदाहरणें वाचकांनीं लक्ष्यपूर्वक पहावीं.

या बाबतींत इंग्लंडमधील परिस्थिति पहाण्यासारखी आहे. इंग्लंड-मधील जन्ममृत्यूच्या प्रमाणांच्या कोष्टकाचा कांहीं भाग पुढें दिला आहे.

इंग्लंडांतील जन्ममृत्यु

| वर्ष | जन्मप्रमाण | मृत्युप्रमाण |
|---|---|---|
| १८५३ | ३३·७५ | २३ |
| १८६३ | ३५·२० | २३·७५ |
| १८६६ | ३५ | २३·४० |
| १८७५ | ३५ | २३ |
| १८८६ | ३३ | १९·५० |
| १८९६ | ३०·१० | १९ |
| १९०६ | २६·२५ | १४·४५ |
| १९१६ | २४ | १३ |

यावरून पहिली गोष्ट उघड होते ती ही, कीं इंग्लंडमधील जन्मप्रमाणाची कमान १८९३ पासून १८७५ पर्यंत सारखी चढत होती, आणि त्यानंतर ती सारखी उतरत चाललेली आहे. याचें कारण काय? असा प्रश्न वाचकांच्या मनांत साहजिकपणेंच उभा राहील. या प्रश्नाचें उत्तर मोठें मनोरंजक आणि बोधप्रद आहे. आपल्या देशाच्या राजकारणांत ज्यांनीं बराच भाग घेतला त्या ॲनी बेझंट १८७५च्या सुमारास इंग्लंडमध्यें होत्या. त्या वेळीं संततिनियमनाची आवश्यकता त्यांना इतक्या तीव्रतेनें पटली, कीं केवळ संततिनियमनाचें तत्त्वच नव्हे, तर त्यासाठीं योजण्यासारखीं साधनें सुद्धां लोकांस माहीत करून देण्याचें त्यांनीं ठरविलें. कोणत्याही गोष्टीचा प्रसार करावयाचा झाल्यास तो ॲनी बेझंटबाई किती धडाडीनें करतात हें आमच्या वाचकांस नव्यानें सांगावयास नको. संततिनियमनसाधनांची माहिती लोकांस करून देण्याचें कार्य बेझंटबाईनीं किती

जोरानें सुरू केलें असेल त्याची कल्पना वाचक सहज करूं शकतील. या प्रचाराच्या कामांत 'ज्ञानफलें' (Fruits of Philosophy) नांवाचें एक चोपडें विकण्याचा त्यांनीं सत्याग्रह सुरू केला. सरकारनें हें चोपडें जप्त करण्याचें ठरवून त्याबद्दल न्यायकोर्टांत बेझंटबाई व त्यांचे सहकारी ब्रॅडलॉसाहेब यांच्यावर खटला सुरू केला. हा खटला १८७६ सालीं झाला. पण या खटल्यानें संततिनियमनाच्या कार्याची पिछेहाट होण्याऐवजीं सर्व देशाचें लक्ष त्या विषयाकडे वळलें. इतकेंच नव्हे तर बेझंटबाईंचा उपदेश लोकांना पटल्यामुळें त्यांनीं संततिनियमनाचा पुरस्कार आपल्या प्रत्यक्ष आचरणानें सुरू केला! कायद्याच्या आधारानें सत्य ढासळण्याऐवजीं अधिक बलिष्ठ होतें म्हणतात तें हें असें! असो.

१८७६ सालानंतर जन्मप्रमाणाची कमान इंग्लंडमध्यें सारखी कां उतरत गेली त्याचा हा खुलासा झाला. पण आपल्याला पहावयाचा तो मुख्य मुद्दा याहून वेगळाच आहे. १८७६ सालापर्यंत इंग्लंडमध्यें मृत्युप्रमाण कमीअधिक होत होतें, पण तें सारखें कमी होत जाईल अशीं चिन्हें मुळींच दिसत नव्हतीं. उलट, त्यानंतर तें अगदीं सारखें कमी होत गेलेलें स्पष्ट दिसतें. आणि याचा एक मोठा सुपरिणाम झाला आहे तो हा, कीं १९१६ सालचें जन्मप्रमाण जरी २४ इतकें कमी आहे तरी त्यांतून मृत्युप्रमाणाचा १३ हा आंकडा वजा देतां ११ ही जी लोकसंख्येची निवळ वाढ दिसून येते, ती ज्या सालीं जन्मप्रमाण ३३ च्याही वर होतें त्या १८९३ सालच्या वाढीहून अधिक आहे. त्याचप्रमाणें अर्भक-मृत्युसंख्येचें प्रमाण १८७६ च्या सुमारास सुमारें १९ होतें तेंही आतां १० पर्यंत खालीं आलेलें आहे, असें रजिस्ट्रार जनरलच्या रिपोर्टावरून दिसतें. सारांश, संततिनियमनाचें धोरण स्वीकारल्यामुळें इंग्लंडचें हितच झालेलें आहे.

जर्मनींतील आंकड्यांचीही साक्ष हीच असल्याचें खालील कोष्टका-वरून वाचकांस दिसेल.

जर्मनींतील जन्ममृत्यु

| वर्ष | जन्मप्रमाण | मृत्युप्रमाण |
|---|---|---|
| १८७६ | ४०·७५ | २७ |
| १८८१ | ४० | २७ |
| १८९१ | ३७ | २३·५० |
| १९०१ | ३५.२५ | २१ |
| १९०६ | ३३ | १८·७५ |
| १९११ | २९ | १७·२५ |

या आंकड्यांविषयीं अधिक लिहिण्याचें प्रयोजनच नाहीं. जन्म-प्रमाण जसजसें उतरत गेलें तसतसें मृत्युप्रमाणही कसें उतरत गेलें तें या कोष्टकावरून अगदीं उघड दिसण्यासारखें आहे.

आतां फ्रान्समधील आंकडे पहाः—

फ्रान्समधील जन्ममृत्यु

| साल | जन्मप्रमाण | मृत्युप्रमाण |
|---|---|---|
| १८६१–७० | २६·७५ | २३·२५ |
| १८७१–८० | २५·५० | २३·७५ |
| १८८१–९० | २३·९० | २२·५ |
| १८९१–१९०० | २२·५० | २१·५० |
| १९०१–१० | २१ | १९·२० |

इंग्लंडमध्यें संततिनियमनाचा पुरस्कार १८७६ नंतर सुरू झाला. पण फ्रान्स देशांत त्या पूर्वींच किती तरी वर्षांपासून लोक संततिनियमनासाठीं हेतुपुरःसर प्रयत्न करूं लागले होते. वरील कोष्टकावरून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक तर जन्मप्रमाणाबरोबरच मृत्युप्रमाणही खालीं आलेलें आहे; आणि दुसरें हें, कीं लोकसंख्येची निवळ वाढ पाहिली तर ती खुंटलेली आहे असें बिलकूल नसून ती चाळीस वर्षांपूर्वीं होती तितकीच आहे. शिवाय जन्मप्रमाण कमी होत गेल्याच्या या काळांत फ्रान्स देशांतील स्त्री-पुरुषांच्या आपेक्षित आयुष्याची मर्यादा वाढतच गेलेली आहे.

इतक्या उदाहरणांवरून जी गोष्ट आम्हांस वाचकांच्या मनावर ठसवावयाची आहे ती ही, कीं 'बहुप्रसवितेमुळें प्रजेची संख्या वाढते पण ती सारी कुप्रजा असते, आणि संततिनियमनानें वाढणारी लोकसंख्या सुप्रजा असते.'

आतां आणखी एकच उदाहरण घेऊं. तें हॉलंड देशाचें. या देशाचें उदाहरण कांहीं दृष्टींनीं फार महत्त्वाचें आहे. संततिनियमनाच्या कार्यक्रमास इतर बहुतेक पाश्चात्य राष्ट्रांतील सरकारांचा जबरदस्त विरोध आहे. अमेरिकेंत तर संततिनियमनाच्या कृत्रिम साधनांचें ज्ञान करून देणें गुन्हा या सदराखालीं येतें. हॉलंड देशांत मात्र सरकारची या कार्यास संमति असून तें कार्य करणारी Neo-Malthusian League नांवाची संस्था लोकहिताची संस्था म्हणून सन १८९९ पासून सरकारनें रजिस्टर केलेली आहे. याचा परिणाम साहजिकपणेंच असा झाला आहे, कीं इतर देशांत कृत्रिम साधनांचा उपयोग करून संततिनियमनाचा अंमल फक्त श्रीमंत व सुशिक्षित वर्गाकडूनच होतो तसें हॉलंडमध्यें न होतां गोरगरीबांपर्यंत देखील या ज्ञानाचा फैलाव होऊन त्यांजकडून तदनुसार आचरणही घडत आहे.

हॉलंडमधील जन्ममृत्यु

| साल | जन्मप्रमाण | मृत्युप्रमाण |
|---|---|---|
| १८७६ | ३७ | २३·२५ |
| १८८६ | ३४·२५ | २२ |
| १९०१ | ३२·२५ | १७ |
| १९११ | २८ | १२·२५ |

यावरून हॉलंडमध्यें जन्मप्रमाणाबरोबर मृत्युसंख्येचें प्रमाण किती झपाट्यानें खालीं उतरत गेलें तें दिसेल. येवढेंच नव्हे तर एकंदरीत हॉलंड देशांतील स्त्री-पुरुषांचें आरोग्यही झपाट्यानें सुधारल्याचा पुरावा हवा तितका सांपडतो. गेल्या पन्नास वर्षांत त्या देशांतील साधारण माणसाची उंची चार इंचांनीं वाढली आहे व शारीरिक सामर्थ्यही वाढलें आहे.

इतकीं उदाहरणें पुरेशी असून संततिनियमनापासून देशाचें किती हित होतें हें त्यांवरून वाचकांस पटलें असेल अशी आमची खात्री आहे.

परंतु संततिनियमन हें एक सुप्रजाजननाचें खात्रीलायक साधन असून त्याचा ज्या ज्या देशांनीं उपयोग केला आहे त्यांचें हितच झालेलें आहे असें आम्ही दाखविल्यानंतरही शंकितात्म्यांचे कांहीं आक्षेप उरण्यासारखे आहेत. त्या आक्षेपांचा विचार आपल्याला आतां केला पाहिजे.

पहिला आक्षेप असा, कीं कोणत्याही पतिपत्नींस संतति होणें न होणें, किंवा कमी अधिक होणें या सर्व गोष्टी सर्वस्वीं त्यांच्या दैवावर अवलंबून आहेत; पूर्वजन्मीं ज्या मानानें सुकृत केलें असेल त्या मानानें परमेश्वर त्यांना संतति देईल; दुपारच्या जेवणाचीही ज्यांना भ्रांत असते आणि आपली अब्रू झांकण्यापुरतेंही वस्त्र ज्यांना

मोठ्या कष्टानें मिळतें असल्या शतदरिद्री स्त्री-पुरुषांना अपत्यलाभाचें स्वर्गीय सुख भोगावयास मिळतें; आणि उलट जो आपल्या दारीं इंद्राचा ऐरावत देखील आणून उभा करूं शकेल, आणि ज्याच्या घरीं सुखसंपत्तीचा पूर वहात आहे अशा क्रोडोपतीनें हजारों नवस करून देवाजवळ भीक मागितली तरी त्याला अपत्याची प्राप्ति होत नाहीं. यावरून संतति ही केवळ परमेश्वरी इच्छेच्या आधीन असणारी गोष्ट होय हें उघड होतें. एखाद्या स्त्रीच्या नशिबीं अपत्यसौख्य लिहिलेलें नसलें म्हणजे डॉक्टरी इलाजांची, मांत्रिकांच्या अंगाऱ्या-धुपाऱ्यांची आणि उपासतापासांची परमावधि केली तरी तिच्या पोटीं संतान होत नाहीं; पण एखाद्या पतिपत्नींस दारिद्यामुळें किंवा इतर कांहीं कारणांनीं संतति नकोशी वाटली तरी त्यांच्या लिखितांत जेवढी संतति लिहिलेली असेल तेवढी त्यांस झाल्यावांचून रहात नाहीं. सारांश, संततीचा विषय सर्वस्वी परमेश्वरी सूत्राचा आहे, आणि त्या बाबतींत मनुष्यानें नियंत्रणाचा प्रयत्न करणें म्हणजे ईश्वरी सूत्र बदलण्याचा प्रयत्न करण्यासारखें आणि अतएव दुःसाध्य व हास्यास्पद आहे.

या दैववादजन्य आक्षेपांत अगदींच तथ्य नाहीं किंवा तो कोणालाच पटण्यासारखा नाहीं असें आम्ही म्हणूं इच्छित नाहीं. किंबहुना आम्हांस तर असें वाटतें कीं या आक्षेपांत असा कांहीं एक सत्यांश आहे, कीं त्यामुळें प्रथमदर्शनीं तो सर्वांनाच पटण्यासारखा वाटेल. ज्याच्या घरांत अठरा विश्वे दारिद्य आहे त्याला संतति नको असूनही होते, आणि ज्या राजवाड्यांत संततीसाठीं लोक तळमळत असतात तेथें ती जन्म पावत नाहीं, हा अनुभव अगदीं नेहमींच्या अनुभवांपैकीं आहे. परंतु या अनुभवावरून उपरिनिर्दिष्ट आक्षेप मान्य करून संततिनियमनाचा प्रयत्न व्यर्थ समजण्याचें मात्र कारण नाहीं. कारण, एक तर दरिद्री स्त्री-पुरुषांच्या पोटीं पुष्कळ मुलें येतात

आणि श्रीमंतांना अपत्यप्राप्तीसाठीं नवससायास करावे लागतात ही वास्तविक दैवाधीन गोष्ट नाहीं. तर हा निसर्गाचा एक नियम आहे. प्रजोत्पत्तीस अनुकूल अशी जी एक नैसर्गिक परिस्थिति असते तिचें स्थूल स्वरूप कशा प्रकारचें असतें तें शास्त्रज्ञांनीं निश्चितही केलेलें आहे; व त्यांनीं असें दाखविलें आहे कीं ही परिस्थिति दरिद्र्यांच्या संसारांत साहजिकपणेंच उत्पन्न होत असते. या निसर्गनियमाविषयींचा सविस्तर उहापोह आपण पुढील प्रकरणांत करूं. पण तोंपर्यंत आपणांस असें म्हणावयास हरकत नाहीं कीं अपत्यलाभाची गोष्ट वाटते तशी दैवाधीन नाहीं. ती निसर्गनियमानुसार होणारी गोष्ट आहे. आरोग्यहीन वातावरणांत रोग उद्भवणें हा जसा एक निसर्गाचा नियम आहे तसाच प्रजोत्पादनाचाही आहे; आणि निसर्गनियम कळल्यानंतर योग्य रीतीनें वागून रोगाचा प्रतिबंध करणें जसें शक्य आहे त्याचप्रमाणें जरूर ती सावधगिरी ठेवल्यास संततीचें नियमन करणें शक्य आहे असें म्हटल्यास तें योग्यच होईल.

शिवाय संतति ही सर्वस्वी पराधीन गोष्ट आहे असें क्षणभर गृहीत धरलें तरी संततिनियमनाचा यत्न करणें हास्यास्पद ठरत नाहीं. तसें म्हटलें तर आपल्या आयुष्यांतील कोणती गोष्ट दैवाधीन नाहीं? आपलें आरोग्य चांगलें राहणें, आपल्याला अनुरूप पत्नी मिळणें, आपल्याला आपल्या मनाजोगती व मोठ्या पगाराची नोकरी मिळणें— या व अशा सर्वच गोष्टी परमेश्वरी सूत्रावर अवलंबून असतात. दैववाद एकदां मान्यच केला म्हणजे तो मानवी आयुष्यांतील सर्व लहान मोठ्या गोष्टींना सारखाच लागू होतो. पण दैववाद मान्य करूनही प्रयत्नाला जागा उरतेच. आपलें आरोग्य ईश्वरी संकेतावर अवलंबून आहे आणि मरण ओढून आणावयाचें म्हटलें तरी शक्य नाहीं, व आलेलें टाळावयाचें म्हटलें तरी शक्य नाहीं, अशा प्रकारची ज्याची खात्री आहे तो मनुष्यदेखील पर्वताच्या एखाद्या कड्यावर

चढतांना डोळे मिटून बेफिकिरीनें न चालतां खबरदारीनेंच पावलें टाकीत चालेल. तसेंच आपल्या भालिखितांत जेवढी संपत्ति लिहिली असेल तिच्याहून एक कवडीदेखील ज्यास्त किंवा कमी आपल्याला मिळावयाची नाहीं अशी आपली बालंबाल खात्री असली तरी आपल्याला चांगली नोकरी मिळावी किंवा मिळालेल्या नोकरींत चांगली बढती मिळावी असे प्रयत्न आपण नेहमीं करीतच असतों. तसेंच एखाद्या मुलाची व मुलीची जन्मगांठ पडणें ही गोष्ट सर्वस्वी ईश्वरी नेमानेमाची आहे असा पूर्ण भरंवसा असणारे आईबापही आपल्या मुलीला शक्य तितकें चांगलें स्थळ शोधून काढण्यासाठीं झटत नाहींत काय? आणि असें आपण वागतों याचें कारण इतकेंच, कीं परमेश्वरी सूत्राच्या गोष्टींदेखील मानवी प्रयत्नाचें निमित्त पाहून घडत असतात. आम्ही दुसऱ्या एका ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें दैवाधीन गोष्टींचा प्रवाह आपल्यापुढें वाहत असतो खरा; पण आपल्या स्वतःच्या प्रयत्नाच्या भांड्यानें त्यांतील पाणी आपण भरून घेतल्याशिवाय तें आपल्याला मिळावयाचें नाहीं. आणि असें आहे तर संततिनियमनाचा प्रयत्न व्यर्थ व हास्यास्पद मानावयास अवकाश कोठून उरला?

दुसरा एक आक्षेप उद्भवण्यासारखा आहे तो असा, कीं विवाहित स्त्री-पुरुषांना संतति व्हावी हें मुळीं निसर्गप्राप्तच आहे, तेव्हां संततिनियमन हें निसर्गविरुद्ध होय. पण या आक्षेपाचें चटकन निरसन करतां येण्यासारखें आहे. कोणतीही गोष्ट कितीही नैसर्गिक असली तरी ती कांहीं एका विशिष्ट प्रमाणांत घडेल तोंपर्यंतच ती व्यक्तीला काय किंवा समाजाला काय हितकारक होते; आणि त्या प्रमाणाच्या बाहेर ती गोष्ट जाऊं न देणें हें अनैसर्गिक नसून उलट ती तशी जाऊं देणें हेंच निसर्गविरुद्ध समजलें पाहिजे. उदाहरणार्थ, माणसानें जेवणें व पाणी पिणें ही गोष्ट नैसर्गिक आहे; परंतु ती नैसर्गिकच असली तरी लोकांनीं पोट फुटेपर्यंत जेवावें किंवा आरोग्य बिघडेपर्यंत पाणी प्यावें

असें आपण म्हणूं काय? त्याचप्रमाणें विवाहित स्त्री-पुरुषांनीं संभोग-सौख्याचा उपभोग घ्यावा व प्रजोत्पादन करावें या दोन्ही गोष्टी निसर्गक्रमप्राप्त आहेत यांत किमपि संशय नाहीं. पण त्याबरोबरच आपण जी प्रजा निर्माण करूं ती सुप्रजा असेल व तिच्यामुळें समाजाचें कोणत्याही तऱ्हेचें नुकसान न होतां कल्याणच होईल अशी सावधगिरी ठेवून पतिपत्नींनीं संततिनियमन केलें पाहिजे यांत संशय नाहीं. आहारविहारादि आपले सर्वच व्यापार नैसर्गिक आहेत. परंतु समाजांत रहाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला या सर्व व्यापारांवर समाजहिताचें बंधन घालावेंच लागतें. आणि असें आहे तर स्त्री-पुरुषांनीं प्रजोत्पादनाच्या क्रियेवरही सुप्रजाजननाचें बंधन घालून तिचें नियमन केलें पाहिजे असें म्हणण्यांत वावगें तें काय आहे?

तिसरा आक्षेप उत्पन्न होण्यासारखा आहे तो असा, कीं प्रजोत्पादन ही एक इतकी पवित्र क्रिया आहे, कीं तिची उघड उघड चिकित्सा करणें आणि तिच्या नियमनाविषयीं लोकांना उपदेश करणें हा धार्मिक दृष्ट्या मोठा भ्रष्टाकार होय. परंतु या आक्षेपाला आमचे वाचक विशेषसें महत्त्व देतील असें आम्हांस वाटत नाहीं. प्रजोत्पादन ही क्रिया पवित्र आहे हें आम्हांसही मान्य आहे. किंबहुना ती अत्यंत पवित्र असून तिचे समाजाच्या हितावर दूरवर परिणाम होण्यासारखे आहेत याविषयीं इतर कोणापेक्षांही आमची अधिक खात्री आहे. परंतु ती क्रिया दीर्घपरिणामी व पवित्र असल्यामुळें तिच्याविषयीं कोणत्याही प्रकारचा विचार न करतां स्त्री-पुरुषांनीं ती अंधपणें व मनःपूत करावी ही विचारसरणी कोणत्या मुलखाची? प्रजोत्पादनाचे समाजावर अतिशय महत्त्वाचे परिणाम घडतात हें जर खरें, आणि समाजाची धारणा उत्तम प्रकारें करणें हें जर धर्माचें मुख्य कार्य, तर समाजांत सुप्रजा निर्माण व्हावी एतदर्थ स्त्री-पुरुषांनीं आपल्या संततीचें नियमन करणें किती आवश्यक आहे तें सांगण्यांत धार्मिक

दृष्ट्या भ्रष्टाकार कसा होणार ? उलट, स्त्री-पुरुषांस सुप्रजाजनाचें अगत्य पटून संततिनियमनास त्यांनीं प्रत्यक्ष आचरणानें प्रारंभ केला तर त्यांत खऱ्या धर्मदृष्टीच्या आणि नीतिदृष्टीच्या लोकांना आनंदच वाटावयास पाहिजे.

सारांश, संततिनियमन ही कोणत्याही दृष्टीनें गर्हणीय ठरण्यासारखी गोष्ट नाहीं. प्राचीन काळच्या परिस्थितींत व आजच्या परिस्थितींत जमीन अस्मानाचें अंतर पडल्यामुळें त्या काळीं बहुप्रसविता जशी इष्ट होती तशी आज नाहीं. शिवाय, लोकसंख्येची वाढ कमी करणें हा कांहीं संततिनियमनाचा उद्देश नाहीं. संततिनियमनाचें आचरण स्त्री-पुरुषांनीं केल्यास त्या देशांत जन्मप्रमाण खालीं जातें हें खरें, पण त्या देशांतील लोकसंख्येची वाढ खुंटते असें नाहीं. या प्रकरणाच्या आरंभीं दिलेल्या इंग्लंड वगैरे देशांच्या उदाहरणांवरून वाचकांस ही गोष्ट पटलीच असेल. पण महत्त्वाचा भेद हा, कीं बहुप्रसवितेमुळें जी लोकसंख्या वाढते ती कुप्रजा असते, आणि मागें आम्हीं सांगितल्याप्रमाणें तेवढ्या वाढीसाठीं समाजाच्या केवढ्या तरी शारीरिक व सांपत्तिक सामर्थ्याचा सारखा अपव्यय होत असतो; व उलट संततिनियमनामुळें हा अपव्यय टळतो, लोकसंख्येची जी वाढ होते ती सुप्रजा असते, आणि हॉलंडप्रमाणें त्या देशांतील आरोग्य आणि तेज हीं देखील झपाट्यानें वाढत असतात. संततिनियमनाचा पुरस्कार ज्या ज्या देशांत झालेला आहे त्या त्या देशांत त्याचे सुपरिणामच दिसून येत आहेत, इतकेंच नव्हे तर ज्या देशांत त्याचा अधिक प्रमाणावर व उघडपणें पुरस्कार झालेला आहे तेथें त्या सुपरिणामाचेंही प्रमाण अधिक असल्याचें स्पष्ट दिसत आहे. इतक्या सर्व गोष्टी सूर्यप्रकाशाइतक्या लख्ख दिसल्यावरही संततिनियमनाचें धोरण आपण स्वीकारलें पाहिजे याविषयीं कोणती शंका उरण्यासारखी आहे ?

प्रकरण चवथें

## संततिनियमनासाठीं ब्रह्मचर्य

सुप्रजाजननाच्या दृष्टीनें संततिनियमनाचें धोरण विवाहित स्त्री-पुरुषांनीं स्वीकारलें पाहिजे इतकें ठरलें. पण याच्या पुढें दुसरा एक प्रश्न उपस्थित होतो तो हा कीं, अल्पप्रसविता साध्य कशी करावयाची? साध्य कबूल केलें कीं पुढें साधनांचा विचार केलाच पाहिजे. देशांत सुप्रजा निर्माण व्हावी व देशाचें आरोग्य, तेज व बुद्धिबल हीं वाढावींत यासाठीं अल्पप्रसवितेचें ध्येय पतिपत्नींनीं मान्य करावें हें खरें. पण नुसत्या ध्येयाची व्याख्या करून काम भागण्यासारखें नाहीं. हें ध्येय साध्य करण्यासाठीं श्रेयस्कर मार्ग कोणता त्याचाही विचार करणें अगत्याचें आहे.

या बाबतींत अगदीं प्रथम सुचणारी उघड अशी विचारसरणी ही, कीं अल्पप्रसविता साध्य करण्यासाठीं प्रजेचें मूळ उगमस्थान जें संभोगसौख्य त्याचा उपभोगच स्त्री-पुरुषांनीं नियमितपणें घ्यावा. कार्याचें नियमन करावयाचें असल्यास त्याच्या कारणाचेंच प्रथम नियमन केलें पाहिजे असें म्हणणें कोणाच्याही विवेचक बुद्धीला पटण्यासारखें आहे, व संततिनियमनासाठीं संभोगनियमनाचा मार्ग कोणी सुचविला तर तें उचितच होय. किंबहुना संततिनियमनाचें अगत्य ज्यांना प्रथम पटलें त्यांना देखील त्या ध्येयाच्या साध्यतेसाठीं संभोगनियमन हेंच साधन सुचलें व त्याचाच पुरस्कार त्यांनीं त्या वेळीं केला. माल्थसच्या सिद्धान्ताची हकीगत मागें एके ठिकाणीं आम्हीं दिली त्या वेळींच आम्ही वाचकांस सांगितलें, कीं लोकसंख्येची वाढ भूमितिश्रेढीनें होते व उपजीविकेच्या द्रव्यांची वाढ गणितश्रेढीनें होते असा निसर्गनियम असल्याचें सिद्ध करूनच केवळ

मालथस स्वस्थ राहिला नाहीं, तर त्यानें सर्व लोकांस अल्पप्रसवितेचें धोरण स्वीकारण्याचा उपदेशही कंठरवानें केला. मालथसच्या वेळेपासूनच लोकसंख्येच्या प्रश्नाकडे लोकांचें लक्ष वेधलें गेलें हेंही आम्ही पूर्वीं एकदां वाचकांस सांगितलेंच आहे. अर्थात् ज्या मालथसनें अल्पप्रसवितेच्या उपदेशाचा उपक्रम प्रथम केला त्याची त्याबद्दलच्या साधनांविषयीं काय कल्पना होती तें पाहणें अगत्याचें आहे. अल्पप्रसवितेसाठीं लोकांनीं कोणता उपाय करावा असें मालथसचें म्हणणें होतें? या प्रश्नाचा विचार करण्यासारखा आहे. मालथसचा स्वतःचा उपदेश पाहिला तर तो असा होता, कीं स्त्री-पुरुषांनीं संभोगसौख्यच अतिशय नियमितपणें घ्यावें म्हणजे प्रजोत्पत्तीचें प्रमाण आपोआपच कमी होईल. संभोग व संतति यांचा अबाधित कार्यकारण संबंध असल्याचें पाहून संततिनियमनासाठीं संभोगनियमनाचा मार्गच त्यानें लोकांस सुचविला. पतिपत्नींस संभोगसुखाची लालसा असणें साहजिक आहे, परंतु त्या सुखाबरोबर एक प्रकारची सामाजिक जबाबदारी आपल्यावर येते हें त्यांनीं विसरतां कामा नये व ती जबाबदारी योग्य रीतीनें पार पाडण्यासाठीं त्यांनीं बऱ्याच प्रमाणांत ब्रह्मचर्यव्रतानें राहिलें पाहिजे, असा मालथसचा सर्वांस उपदेश होता.

आपल्या प्राचीन आर्यांच्या कल्पना पाहिल्या तरी त्या याच स्वरूपाच्या होत्या असें आढळून येतें. सुप्रजाजननाचें महत्त्व आमच्या स्मृतिकारांस माहीत होतें, हें सहज साधार सिद्ध करण्यासारखें आहे. तेव्हां स्त्री-पुरुषसंबंध कशा प्रकारचा असावा याविषयीं स्मृतिकारांचें सांगणें काय होतें तें पाहणें बोधप्रद होईल. अल्पप्रसवितेच्या ध्येयाची कल्पना त्या काळीं लोकांच्या मनांत यावयाचें कारणच नव्हतें. परंतु सुप्रजाजननाच्या दृष्टीनें ब्रह्मचर्याचें महत्त्व फार असल्याचें मात्र स्मृतिकारांनीं जाणलें होतें व त्याचा उपदेशही त्यांनीं

स्पष्टपणें आपल्या स्मृतिद्वारा केलेला दिसतो. ब्रह्मचर्य हें बळ व बुद्धि देणारें असून आयुष्याची वृद्धि करणारें आहे अशी स्मृतिकारांची खात्री होती. म्हणूनच आयुष्याचा पहिला भाग ब्रह्मचर्यपरिपालनांत घालवावा अशी त्यांची आज्ञा आहे. गृहस्थादि पुढचे आश्रम ऐच्छिक आहेत. पण ब्रह्मचर्याश्रम तसा ऐच्छिक नाहीं. तो केल्याशिवाय पुढील आश्रम स्वीकारतांच येत नाहींत अशी आमचीं शास्त्रें स्पष्टपणें सांगतात. शरीरसामर्थ्य, ज्ञान, आयुष्य आणि ओज हीं सर्व वीर्यवृद्धीनेंच वाढतात, आणि वीर्यवृद्धि ब्रह्मचर्यावांचून होत नाहीं, या कारणानें ब्रह्मचर्याची प्रशंसाच छांदोग्यादि उपनिषदांत व मनु, याज्ञवल्क्य इत्यादि स्मृतींत सांपडते. विवाहापूर्वीं मनुष्यानें ब्रह्मचारी राहिलें पाहिजे, इतकेंच नव्हे तर विवाहानंतरही ब्रह्मचर्यव्रताचें आचरण शक्य व आवश्यक आहे असें स्मृतिकारांचें मत होतें. याचें उदाहरण म्हणून पुढील दोन अवतरणें पुरेशीं होतील:—

**षोडशर्तु निशः स्त्रीणां तासां युग्मासु संविशेत् ।**
**ब्रह्मचार्येव पर्वाण्याद्याश्चतस्रश्च वर्जयेत् ॥**

—याज्ञ०, अ. १ श्लो. ७९

**अमावास्यामष्टमीं च पौर्णमासीं चतुर्दशीम् ।**
**ब्रह्मचारी भवेन्नित्यमप्यृतौ स्नातको द्विजः ॥**

—मनु, अ. ४।१२८

यावरून विवाहित स्त्री-पुरुषांनीं ब्रह्मचर्यव्रतानें राहिलें पाहिजे असें स्मृतिकारांस वाटत होतें, व केवळ प्रजोत्पादनापुरताच स्त्रीसंभोग करणारा गृहस्थ ब्रह्मचारी या पदवीलाच पात्र असून तो पूर्णायु होतो असें त्यांचें लोकांना आश्वासन होतें वगैरे गोष्टी स्पष्ट दिसून येतात.

अल्पप्रसवितेचें साध्य अल्पसंभोगानें साधण्यासारखें आहे अशी आपल्यापैकींही पुष्कळांची समजूत आहे. या ठिकाणीं आम्हांस एक

गोष्ट वाचकांस सांगावीशी वाटते ती ही, कीं संततिनियमनाची उघड चर्चा कोणी करूं लागल्यास या विषयाचा असा उहापोह करणें सद्भिरुचीच्या विरुद्ध आहे असें म्हणून कानांत बोटें घालणारे लोकही मनांतल्या मनांत संततिनियमनास अनुकूल असतात, इतकेंच नव्हे तर आपणांस फार संतति होऊं नये यासाठीं हळूच कोठून तरी माहिती मिळवून त्यांना जो उपाय पटला असेल त्या उपायाचें प्रत्यक्ष आचरणही ते करीत असतात. या बाबतींत कित्येक लोकांची संततिनियमनाविषयींची प्रतिकूलता केवळ बाहेर दाखविण्यापुरती असून त्यांच्या आचरणांत संततिनियमनाचाच प्रयत्न दिसून येतो असें आम्ही प्रत्यक्ष अवलोकनावरून खात्रीपूर्वक सांगूं शकतों. असल्या लोकांना दोष द्यावयाची आमची इच्छा नाहीं. संततिनियमनाची इष्टता उघड कबूल करण्याचें धैर्य त्यांनीं दाखविल्यास समाजाचें हित होईल, इतकेंच नव्हे तर आज गुप्त रीतीनें अर्धीकच्ची माहिती मिळवून कोठल्या तरी अविश्वसनीय उपायाचा अवलंब करणें जें त्यांना भाग पडत आहे तें टळून या विषयाची उघड चर्चा झाल्यानें सर्वांत फलदायी व हितपरिणामी असा एखादा उपाय विद्वान लोकांच्या विचारविनिमयानें ठरेल, येवढीच आमची त्यांस विनंति आहे. संततिनियमित करण्याविषयींच्या त्यांच्या इच्छेला आम्ही दोष देत नाहीं. आज आपल्या देशांत परिस्थितिच अशी विलक्षण निर्माण झाली आहे, कीं आपल्या पोटीं फार संतति झाल्यास तिचें पालन पोषण आपल्याकडून नीट होणार नाहीं अशी चिंता प्रत्येकाला वाटणें अगदीं साहजिक आहे. या चिंतेनें समाजाला इतकें ग्रासलेलें आहे, कीं अगदीं जुन्या वळणाचे आणि जुन्या मताचे लोकसुद्धां संततिनियमनाची इच्छा करतात, व यासंबंधीं आपल्या जुन्या शास्त्रांत किंवा आर्य वैद्यकांत कांहीं उपाय सांगितले आहेत किंवा काय याविषयीं शोध करून त्यांत जो

मार्ग दाखविला आहे असें त्यांस वाटतें त्या मार्गानें ते जातही असतात. समाजांत सुप्रजा निर्माण व्हावी ही कळकळ शास्त्रकारांस आणि आर्य वैद्यकाच्या आचार्यांस होती. या त्यांच्या कळकळीस अनुसरून त्यांना असें वाटत होतें, कीं विवाहित स्त्री-पुरुषांनीं प्रजोत्पत्ति करण्यापुरतेंच संभोगसुख घ्यावें. पण स्त्री-पुरुषांचा संभोग प्रजोत्पत्तीच्या हेतूपुरताच घडावा आणि त्या हेतूव्यतिरिक्त त्यांनीं संभोगसुखाची लालसा करूं नये असा लोकांना उपदेश केला तर पुढें असा प्रश्न साहजिकपणेंच उत्पन्न होतो कीं कोणत्या काळीं संभोग केला असतां गर्भधारणा होते व कोणत्या काळीं होत नाहीं याविषयीं कांहीं तर्क करण्यासारखा आहे किंवा नाहीं? तसा कांहीं शास्त्रशुद्ध तर्क बांधण्यासारखा असेल तर गर्भधारणा ज्या अवधींत शक्य नाहीं ती अवधि संभोगवर्ज्य व ज्या काळांत ती होण्याचा संभव असेल तो संभोगास योग्य समजावा, असा उपदेश विवाहित स्त्री-पुरुषांस करतां येईल. या दृष्टीनें विचार करून आमच्या वैद्यक ग्रंथांनीं विहित व निषिद्ध असे संभोगकाल ठरविले होते. सुश्रुताच्या तिसऱ्या अध्यायांत—

**नियतं दिवसेऽतीते संकुचत्यंबुजं यथा।**
**ऋतौ व्यतीते नार्यास्तु योनि संव्रियते तथा ॥ ९॥**

असा श्लोक आहे. त्याचा बोध असा कीं रजोदर्शनानंतर जे पहिले सोळा दिवस असतात त्या अवधींत गर्भ राहतो, पुढें राहत नाहीं; तेव्हां या वायफळ काळांत संभोग करूं नये. चरकाच्या चवथ्या अध्यायांतील सातव्या श्लोकांत व भावप्रकाशांतील शारीर प्रकरणाच्या भागांत हीच कल्पना आहे. मनुस्मृतींत देखील पतिपत्नींनीं कांहीं विशिष्ट रात्री वर्ज्य आणि कांहीं विहित समजून आचरण करावें

अशा प्रकारच्या आज्ञा आहेत. मनुस्मृतींतील गृहस्थाश्रम धर्म या तिसऱ्या अध्यायांत पुढील श्लोक आहेत—

> ऋतुःस्वाभाविकस्त्रीणां रात्रयः षोडश स्मृताः ।
> चतुर्भिरितरैः सार्धमहोभिः सद्विगर्हितैः ॥४६॥
> तासामाद्याश्चतस्रस्तु निंदितैकादशी च या ।
> त्रयोदशी च शेषासु प्रशस्ता दश रात्रयः ॥४७॥
> निंद्यास्वष्टासु चान्यासु स्त्रियो रात्रिषु वर्जयन् ।
> ब्रह्मचार्येव भवति यत्र तत्राश्रमे वसन् ॥५०॥

तसेंच चवथ्या अध्यायांत—

> नोपगच्छेत्प्रमत्तोऽपि स्त्रियमार्तवदर्शने ।
> समानशयने चैव न शयीत तयासह ॥४०॥

असा श्लोक आढळतो.

मनुस्मृतींत आणि वैद्यक ग्रंथांत अशा प्रकारचीं जीं वचनें आहेत त्यांवरून त्यांच्या मताप्रमाणें गर्भसंभवास अनुकूल व प्रतिकूल असे कांहीं विशिष्ट काल ठरतात. आपल्या समाजांतील जुन्या वळणाच्या सच्छील लोकांना जेव्हां संततिनियमनाची गरज पटते तेव्हां या वचनांचा आधार घेऊन गर्भसंभवास प्रतिकूल अशा कालावधींत स्त्रीगमन करण्याचा मार्ग ते पतकरतात, व तसें करण्यांत आपला हेतु साध्य होऊनच्या होऊन शास्त्रविरुद्ध आचरण घडण्याची भीतीही उरत नाहीं, अशी त्यांच्या मनाची समजूत असते. अशा प्रकारच्या संयमित संभोगाचरणानें इष्ट हेतू साध्य होतो किंवा नाहीं याची छाननी आपल्याला पुढें यथाक्रम करावयाची आहे. प्रस्तुत मुद्दा इतकाच कीं, अल्पप्रसविता साध्य करण्यासाठीं संभोग-नियमन किंवा ब्रह्मचर्य हा मार्गच परिणामकारक आहे ही कल्पना प्रथमदर्शनीं प्रत्येकाला सुचण्यासारखी आहे. अठराव्या शतकांत

अल्पप्रसवितेचा उपदेश करणाऱ्या मालथसनें हा ब्रह्मचर्याचाच मार्ग लोकांस दाखविला, आमच्या प्राचीन ग्रंथांच्या वचनांतून अल्पप्रसवितेचें साधन शोधून काढावयाचें म्हटल्यासही हाच मार्ग सूचित केलेला दिसतो, आणि आज विसाव्या शतकांतही महात्मा गांधींच्यासारखे पुढारी संततिनियमनाविषयीं जेव्हां जेव्हां लोकमत जागृत करतात तेव्हां तेव्हां हा अल्पसंभोगाचा किंवा एक प्रकारच्या ब्रह्मचर्याचाच मार्ग उत्तम होय असें लोकांना सांगतात.

संततिनियमनासाठीं ब्रह्मचर्याचा मार्ग जी मंडळी सुचवितात त्यांचें म्हणणें असें, कीं या मार्गाचें लोकांनीं अवलंबन केल्यास संततीचें नियमन तर होईलच, पण शिवाय समाजाचें इतरही अनेक प्रकारें हित होईल. ब्रह्मचर्याच्या सुपरिणामाविषयीं कोणीच शंका घेण्याचें धाडस करणार नाहीं. ब्रह्मचर्यामुळें बुद्धि, तेज व ओज हीं वाढून आयुष्याची देखील वाढ होते असें जें आपल्या शास्त्रकारांनीं सांगितलें आहे तें सर्वस्वी खरें आहे. त्याचप्रमाणें ब्रह्मचर्यव्रताचें महत्त्व ज्या मानानें एखाद्या समाजाच्या मनावर पटलें असेल व त्याचें परिपालन त्या समाजांतील व्यक्ति ज्या मानानें करीत असतील त्या मानानें तो समाज पराक्रमी होईल, याविषयींही कोणी सूज्ञ मनुष्य साशंक असेल असें वाटत नाहीं. संभोगाचा अतिरेक करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या पोटीं कुसंतति निर्माण होते, त्यांचें आरोग्य बिघडतें, त्यांच्यांत शारीरिक किंवा बौद्धिक श्रम करण्याची ताकद उरत नाहीं, आणि शेवटीं त्यांची दशा करुणास्पद होऊन आंतून पोखरलेली इमारत जशी अकस्मात् जमिनीवर कोसळावी त्याप्रमाणें त्यांचे देह मृत्यूला बळी पडतात, असा अनुभव आपल्याला अनेक वेळां येतो. वीर्य हें सर्व प्रकारच्या सामर्थ्याचें व तेजाचें आदिस्थान होय. तें हवें तसें उधळून टाकणाऱ्या व्यक्तीचा सर्वनाश झाल्यावांचून राहणार नाहीं. यासाठीं वीर्याचें जतन करणें हेंच स्त्री-पुरुषांस कल्याणप्रद होय; आणि

विवाहित स्थितींत प्रजोत्पादनासाठीं वीर्यव्यय केलाच पाहिजे आणि स्त्री-पुरुषसंयोग हीं मुळीं विवाहाची क्रमप्राप्त परिणतिच आहे, वगैरे गोष्टी जरी खऱ्या असल्या, तरी विवाहित स्त्री-पुरुषांनीं देखील संभोगसुख नियमित प्रमाणांतच उपभोगिलें पाहिजे. म्हणजे समाजाच्या कल्याणासाठीं सुप्रजाजनाचें कार्य केल्याचें श्रेय त्यांस मिळूनच्या मिळून स्वतःच्या दीर्घायुष्याचेंही त्यांस जतन करतां येईल. या दृष्टीनेंच गृहस्थाश्रमांतही ब्रह्मचर्याचें महत्त्व अतिशय आहे असें आमचे शास्त्रकार सांगतात, आणि विवाहित स्त्री-पुरुषांनीं ब्रह्मचर्य व्रताचें परिपालन केल्यास त्यांचा गृहस्थाश्रम योग्य रीतीनें व्हावा तसा होऊन त्यांना स्वतःला पूर्णायुष्याचा लाभ होतो असें त्यांचें आश्वासन आहे. सारांश, ब्रह्मचर्य हें एक आदरणीय व आचरणीय व्रत असून त्याचा सर्व स्त्री-पुरुषांना उपदेश केल्यास समाजाचें कोणत्याही प्रकारचें अहित होण्याची भीति नसून उलट त्यापासून समाजाचें कल्याणच होईल. तेव्हां अल्पप्रसवितेचें ध्येय साधण्यासाठीं याच मार्गाचें अवलंबन करावयास लोकांना सांगितलें पाहिजे.

पण ब्रह्मचर्याचें व्रत अतिशय हितपरिणामी आहे हें खरें असलें तरी संततिनियमनाचें एक उत्कृष्ट साधन म्हणून त्याचा पुरस्कार करण्यापूर्वी एका प्रश्नाचा निकाल लावला पाहिजे. संततिनियमन साध्य करावयाचें याचा अर्थ उघडच असा कीं स्त्रियांना संतति कमी झाली पाहिजे. **आपल्याला जितक्या मुलांचें पालन पोषण व शिक्षण उत्तम प्रकारें करतां येईल तितकींच मुलें आपल्याला होतील, त्यापेक्षां अधिक होणार नाहींत अशा धोरणानें प्रत्येक कुटुंबांतील पतिपत्नींनीं वागावयाचें हाच संततिनियमनाचा खरा खरा अर्थ होय.** आतां मध्यम स्थितींतील लोकांची आर्थिक परिस्थिति पाहिली तर साधारणपणें असें म्हणतां येईल, कीं त्या स्थितींतील कुटुंबास तीन मुलांपेक्षां अधिक

मुलें होणें इष्ट नसतें. प्रजोत्पादनाच्या हेतूनें केलेला संभोगच प्रशस्त होय व त्या हेतूव्यतिरिक्त केलेला संभोग निषिद्ध व निंद्य होय ही प्राचीनकाळची कल्पना त्या काळीं ठीक होती. कारण साधारणपणें एका स्त्रीस एका पतीपासून किती मुलें होतात त्याचें मध्यप्रमाण पाहिलें तर तें आठ किंवा नऊ असें असतें; व तो काळ असा होता कीं प्रत्येक कुटुंबांत आठ नऊ मुलें झालीं तर हरकत नव्हती, इतकेंच नव्हे तर तें समाजाच्या हिताचेंच होतें. म्हणजे आपल्या संभोगेच्छेवर विशेष बंधन घालण्याचा प्रसंग त्या काळांतील स्त्री-पुरुषांवर येतच नसेल असें म्हणावयास हरकत दिसत नाहीं. आठ नऊ अपत्यांपलीकडे स्त्रीच्या प्रसवितेची कमालमर्यादा पोंचतच नसल्यामुळें व तितक्या अपत्यांस अवकाश असल्यामुळें संभोगलालसेचा निरोध करण्याची गरज त्या काळांतील स्त्री-पुरुषांना कधीं भासली असेल असें वाटत नाहीं. उलट आजच्या परिस्थितींत तीन अपत्यांपेक्षां अधिक भार सहन करण्याची आर्थिक ताकद कोणत्याही कुटुंबांत नसते; आणि स्त्रीची प्रसविता तर या मर्यादेवर थांबणें शक्य नसतें. याचा उघड अर्थ असा होतो कीं, स्त्री तिहींपेक्षां अधिक वेळां गरोदर होतां कामा नये. या धोरणास अनुसरून गर्भप्रतिबंध करण्याचें सामर्थ्य ब्रह्मचर्यव्रतांत असलें तरच त्या व्रताचा मार्ग सामान्य जनांस दाखवून देणें सूज्ञपणाचें होईल. कांहीं विशिष्ट रात्रीं संभोग न केल्यास गर्भधारणा टळते या कल्पनेस आधुनिक शास्त्राचा आधार आहे कीं काय हें आपल्याला पाहिलें पाहिजे. स्त्रीच्या एका ऋतुस्नानापासून दुसऱ्या ऋतुस्नाना-पर्यंत अमुक एक काल असा असतो, कीं त्या कालांत तिच्याशीं पुरुषसमागम घडला तरी गर्भधारणा होणेंच शक्य नसतें अशी एक सामान्य समजूत आहे व तिला वैद्यक ग्रंथांतील वचनांचा आधारही मिळतो. ही कल्पना जर खरी असली आणि स्त्रीच्या प्रतिमासिक अवस्थेंत गर्भप्रतिबंधक असा जर एक 'सुरक्षित काल' खरोखरीच

असला तर या कालांतच फक्त संभोगरत होण्याचा व बाकीच्या काळांत ब्रह्मचर्याचें परिपालन करण्याचा उपदेश स्त्री-पुरुषांस करणें खात्रीनें इष्ट होईल; पण उलट, 'सुरक्षित काळा'ची ही कल्पना केवळ कल्पनाच ठरली तर? आधुनिक वैद्यक व शारीरिक ज्ञानाचा तिला आधार नसला तर? मग लोकांना ब्रह्मचर्याचा उपदेश करण्याचा अर्थ असा होईल कीं त्यांनीं सबंद आयुष्यांत संभोगसुखाचा उपभोग फार तर तीन वेळां घ्यावा. पण हा उपदेश व्यावहारिक आहे काय? सामान्य स्त्री-पुरुषांस असल्या असिधाराव्रताचें आचरण करणें शक्य आहे काय?

हे सर्व प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांचीं उत्तरें ज्या प्रकारचीं मिळतील त्या प्रकारें ब्रह्मचर्य हें संततिनियमनाचें व्यावहारिक साधन आहे किंवा नाहीं या गोष्टीचा आपल्याला निकाल लावतां येईल. म्हणून या प्रश्नांचा विचार पुढील प्रकरणांत स्वतंत्रपणें करणेंच योग्य होईल.

प्रकरण पांचवें

## सोन्याची कुऱ्हाड

ज्या काळांत संभोग घडला तरी गर्भधारणेचा संभव नसतो असा एखादा काळ स्त्रीच्या प्रतिमासिक अवस्थेंत असतो किंवा काय हाच मुख्य प्रश्न आहे. या प्रश्नाच्या निकालावर ब्रह्मचर्याची व्यावहारिकता किती व कशी अवलंबून आहे तें आम्ही मागील प्रकरणाच्या शेवटीं सूचित केलेंच आहे व याही प्रकरणांत पुढें त्याचा अधिक विस्तारानें आपल्याला विचार करावा लागेल. पण तो करण्यापूर्वीं प्रथम आपणांस उपरिनिर्दिष्ट प्रश्नाचा व निकाल लावला पाहिजे. तसें करावयाचें झाल्यास संभोगक्रिया व गर्भधारणा यांचे परस्पर संबंध कशा प्रकारचे आहेत ते आपल्याला पूर्णपणें समजून घेतले पाहिजेत; आणि त्यासाठीं स्त्री-पुरुषांच्या जननेंद्रियांची रचना कशा प्रकारची आहे तें आपल्याला पाहिलें पाहिजे. अशी चर्चा करावयास आमच्या वाचकांस उद्युक्त केलेलें पाहून कांहीं लोक म्हणतील "अहो, हें तुम्हीं मांडलें आहे तरी काय? स्त्री-पुरुषांच्या जननेंद्रियांचीं नांवें घेणेंही प्रतिष्ठित समाजांत बीभत्स मानलें जातें आणि तुम्ही तर आतां त्या इंद्रियांच्या निरनिराळ्या भागांची रचना वाचकांस समजून द्यावयास सिद्ध झालां! या तुमच्या अधम रुचीला म्हणावें तरी काय हेंच समजत नाहीं!" या संभवनीय आक्षेपाला आम्ही इतकेंच उत्तर देऊं इच्छितों, कीं स्त्री-पुरुषांच्या इंद्रियांची चर्चा ही तुम्हांला इतकी किळसवाणी गोष्ट कां वाटते? हात, पाय, नाक हे जसे मानवी शरीराचे अवयव आहेत त्याचप्रमाणें जननेंद्रियेंही शरीराचीं उपांगें होत. नाक किंवा कान यांचे व्यापार समजून घेण्यासाठीं त्यांच्या विभागांची चर्चा आपण करीत नाहीं काय? मग जननेंद्रियांचे

व्यापार माहीत व्हावेत म्हणून त्यांच्या रचनेचा अभ्यास केला तर त्याला मात्र तुम्ही नाकें कां मुरडतां ? बरें, शिमग्यांत टारगट पोरें ज्या रीतीनें जननेंद्रियांचीं नांवें घेतात तशाच रीतीनें व त्याच वृत्तीनें आम्ही त्यांचा उच्चार करीत आहोंत, किंवा करूं असें म्हणण्याचा तर तुमचा हेतू नाहीं ? मग शास्त्रीय दृष्टीच्या उच्च हेतूनें आणि केवळ एका महत्त्वाच्या प्रश्नाचा निकाल करण्याच्या तात्त्विक भावनेनें आम्ही जर या विषयाची चर्चा केली तर तुम्हांला त्यांत बीभत्सपणा तो कोठें दिसतो ? असल्या चर्चेनेंही तुमच्या प्रतिष्ठितपणाला विटाळ होत असला तर तो फाजील सोंवळेपणा तुमचा तुम्हांला लखलाभ होवो. सदभिरुचीची असली परीटघडी कल्पना कोणत्याही सूज्ञ माणसाला आज पटण्यासारखी नाहीं. 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिहमुच्यते।' या वृत्तीच्या अभिनिवेषानेंच हें विसावें शतक भरलेलें आहे. ज्ञान हें अत्यंत पवित्र आहे, आणि त्या ज्ञानाचा विषय कसाही असला तरी ज्ञानाच्या पावित्र्यांत कोणत्याही प्रकारचा उणेपणा उत्पन्न होणें शक्य नाहीं. स्त्री-पुरुषांच्या जननेंद्रियांची चर्चा करण्यांत सदभिरुचीचा आमच्याकडून अतिक्रम होतो असें कोणी म्हटल्यास त्याचा आक्षेपच हास्यास्पद ठरेल अशी आमची खात्री आहे. म्हणून आपल्या विषयाच्या विवेचनासाठीं ही चर्चा अगत्याची असल्यामुळें ती शक्य तितक्या सोप्या व सुबोध भाषेंत आम्ही पुढें केली आहे.

स्त्री-पुरुषांच्या जननेंद्रियांची रचना समजून घेणें जरुरीचें आहे असें आम्ही म्हटलें खरें; पण वास्तविक पाहतां पुरुषांच्या इंद्रियाच्या रचनेचा विचार गाळून केवळ स्त्रीच्या जननेंद्रियाचा विचार केला तरी तो पुरेसा आहे. कारण, एक तर पुरुषाच्या इंद्रियांची रचना अगदीं साधी व वरवर दिसते त्या प्रकारचीच आहे. त्यांत विभागही फारसे नाहींत व त्या विभागांची गुंतागुंतही मुळींच नाहीं. पण स्त्रीच्या जननेंद्रियाची

रचना फार गुंतागुंतीची असून पृष्ठस्थ भागांपेक्षां अंतस्थ भागांचें कार्यच अधिक महत्त्वाचें आहे. शिवाय गर्भधारणेशीं प्रत्यक्ष संबंध पुरुषापेक्षां स्त्रीच्याच जननेंद्रियाचा अधिक निकटपणें येतो. या दोन्ही कारणांसाठीं पुरुषाच्या जननेंद्रियाची चर्चा न करतां स्त्रीच्या जननें-द्रियाच्याच निरनिराळ्या भागांच्या रचनेविषयीं आणि त्यांचे विविध व्यापार कसे चालतात त्याविषयीं आम्ही विवेचन करणार आहोंत. हें विवेचन महत्त्वाचें आहे. कारण ब्रह्मचर्याचा मार्ग व्यावहारिक आहे किंवा नाहीं या प्रश्नाचा निकाल लावण्यास आपल्याला या विवेचनाचीच मदत घ्यावयाची आहे.

स्त्रीच्या जननेंद्रियाचे कांहीं विभाग पृष्ठस्थ असून बाकीचे अंतःस्थ असतात. त्यांपैकीं अंतःस्थ विभागांचेंच महत्त्व अधिक आहे. त्या विभागांत (१) अंडाशय, (२) अंडवाहिनी नलिका, (३) गर्भाशय, आणि (४) योनिमार्ग येवढ्यांची गणना होते. पृष्ठस्थ विभागांत (१) कला, (२) बृहदोष्ठ, (३) योनिलिंग आणि (४) मूत्रमार्ग इतक्यांचा अंतर्भाव होतो. समोरच्या पानावर दिलेल्या आकृतीवरून या सर्व विभागांचा स्पष्ट बोध वाचकांस होईल.

आतां या अंतःस्थ व पृष्ठस्थ विभागांचें मुख्य कार्य कोणतें असतें त्याचा क्रमशः विचार करूं.

**अंडाशयः**—जननक्रियेशीं या अंडाशयांचा फारच निकट संबंध आहे. कारण पुरुषाच्या सूक्ष्मबीजाकडून स्त्रीचें जें सूक्ष्मांड सुफलित झाल्यामुळें गर्भधारणा होत असते, त्या सूक्ष्मांडाची उत्पत्तिच मुळीं या अंडाशयांत होते. अंडाशयांच्या अभावीं संतति उत्पन्न होणें शक्यच नाहीं. प्रत्येक स्त्रीच्या ठिकाणीं दोन अंडाशय असतात, व ते तिच्या गर्भाशयाच्या एकेका बाजूला एकेक असे असतात. गर्भाशय ज्या अनेक मांसल तंतूंच्या पट्ट्यांवर आधारलेला असतो त्यांतच हे अंडाशय बसविलेले असतात. त्यांचा रंग फिकट

गुलाबी असा असून आकारानें प्रत्येक अंडाशय सुमारें दीड इंच लांब, पाऊण इंच रुंद, एकतृतीयांश इंच जाड असतो, व वजनांत तो फार तर पाव औंस भरतो.

हें अंडाशयांच्या रचनेविषयीं झालें. त्यांचें विशिष्ट कार्य म्हटलें तर तें दुहेरी आहे. कारण दोन भिन्न भिन्न पदार्थांची उत्पत्ति त्यांच्यापासून होत असते. वर सांगितलेंच आहे, कीं स्त्रीच्या सूक्ष्मांडांची उत्पत्ति करणें हें अंडाशयांचें पहिलें कार्य. या त्यांच्या कार्यास आपण उत्पादक कार्य असें नांव वाटल्यास देऊं. पण याखेरीज एक प्रकारचा अंतर्गत स्राव उत्पन्न करण्याचेंही कार्य अंडाशयांसच करावें लागतें. हा अंतर्गत स्राव स्त्रीच्या रक्ताशीं समरस होऊन जातो, आणि स्त्रीच्या देहसंवर्धनाच्या व तत्संबंधींच्या सर्व घडामोडींत या स्रावाचें महत्त्व फार आहे. सूक्ष्मांडांची गोष्ट अशी आहे, कीं स्त्री वयांत येऊन ऋतुमती झाली म्हणजे त्यांची उत्पत्ति सुरू होते, आणि स्त्रीचा ऋतुक्षमतेचा कालावधि संपून तिचा विटाळ गेला म्हणजे त्यांची उत्पत्ति बंद होते. पण या अंतर्गत स्रावाचें असें नाहीं. स्त्रीच्या सबंद आयुष्यभर त्याची उत्पत्ति चालूच असते. या अंतर्गत स्रावामुळें स्त्रीच्या अंगोपांगांस एक प्रकारचा गोलपणा प्राप्त होतो, तिचा केशकलाप लांबसडक असा वाढतो, तिच्या ठिकाणीं योग्य वयांत कुचोद्गम होतो, तिच्या कटीखालचा प्रदेश विस्तार पावतो आणि तिच्या आवाजांत पुरुषाहून निराळीच अशी मधुरता येते. या अंतर्गत स्रावाच्या अभावीं हीं लक्षणें स्त्रीच्या ठिकाणीं दिसणार नाहींत व एकंदरींत ती दिसावयास मर्दानी दिसेल. अंडाशयाखेरीज बाकीच्या जननेंद्रियाची वाढही या अंतर्गत स्रावावर अवलंबून असते, आणि हा अंतर्गत स्राव चालू असतो म्हणूनच स्त्रीला कामवासना होते व ती पूर्ण झाली असतां तिला सुख वाटतें. यासाठींच या स्रावाचें महत्त्व फार आहे असें आम्हीं वर म्हटलें.

आतां अंडाशयाच्या उत्पादक कार्याविषयीं अधिक विचार करूं. हें उत्पादक कार्य म्हणजे सूक्ष्मांडांची उत्पत्ति होय हें वर सुचविलेंच आहे. मुलीचा जन्म होतो त्या वेळींच तिच्या अंडाशयांत असावयाचीं तितकीं सूक्ष्मांडें असतात. इतकेंच नव्हे तर ती मुलगी ऋतुस्नात होईल त्या वेळीं देखील नसतील इतकीं सूक्ष्मांडें तिच्या जन्मकालीं अंडाशयांत असतात. जन्मकाळच्या वेळची अंडाशयांतील सूक्ष्मांडांची संख्या सुमारें एक लाख असते असें गणित देखील शारीरशास्त्रज्ञानीं केलेलें आहे. परंतु या एक लाखांपैकीं बहुतेक कालांतरानें नष्ट होतात, व तरुण मुलीला प्रथम रजोदर्शन होतें त्या वेळीं त्यांची संख्या सुमारें तीस हजारावर नसते. प्रथमार्तवापासून (Puberty) तों आर्तवहीनतेच्या (Menopause) काळापर्यंत दर महिन्याला एक सूक्ष्मांड परिपक्व होतें. म्हणजे स्त्रीच्या एकंदर आयुर्मर्यादेंत तीनशेंपासून चारशें पर्यंत सूक्ष्मांडेंच या परिपक्व अवस्थेंतून जातात. यावरून बाकीचीं सूक्ष्मांडें निसर्गानें उगीचच्या उगीच अंडाशयांत ठेवलेलीं असतात व तीं निरुपयोगी असतात असें मात्र समजूं नये. कारण कांहीं कारणामुळें एक किंवा दोन्ही अंडाशय बिघडले तर हजारों सूक्ष्मांडें बिघडून वाया जाण्याचा संभव असतो व मग गर्भधारणेच्या कामास तीं निरुपयोगी ठरण्याची भीति असते. ही संभवनीय आपत्ति आली तरी पुरेशीं सूक्ष्मांडें गर्भधारणेच्या कामासाठीं तयार असावींत या धूर्त व दूरदर्शी हेतूनेंच निसर्गानें सूक्ष्मांडांचा येवढा मोठा सांठा स्त्रीच्या अंडाशयांत ठेवलेला असतो. पुरुषाच्या बाबतींतही निसर्गाची ही दूरदृष्टि दिसून येते. वास्तविक पाहतां स्त्रीच्या एका सूक्ष्मांडांत शिरून तें सुफलित करावयास पुरुषाचा एक सूक्ष्म बीज पुरेसा आहे इतकेंच नव्हे तर एका वेळीं एकाच सूक्ष्म बीजाचा अशा प्रकारें शिरकाव होऊं शकतो. परंतु पुरुषाच्या प्रत्येक वीर्यपातांत अडीचपासून पांच लाखांपर्यंत सूक्ष्मबीजे असतात असें सिद्ध झालेलें आहे.


**ऋतुस्नान**:—स्त्रियांस दर महिन्यास जें ऋतुस्नान घडतें त्याचाही खरा अर्थ काय तो समजून घेतला पाहिजे. स्त्रीच्या प्रत्येक सूक्ष्मांडाभोंवतीं एक प्रकारचें आवरण किंवा वेष्टण असतें. स्त्री वयांत येऊन तिला ऋतुस्नान घडूं लागण्यापूर्वी हें वेष्टण अभंग असतें. परंतु स्त्री वयांत आली म्हणजे प्रतिमासीं तिच्या अंडाशयांत एक प्रकारचा विलक्षण क्षोभ व्हावयास लागतो. ही प्रक्षुब्ध अवस्था महिन्याच्या महिन्याला होऊं लागते, व हिच्या मुळाशीं दोन गोष्टी असतात. एक ऋतुस्राव आणि दुसरें सूक्ष्मांडपरिपाक. या दोन क्रिया एकाच वेळीं घडतात खऱ्या, पण त्या तशा कां घडाव्या हें अजून समजलेलें नाहीं. मात्र त्यांचा परस्पर कार्यकारण संबंध नाहीं अशी शास्त्रज्ञांची समजूत आहे. एक सूक्ष्मांड परिपक्व होऊन तें अंडाशयांतून बाहेर टाकलें जाणें या क्रियेला सूक्ष्मांडपरिपाक (Ovulation) असें नांव आहे. स्त्रीच्या प्रथमार्तवापासून ही क्रिया घडत असते, म्हणजे अंडाशयांत क्षोभ सुरू होऊन एक सूक्ष्मांड आपल्या भोंवतालचें आवरण फोडून बाहेर पडतें आणि अंडाशयांतून स्थानभ्रष्ट होतें. ऋतुस्रावाची क्रिया याहून अगदीं भिन्न आहे. तो एक प्रतिमासिक रक्ताचा स्राव आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. हा स्रावही दर अठ्ठावीस दिवसांनींच व ज्या वेळीं सूक्ष्मांडपरिपाकाची क्रिया घडते त्याच वेळीं होत असतो. या दोन्ही क्रियांचा कार्यकारण संबंध नसला तरी त्या नेहमीं एकाच वेळीं घडतात हें मात्र लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

ज्या रक्ताच्या स्रावाला ऋतुस्राव म्हणतात तें रक्त गर्भाशयाच्या आंतील भागांतून येतें. दर महिन्याला ऋतुस्राव सुरू व्हावयाच्या आधीं कांहीं दिवस गर्भाशयाच्या अंतर्भागांत बरेंच रक्त सांचतें व त्या रक्ताच्या दडपणानें तो ताणला जातो. गर्भाशयांत गर्भ राहिलेला असेल तर त्या गर्भाचें पोषण करण्याकडे या रक्ताचा व्यय होतो.

पण तसें नसेल तर हें रक्त दर महिन्याला गर्भाशयांतून फुटून बाहेर पडतें व योनिमार्गानें वाहूं लागतें.

**अंडवाहिनी**ः—अंडवाहिनी दोन असतात, व त्या पातळ नळ्या-सारख्या असतात. त्यांच्या योगानें दोन्ही अंडाशयांचा आणि गर्भा-शयाचा संबंध जडतो. अंडवाहिनी म्हणजे अंडाशय आणि गर्भाशय यांमधील दळणवळणाचे मार्गच होत. दर महिन्याला एक सूक्ष्मांड परिपक्व होऊन अंडाशयांतून निघालें, कीं त्याला वाट देऊन गर्भा-शयापर्यंत पोंचवावयाचें हेंच या अंडवाहिनी नलिकांचें मुख्य कार्य होय. पुरुषाच्या रेतांतून सुटलेल्या लाखों सूक्ष्मबीजांपैकीं कांहीं जेव्हां गर्भाशयांत शिरतात व अंडकाच्या शोधार्थ वेगानें धांवतात तेव्हां शेवटीं त्यांपैकीं एकाची व सूक्ष्मांडाची गांठ बहुधा अंड-वाहिनींतच पडते, व त्याच ठिकाणीं सूक्ष्मांडक सूक्ष्मबीजाकडून सुफलित होतें. अशा प्रकारें सुफलित झाल्यानंतर सूक्ष्मांड खालीं गर्भाशयांत उतरतें, तेथेंच कोठें तरी जागा शोधून राहतें, गर्भरूपानें वाढतें, व शेवटीं अपत्यरूपानें बाहेर येतें.

**गर्भाशय**ः—वर आम्हीं म्हटलेंच आहे, कीं गर्भाशय म्हणजे सुफलित सूक्ष्मांडक ज्या ठिकाणीं वाढीस लागून अपत्यरूप धारण करतो, ती जागा होय. गर्भाशय हा एक आंतून पोकळ असलेला मांसल अवयव आहे. त्याच्या कडा चांगल्या जाड असतात, आणि गर्भाच्या वाढीच्या वेळीं त्याला पाहिजे तितका अवसर देण्यासाठीं विस्तार पावण्याचा गुण त्याच्या अंगीं आहे. त्याचा आकार साधा-रणपणें पेरूसारखा असतो, आणि त्याचा रुंद भाग वरच्या बाजूस आणि निमुळता भाग खालच्या बाजूस असा तो आधारलेला असतो. वयांत आलेल्या स्त्रीचा गर्भाशय सुमारें तीन इंच रुंद आणि एक इंच जाड असतो, आणि त्याचें वजन एक किंवा दीड औंस असतें. गर्भाशयाच्या आंतील पोकळी साधारणपणें त्रिकोणाकृति असते.



योनिमार्ग, गर्भाशय, अंडवाहिनी व अंडाशय

[ पृष्ठ ५४

गर्भाशयाच्या वरच्या रुंद भागाचें एकेक टोंक एकेका अंडवाहिनीशीं जडलेलें असतें. खालच्या बाजूस गर्भाशयाला एक बारीक भोंक किंवा द्वार असतें. त्याला गर्भाशयमुख म्हणतात.

गर्भधारणा झाल्यापासून तों प्रसूतिकालापर्यंत गर्भाशय हेंच गर्भाचें निवासस्थान असतें. गर्भाशयांतील ऊबदार सुरक्षित जागीं गर्भाची वाढ होते, त्याला जरूर त्या अन्नाचा पुरवठा होतो, त्याचें श्वसन चालतें, आणि शेवटीं तो गर्भ बाहेरच्या जगांत स्वतंत्रपणें आयुष्यक्रमण करूं शकेल इतकी पात्रता त्याच्या अंगीं येते. अशा प्रकारें गर्भाची जोपासना करणें हेंच गर्भाशयाचें सर्वांत महत्त्वाचें कार्य होय.

**योनिमार्ग**:—स्त्रीच्या पृष्ठस्थ योनिद्वारापासून आंतील गर्भमुखापर्यंत जी पोकळ जागा असते तिला योनिमार्ग म्हणतात. अतिशय नाजूक अशा मांसल पापुद्र्याचें याला अस्तर असतें. याला बऱ्याचशा घड्या असतात, त्यामुळें जरूर पडेल त्या वेळीं तो ताणला जाऊन हवा तेवढा मोठा होतो. मूल जन्मास येतें तें या मार्गानेंच येतें, व त्या वेळीं हा मार्ग मूल सहज जाईल इतका विस्तृत होतो. याची लांबी तीनपासून पांच इंच असते. ज्यांना मुळींच मूल झालें नाहीं त्यांच्यापेक्षां ज्यांना मुलें झालीं आहेत अशा बायकांचा योनिमार्ग अधिक मोठा व सैल असतो. या योनिमार्गाचें मुख्य कार्य हें कीं, हा मार्ग म्हणजेच स्त्री-पुरुषसंभोगाची जागा होय. संभोगक्रियेच्या वेळीं पुरुषाचें इंद्रिय या जागीं असतें व त्यांतून होणारा वीर्यपात याच जागीं पडतो.

**कला**:—पुरुषसंयोग घडेपर्यंत स्त्रियांच्या योनिमार्गाच्या तोंडावर एक प्रकारच्या पापुद्र्याचें जें आवरण असतें त्याला 'कला' हें नांव आहे. इंग्रजींत याला 'हायमेन' (Hymen) म्हणतात. याच्या मध्यभागीं एक भोंक असतें. त्यांतून आर्तव किंवा इतर कोणत्याही


प्रकारचा स्राव बाहेर येऊं शकतो. स्त्री संभोगसुखाचा अनुभव प्रथम घेते त्या वेळीं हा पापुद्रा बहुतकरून फाटतो. मात्र कांहीं स्त्रियांच्या बाबतींत हा इतका चिवट असतो, कीं अनेक वेळां संभोग झाल्यानंतरही तो न फाटतां जसाच्या तसा राहतो. म्हणून हा पापुद्रा फाटलेला नसला तरी तें अभंग ब्रह्मचर्याचें लक्षण समजूं नये, किंवा तो फाटला असला तरी स्त्रीचें ब्रह्मचर्य नष्ट झालेंच आहे असें मानूं नये.

**बृहदोष्ठ**:—योनिमार्गाच्या द्वारापाशीं जिव्हणीच्या आकाराची जी जागा असते व जिच्यावर स्त्री वयांत आली कीं लोम उगवूं लागतात तिला 'बृहदोष्ठ' हें नांव आहे.

**योनिलिंग**:—बृहदोष्ठाच्या आंतल्या बाजूस एखाद्या मोडा-सारखा सुमारें एक इंच लांबीचा मांसल भाग असतो. त्याला 'योनिलिंग' म्हणतात.

**मूत्रमार्ग**:—योनिलिंगाच्या खालीं आणि योनिमार्गाच्या द्वाराच्या वरच्या बाजूस एक छिद्र असतें. तें मूत्रमार्गाचें द्वार होय. यांतून मूत्रोत्सर्ग होतो. स्त्रियांच्या जननेंद्रियाच्या रचनेसंबंधीं फारच थोड्या लोकांस माहिती असल्यामुळें बहुतेक लोकांची समजूत अशी असते, कीं स्त्रींचा मूत्रमार्ग व ज्या मार्गांत पुरुषलिंगाचा प्रवेश होतो ते दोन्ही मार्ग एकच असले पाहिजेत. परंतु ही समजूत साफ चुकीची आहे. योनिमार्ग आणि मूत्रमार्ग हे अगदीं भिन्न आहेत.

आतां गर्भधारणेची प्रत्यक्ष क्रिया कशी घडते तेंही आपणांस पाहिलें पाहिजे. वरील विवेचनांत सूक्ष्मांडपरिपाकाविषयीं आम्ही जें लिहिलें तें वाचकांच्या लक्षांत असल्यास गर्भधारणा कशी होते तें त्यांस चटकन समजेल. कारण स्त्रीच्या एका सूक्ष्मांडकांत पुरुषाच्या एका सूक्ष्मबीजाचा प्रवेश होऊन तें सुफलित होणें यापलीकडे गर्भ-धारणेचा कांहीं अर्थ नाहीं. सूक्ष्मांडक अशा रीतीनें सुफलित व्हावें



पुरुषाच्या वीर्यांतील सूक्ष्म बीज [ पृष्ठ ५७

यासाठीं प्रथम तें परिपक्क होऊन अंडाशयांतून बाहेर पडलें पाहिजे हें उघडच आहे. तें अंडाशयांतून बाहेर पडलें, कीं अंडवाहिनींत त्याला वाट दिली जाते आणि अंडवाहिनीला ज्या केंसासारख्या मांसल तंतूंचें अस्तर असतें त्यांच्यांत पाण्यांतील लाटांसारखी गति उत्पन्न होऊन तिच्या योगानें तें खालीं गर्भाशयाकडे सरकूं लागतें. याच सुमारास स्त्रीचा पुरुषाशीं संबंध घडला नाहीं तर हें सूक्ष्मांडक वाळून जातें, मरतें, अंडवाहिनींत किंवा गर्भाशयांत कोठें तरी चिकटून बसतें, किंवा ऋतुस्त्रावाच्या प्रवाहांत इतर द्रव्यांबरोबर बाहेर निघून जातें. पण याच वेळीं स्त्री-पुरुषसंबंध घडला तर मात्र या प्रकाराला निराळेंच वळण मिळतें. अशा वेळीं पुरुषाच्या वीर्यांतील हजारों सूक्ष्मबीज गर्भाशयमुखांतून आंत शिरतात आणि सूक्ष्मांडकाशीं संमीलित होण्याची तीव्र प्रवृत्ति त्यांच्या ठायीं निसर्गतःच असल्यामुळें त्याच्या शोधार्थ इतस्ततः भ्रमण करूं लागतात. हे सूक्ष्मबीज निसर्गतःच गतिमान असतात व त्यांची गति बरीच वेगाची असते. प्रत्येक सूक्ष्मबीज सात मिनिटांत एक इंच धांवतो असें म्हणतात. सूक्ष्मबीज स्वतः आकारानें $\frac{१}{३००}$ इंच असतो तेव्हां त्याची गति दर मिनिटाला त्रेचाळीस इंच असते असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. सूक्ष्मबीजांत दोन भिन्न विभाग स्पष्टपणें दिसतात. एक शीर्ष व दुसरें पुच्छ-शीर्ष चपटें असतें व पुच्छ पुढें जाड व मागें निमूळतें होत गेलेलें असतें. सोबत दिलेल्या आकृतीवरून सूक्ष्मबीजाची अधिक स्पष्ट कल्पना वाचकांस होईल.

गर्भाशयांत शिरल्यानंतर पुष्कळसे सूक्ष्मबीज आपोआप नष्ट होतात, आणि विशेष चिवट असे जे थोडे असतात तेवढेच शिल्लक राहून ते गर्भाशयांतून वर अंडवाहिनीकडे जावयास लागतात. अंडाशयांतून आधींच मुक्त झालेल्या सूक्ष्मांडकाच्या जसजसे ते जवळ येऊं लागतात तसतसे ते अधिकच वेगानें धांवूं लागतात. एखाद्या

चुंबकानें लोहकणांस आकर्षित करावें तशी त्यांची स्थिति होते. सूक्ष्मांडक जागच्या जागीं स्वस्थ असतें, पण हे सूक्ष्मबीज त्याच्याकडे धांवत सुटतात; आणि त्यांच्यापैकीं जो सगळ्यांत जवळ किंवा सर्वांत बलवान असेल तो सूक्ष्मांडाकडे भरारी मारून, आपल्या शीर्षानें त्याला भोंक पाडतो व त्यांत विलीन होतो. मग त्याचें पुच्छ नाहींसें होतें व त्याच्या शीर्षाचा एक नवीनच केंद्र बनतो. याप्रमाणें सूक्ष्मबीज सूक्ष्मांडकाशीं समरस झाल्याबरोबर ज्या भोंकांतून तो आंत शिरला तें अगदीं सीलबंद होतें, व दुसरा एखादा सूक्ष्मबीज त्यांतून आंत शिरण्याची शक्यता रहात नाहीं. अंडवाहिनीचें गर्भाशयाच्या जवळचें जें टोंक त्यांतच बहुधा सूक्ष्मांडक व सूक्ष्मबीज यांचें हें सम्मीलन घडून येतें. कधीं कधीं हें सम्मीलन याहूनही खालीं किंवा गर्भाशयांत किंवा अंडाशयांच्या पृष्ठावर देखील होतें.

सूक्ष्मांडक सुफलित झालें म्हणजे त्याला गर्भ ही संज्ञा प्राप्त होते. असें गर्भस्वरूप त्याला प्राप्त झालें म्हणजे त्याची एक विशिष्ट धडपड सुरू होते. गर्भाशयांत कायम कोठें तरी राहण्यासारखी जागा शोधण्यासाठीं गर्भ प्रथम प्रयत्न करतो. सूक्ष्मांडकाचें व सूक्ष्मबीजाचें सम्मीलन गर्भाशयांत घडलें असेल तर गर्भ तेथेंच राहतो. पण तें अंडवाहिनींत घडलें असेल—आणि तेथेंच तें बहुधा घडतें—तर गर्भ खालीं गर्भाशयांत उतरतो; आणि गर्भाशयाच्या अस्तरांत एखादी जागा शोधून तेथें चिकटतो. त्या ठिकाणींच त्याची वाढ होऊं लागते व ती वाढ नऊ महिन्यांनीं पूर्ण झाली म्हणजे गर्भाशयाचें द्वार खुलें होतें, व अपत्य बाहेर पडतें. ज्या क्षणीं सूक्ष्मांड व सूक्ष्मबीज हीं समरस होऊन गर्भाची घटना होते त्या क्षणापासून एक प्रकारची 'विभाजनक्रिया' (Segmentation) सुरू होते. सूक्ष्मांडक हें एका पेशीचें (cell) बनलेलें असतें. त्याचे प्रथम दोन विभाग होतात, त्या दोहोंचे चार होतात, त्या चारांचे आठ

होतात आणि हा क्रम इतका चालतो कीं, शेवटीं त्या विभागांची गणना करणें अशक्य होतें. नंतर या सर्व विभागांचे मिळून दोन थर बनतात व त्या दोन थरांत पोकळी असते. या दोन थरांपासूनच शरीराचे निरनिराळे अवयव हळुहळू बनतात, आणि शेवटीं सर्व अवयव ज्याला आहेत असें मूल तयार होतें.

या एकंदर विवेचनांतील एका गोष्टीकडे वाचकांनीं विशेष लक्ष द्यावें. ती गोष्ट ही, कीं:—

प्रतिमासीं अंडाशयांतून एक सूक्ष्मांडक परिपक्क होऊन बाहेर पडतें. हें सूक्ष्मांडक अमक्या कालावधींतच अंडवाहिनींत किंवा गर्भाशयांत असतें, व बाकीच्या कालावधींत तें त्या जागीं असण्याचा मुळींच संभव नसतो असें समजण्यास कांहींच आधार नाहीं. एका ऋतुस्नानापासून दुसऱ्या ऋतुस्नानापर्यंतच्या काळांत कोणत्याही वेळीं हें सूक्ष्मांडक अंडवाहिनींत किंवा गर्भाशयांत असण्याचा संभव आहे, व सूक्ष्मबीज व सूक्ष्मांडक यांचें संम्मीलन होण्याची शक्यता आहे. स्त्रीच्या गर्भाशयांत किंवा अंडवाहिनींत कोठेंही सूक्ष्मांडक आढळणें शक्य नाहीं असा कोणताच कालावधि समजतां येणार नाहीं, व त्यामुळें सूक्ष्मबीज गर्भाशयांत शिरले तरी त्यांची व सूक्ष्मांडकाची भेट होण्याची मुळींच शक्यता नाहीं असें केव्हांही म्हणतां यावयाचें नाहीं. हीच गोष्ट दुसऱ्या शब्दांत सांगावयाची झाल्यास असें म्हणूं, कीं सूक्ष्मबीज व सूक्ष्मांडक यांची गांठ पडण्याचा संभव सदाच असतो.

पण असा संभव सदाच असेल तर 'सुरक्षित काळा'ची कल्पना सर्वस्वी भ्रामक ठरते. स्त्रीच्या आर्तवानंतर आठ दिवस व अगोदर आठ दिवस गर्भ राहण्याचा संभव असतो, व उरलेल्या दिवशीं संभोग झाला तरी गर्भ राहणें शक्य नसतें, ही किंवा अशा प्रकारच्या इतर समजुती निराधार आहेत असेंच यावरून सिद्ध

होतें. आणि याचा उघड अर्थ असा होतो, कीं कांहीं रात्रीं संभोगास निषिद्ध व कांहीं विहित ठरविणें हा नियमित संभोगाचा किंवा ब्रह्मचर्याचा मार्ग संततिनियमनाच्या दृष्टीनें फलदायी होणें शक्य नाहीं. नियमित संभोग करून दोन तीन अपत्यांपलीकडे आपल्या संततीची मर्यादा आपण जाऊं देणार नाहीं अशी एखाद्यानें आशा करणें सर्वस्वी वेडेपणाचें आहे. कारण, संभोग घडल्यानंतर सूक्ष्मबीज व सूक्ष्मांडक यांची केव्हां गांठ पडेल त्याचा ठरीव नियम कांहींच नाहीं. त्या गांठीचा संभव सर्वदा असणार. संतति-नियमनासाठीं ब्रह्मचर्याचा मार्ग ज्याला पतकरावयाचा असेल त्यानें एक अपत्य झाल्यानंतर त्या व दुसऱ्या अपत्यांत तीन वर्षांचा कालावधि जाऊं देणें इष्ट आहे हें लक्षांत घेऊन, त्या तीन वर्षांत स्त्री सर्वस्वी वर्ज्य केली पाहिजे, दुसऱ्या अपत्यांनंतरही तीन वर्षें अशींच काढलीं पाहिजेत, व तीन अपत्यें झाल्यावर तर स्त्रीसुखाचा कायमचा त्याग केला पाहिजे. असें तो न करील तर त्याला संतति-नियमन साधणें शक्य नाहीं. परंतु, साधारण स्त्री-पुरुषांना इतक्या कठिण व्रताचें आचरण करणें शक्य आहे काय? ब्रह्मचर्य अतिशय आदरणीय आहे, त्यापासून अनेक गुणांचा उगम व उत्कर्ष होतो, व संततिनियमनासाठीं ब्रह्मचर्याचें आचरण लोकांनीं केल्यास त्यांत कोणत्याही प्रकारची नैतिक हानि होणार नाहीं-या सर्व गोष्टी खऱ्या. पण, सामान्य स्त्री-पुरुषांस ब्रह्मचर्याचें परिपालन जितक्या प्रमाणानें शक्य आहे तेवढ्यानें हवें तसें संततिनियमन होणें शक्य नाहीं त्याची वाट काय? सामान्यपणें तीन अपत्यांपेक्षां अधिक संततीचें उत्तम पालन पोषण करणें आज स्त्री-पुरुषांस शक्य नाहीं; आणि मानवी वासनांचा सामान्य क्रम व त्या वासनांवर सूज्ञपणें घालतां येणारें बंधन यांचा विचार करतां महिन्यांतून चार वेळां तरी संभोगसुखाची संधि स्त्री-पुरुषांस द्यावयास पाहिजे-या दोन गोष्टींचा मेळ घालावयाचा

कसा ? संभोगनियमनाचें इष्ट प्रमाण व व्यावहारिक प्रमाण यांच्यांत फार मोठें अंतर आहे त्याला उपाय काय ? सबंद जन्मांत आठ दहा वेळां संभोगसुख घेऊन संतुष्ट राहण्याची तपश्चर्या ज्यांना साधतां येईल त्यांची गणना महात्म्यांतच करावयास पाहिजे. अशा स्त्री-पुरुषांस वंदन करून त्यांचें चरणतीर्थ मस्तकावर धारण करणें उचितच होईल. परंतु अशीं माणसें अपवादात्मकच असणार. समाज असल्या साधुतुल्य स्त्री-पुरुषांचा बनलेला नसतो. समाज कितीही सुशिक्षित असला तरी आहार, निद्रा व मैथुन या नैसर्गिक वासनांची तृप्ति शून्यस्थानीं आणणें सामान्य स्त्री-पुरुषांस शक्य नाहीं. सबंद आयुष्यांत संभोगसुखाचा उपभोग आठ दहा वेळांच ध्या असें त्यांस सांगणें म्हणजे मानवी स्वभावाचा हिशेब न करतां कांहीं तरी बहकण्यासारखें आहे. सोसाट्याचा वारा सुटला तरी आपल्या शाखा हालवूं नका असा डोंगरपठारावरील वृक्षांना उपदेश करणें, किंवा अग्नीच्या जवळ राहूनही न वितळण्याचा लोण्याला आग्रह करणें— यांत जितकें शहाणपण आहे त्याच्याहून या ब्रह्मचर्याच्या उपदेशांत अधिक नाहीं. सुप्रजाजननासाठीं संततिनियमनाचा जो उपदेश आपणांस करावयाचा आहे तो समाजांतील सर्व वर्गांना व व्यक्तींना सारखाच करावयाचा आहे. अर्थात् संततिनियमनाचें जें साधन लोकांना आपण सांगूं तें असें पाहिजे, कीं सामान्य स्त्री-पुरुषांसही त्याचें आचरण करणें कठीण वाटणार नाहीं. कोणत्याही सामाजिक बाबतींत आचारनियम ठरवितांना कांहीं थोड्या अपवादात्मक व्यक्तींसाठीं नव्हे तर सामान्य स्त्री-पुरुषांसाठींच ते ठरविले पाहिजेत हें कधींही विसरतां कामा नये. या दृष्टीनें पाहतां, आज जितक्या प्रमाणांत संततिनियमन व्हावयास पाहिजे तितक्या प्रमाणांत संभोग-नियमन करणें मनुष्यस्वभावाच्या सर्वस्वी विरुद्ध अतएव अव्यवहार्य आहे. मग ब्रह्मचर्याच्या सुपरिणामाचे गोडवे कितीही खरे असले

तरी ते गाऊन संततिनियमनाचें एक साधन म्हणून त्याचा पुरस्कार करणें कितपत समर्थनीय ठरेल? ब्रह्मचर्य हें उत्तम व्रत असेल, परंतु ज्या कार्यासाठीं त्याचा उपयोग करावयाचा तें कार्यच त्यापासून साधत नाहीं, मग त्याच्या सत्त्वाचा आपल्याला उपयोग काय? सुवर्ण बहुमोल आहे यांत किमपि संशय नाहीं. परंतु, केवळ तें बहु-मोल आहे म्हणून लांकडें फोडावयासाठीं कोणी सोन्याची कुऱ्हाड बनविली तर त्याला कोण शाहणा समजेल, व त्याचा कार्यभाग कितपत साध्य होईल?

प्रकरण सहावें

# गर्भप्रतिबंधक कृत्रिम उपाय

स्त्रीच्या प्रतिमासिक अवस्थेंत गर्भधारणेला प्रतिकूल असा एक विशिष्ट काळ असतो ही कल्पना शास्त्रीय दृष्ट्या कशी भ्रामक आहे, त्यामुळें संततिनियमनार्थ संभोगनियमन करावयाचें म्हटल्यास तें किती प्रमाणांत करावयास पाहिजे, व हें प्रमाण मनुष्यस्वभावाच्या दृष्टीनें कसें असाध्य व अव्यवहार्य आहे, तें मागील प्रकरणावरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. पण संततिनियमनासाठीं संभोगनियमन किंवा ब्रह्मचर्य हें साधन योग्य नव्हे इतकें ठरविल्यानें आपल्या मुख्य प्रश्नाचा निकाल लागत नाहीं. उलट तो प्रश्न अधिक बिकट झाल्यासारखा वाटतो. सुप्रजाजननासाठीं स्त्री-पुरुषांनीं संततीचें नियमन केलें पाहिजे यांत शंका नाहीं, आणि या कामीं ब्रह्मचर्याच्या साधनाचा सार्वत्रिक उपदेश करण्यांत तर अर्थ नाहीं. मग संततीचें नियमन करण्याचा दुसरा कांहीं मार्ग आहे किंवा नाहीं ?

संततिनियमनाच्या अगत्याची तुतारी युरोपमध्यें ज्या मालथसनें प्रथम फुंकली त्यानें ब्रह्मचर्याचाच उपदेश लोकांना केला हें पूर्वी सांगितलेंच आहे. परंतु मालथसचा संततिनियमनाचा आग्रह जसा सर्वांना पटला तसा त्याचा ब्रह्मचर्याचा उपदेश सर्वांना ग्राह्य वाटला नाहीं. मागील प्रकरणांतील विवेचन ज्यांनीं लक्षपूर्वक वाचलें असेल त्यांना या प्रकाराचें आश्चर्य वाटणार नाहीं. ब्रह्मचर्याचें साधन संततिनियमनार्थ वापरावयाचें झाल्यास प्रत्येकानें जवळ जवळ तपस्वीच बनलें पाहिजे, व ही गोष्ट साफ अशक्य आहे हें मालथसच्या वेळच्या लोकांनाही समजलें होतें. मालथसचा संततिनियमनाचा उपदेश ज्यांना अतिशय पटला आणि या प्रश्नावर लोकमत जागृत

करणें अतिशय आवश्यक आहे असें ज्यांना वाटलें त्यांनीं 'मालथस मतवादी संघ'–The Malthusian League–नांवाची संस्था इंग्लंडांत १८७७ मध्यें स्थापन केली. त्या संस्थेची लोकप्रियता सारखी वाढत गेलेली आहे व आजही त्या संस्थेचें कार्य बहुजन समाजास पसंत आहे. संस्थेचें मूळ नांव बदलून अलीकडे New Generation League हें नांव संस्थेस देण्यांत देण्यांत आलें आहे. पण नांव बदललें तरी संस्थेच्या उद्देशांत व कार्यक्रमांत कोणताही महत्त्वाचा फरक झालेला नाहीं, आणि पहिल्याप्रमाणेंच आजही मालथसच्या संततिनियमनाविषयींच्या आग्रहाच्या पायावरच संस्थेच्या तत्त्वांची उभारणी झालेली आहे अशीच प्रत्येकाची भावना आहे. परंतु स्वतः मालथस व त्याच्या मतांचा अभिमान धरून पुढें सरसावलेली ही मंडळी यांच्या मतांत एक मोठा फरक पहिल्यापासून आहे व तो अजूनही कायम आहे. तो हा, कीं ब्रह्मचर्याच्या साधनानें संततिनियमन करण्याचा उपदेश जनतेला करावा हें मालथसचें म्हणणें या मंडळीस मुळींच मान्य नाहीं. ब्रह्मचर्याचा मार्ग अगदीं अव्यवहार्य व कुचकामाचा आहे अशी या मंडळींची खात्री आहे. त्यामुळें या मंडळीच्या तत्त्वांना 'मालथसच्या अभिमान्यांचा वाद'–Neo-Malthusianism–असें नांव जरी मिळून रूढ झालेलें असलें, तरी यांच्या वादांत व मूळ मालथसच्या वादांत–Malthusianism–साधनाच्या मुद्यावर फार महत्त्वाचा मतभेद आहे. Neo-Malthusianism म्हणजे काय व या वादांत कोणत्या कोणत्या मूलभूत मतांचा अंतर्भाव होतो त्याविषयीं New Generation League चे हल्लींचे अध्यक्ष मिस्टर सी. व्ही. ड्रिस्डेल यांनीं आपल्या The small Family System या पुस्तकाच्या प्रारंभीं थोडक्यांत पण मार्मिक खुलासा केला आहे. ते म्हणतातः—

" दारिद्य, रोग आणि अपमृत्यु या सर्व संकटांतून पार पडण्यास संततीचें नियमन करणें आणि प्रौढविवाहाचा जो अतिरेक झाला आहे त्याला आळा घालणें हे दोनच उत्तम उपाय होत अशा दृढ विश्वासाच्या पायावर आमच्या चळवळीची उभारणी झालेली आहे. म्हणून प्रौढ विवाहाचा अतिरेक न करतां हल्लींपेक्षां लवकर समाजांतील स्त्री-पुरुषांनीं विवाह करावा, आणि जितक्या मुलांना आपण उत्तम प्रकारचें अन्नवस्त्र व शिक्षण देऊन वाढवूं शकूं तितकीं-च मुलें आपल्याला होतील अशी खबरदारी विवाहित स्त्री-पुरुषांनीं घ्यावी असा आमचा आग्रहाचा उपदेश आहे. शिवाय आमचें असेंही ठाम मत आहे, कीं गर्भप्रतिबंधक कृत्रिम उपायांचें योग्य व पूर्ण ज्ञान प्रौढ स्त्री-पुरुषांस करून दिल्यानें त्यांजकडून संततिनियमन सहजच होईल, वेश्यागमनासारखे दुराचार व तदनुषंगिक विविध रोग आपो-आप नष्ट होत जातील, आणि एकंदर मानवी जातीचें बौद्धिक व शारीरिक वैभव वाढेल."

संततिनियमनाचा प्रश्न हातीं घेतला व त्या प्रश्नाविषयीं लोकमत जागृत करून त्यांना एखादा व्यवहार्य मार्ग दाखवावयाचा म्हटला म्हणजे ब्रह्मचर्याचा मार्ग कसा साहजिकपणेंच त्याज्य वाटूं लागतो तें वाचकांस यावरून अधिक स्पष्टपणें दिसून येईल. केवळ एक तात्त्विक विषय म्हणून नव्हे तर समाजांतील स्त्री-पुरुषांनीं आपल्या आचरणांत आणण्याची एक सुधारणा या दृष्टीनें इंग्लंडमधील लोक जेव्हांपासून या संततिनियमनाच्या प्रश्नाकडे पाहूं लागले तेव्हांपासून-च ब्रह्मचर्याची निष्फलता आणि गर्भप्रतिबंधक कृत्रिम उपायांची आवश्यकता त्यांना पटूं लागली. गर्भप्रतिबंधक कृत्रिम उपायांच्या चर्चेकडे लोकांचें लक्ष १८७६ पर्यंत फारसें वळलें नव्हतें. किंबहुना त्या सालापर्यंत केवळ विवादक मंडळांच्या चर्चेचा विषय यापलीकडे माल्थसच्या सिद्धान्तास कांहीं महत्त्व नव्हतें, आणि त्या सिद्धान्ताची

किंवा त्यावरून उद्भवणाऱ्या अनेक प्रश्नांची दादही बहुजनसमाजाला नव्हती. पण १८७६ सालीं एक विलक्षण हकीगत घडून आली, व तेव्हांपासून गर्भप्रतिबंधक कृत्रिम उपायांची चर्चा इंग्लंडमध्यें जो तो करूं लागला आणि त्या उपायांचें ज्ञान इंग्लंडांतच केवळ नव्हे तर इतर देशांतही झपाट्यानें पसरलें. ती विलक्षण हकीगत अशी:—

अमेरिकेमध्यें बोस्टन शहरांतील एक डॉक्टर चार्ल्स नोल्टन यांनीं १८३३ मध्यें 'ज्ञानफलें' (Fruits of Philosophy) नांवाचें एक पुस्तक लिहिलें व त्यांत गर्भप्रतिबंधक कृत्रिम उपायांचें विवरण केलें. चाळीस वर्षांपर्यंत या पुस्तकाचा थोडा फार खप चालू होता, पण असें एखादें पुस्तक असल्याचेंही फारसें कोणाला माहीत नव्हतें. पण शेवटीं कांहीं शाहण्यांना वाटलें, कीं असल्या अनीतिमान पुस्तकाचा कायद्याच्या जोरावर नायनाट करावा. त्याप्रमाणें ब्रिस्टल शहरीं तें पुस्तक विकल्याबद्दल पोलिसांनीं एका माणसावर खटला भरला व त्या माणसाला कोर्टांत शिक्षा झाली. पुढच्या वर्षीं त्या पुस्तकाच्या प्रकाशकालाही कोर्टांत खेंचण्यांत आलें व त्याचें प्रकाशन ताबडतोब बंद करण्याचें त्यानें वचन दिल्यावर त्याची सुटका करण्यांत आली. हें पाहून त्या पुस्तकाचा कैवार घेऊन कायद्याच्या जुलमाविरुद्ध झगडण्याचें ॲनी बेझंट आणि चार्ल्स ब्रॅडलॉ यांनीं ठरविलें. त्यांनीं त्या पुस्तकाचें पुनर्मुद्रण करून तें प्रकाशित केलें, व सरकारनें आमच्यावर खटला भरावा अशी आमची इच्छा आहे असें सरकारला उघड उघड आव्हान दिलें. 'आम्हांला केवळ त्या छोट्या पुस्तकाचा कैवार घ्यावयाचा होता असें नव्हे तर त्या पुस्तकांतील विचारासारख्या विचारांचा उघड पुरस्कार ज्यांना करावयाचा असेल त्या सर्वांचा मार्ग एकदां कायमचा निष्कंटक व्हावा म्हणून आम्ही कोर्टाची शिक्षा देखील भोगावयास तयार झालों' असें त्यांनीं आपल्या खटल्याच्या अहवालाच्या

प्रस्तावनेंत म्हटलें आहे. ॲनी बेझंट व ब्रॅडलॉ यांच्या आव्हानाला सरकारकडून ताबडतोब प्रत्युत्तर मिळालें. त्यांच्यावर खटला भरण्यांत आला व एक बीभत्स पुस्तक प्रकाशित करून विकल्याचा आणि सामाजिक नीति बिघडविल्याचा अशा दोन आरोपांवर त्यांची चौकशी सुरू झाली. या चौकशीच्या वेळीं जबानी देतांना ब्रॅडलॉ यांनीं गर्भप्रतिबंधक कृत्रिम उपायांच्या प्रश्नांचें फार मार्मिक समर्थन केलें, आणि ॲनी बेझंटनीं तर अत्यंत वक्तृत्वपूर्ण भाषण करून 'ज्ञानफलें' या पुस्तकांत कोणत्याही प्रकारची बीभत्स चर्चा नसून शारीर शास्त्रांतील चार साध्या गोष्टी साध्या भाषेंत सांगितल्या असल्यामुळें असल्या पुस्तकावर हल्ला म्हणजे मतस्वातंत्र्यावरच हल्ला करण्यासारखें असल्याचें त्यांनीं आवेशपूर्ण शब्दांनीं ज्यूरीला बजावून सांगितलें. खटल्याचा निकाल ॲनी बेझंट यांस प्रतिकूल झाला. पण त्यांनीं त्यावर अपील केलें व त्यांत त्यांची सरशी होऊन त्यांच्या पुस्तकाच्या जप्त झालेल्या सर्व प्रति त्यांना परत मिळाल्या.

या खटल्यामुळें जिकडे तिकडे खळबळ उडाली. गर्भप्रतिबंधक कृत्रिम उपायांची चर्चा बंद करण्याच्या हेतूनें सरकारनें या खटल्याचा खटाटोप केला. पण त्याचा परिणाम अगदीं उलट झाला. कृत्रिम गर्भप्रतिबंधकांविषयीं लोकांमध्यें अधिकच कुतूहल उत्पन्न झालें आणि तो प्रश्न अनेक महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांपैकीं एक होऊन बसला. संततिनियमनाविषयीं आणि गर्भप्रतिबंधकांच्या आवश्यकतेविषयीं लोकांचीं मनें अतिशय जागृत झालीं. १८७७ सालीं Malthusian League ही संस्था इंग्लंडमध्यें अस्तित्वांत आली हें या सार्वजनिक जागृतीचेंच एक लक्षण होय, व या जागृतीचाच परिणाम होऊन आज पन्नास वर्षांच्या अवधींत अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, हॉलंड वगैरे पाश्चात्य देशांत व जपानसारख्या प्रगतिपर पौर्वात्य देशांतही संततिनियमनाची चळवळ करणाऱ्या अनेक

संस्था स्थापन झाल्या आहेत. संततिनियमनाच्या प्रश्नांची आणि कृत्रिम गर्भप्रतिबंधकांची चर्चा करण्याच्या कार्यास सर्वस्वी वाहिलेलीं अशीं कित्येक नियतकालिकें आणि साप्ताहिकें आज उत्तम प्रकारें चाललेलीं आहेत; व या प्रश्नाचा खल करण्याकरितां सर्वराष्ट्रीय परिषदा भरत आहेत. सारांश, जगाच्या दृष्टीपुढें प्रामुख्यानें असणाऱ्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नांपैकीं हा प्रश्न आज होऊन बसला आहे. या दृष्टीनें १८७६ या सालाचें वर्णन 'क्रांतिकारक १८७६ साल' असें करणेंच योग्य होईल.

अशा परिस्थितींत कृत्रिम गर्भप्रतिबंधकांच्या प्रश्नाविषयीं शिष्ट-पणाचा आव आणून नाक मुरडल्यानें काम भागावयाचें नाहीं. ज्या प्रश्नाच्या लाटा साऱ्या जगावर आदळत आहेत त्यांच्याकडे नुसती डोळेझांक केल्यानें किंवा सभ्यपणाची वृथा कल्पना हृदयाशीं बाळगून लोकांना उपदेश केल्यानें कोणतेंही हित व्हावयाचें नाहीं. त्या लाटा हळुहळू आपल्या घरांत येऊन पोंचल्यावांचून राहणार नाहींत. प्रति-ष्ठितपणाच्या केरसुणीनें त्या आपण दूर ढकलूं लागलों तर आपणच हास्यास्पद ठरूं! जो प्रश्न जिव्हाळ्याचा आहे त्या प्रश्नाची सरळ सोडवणूक करणें अगत्याचें आहे. जो प्रश्न रात्रंदिवस सामान्य स्त्री-पुरुषांच्या मनांत घोळत आहे व ज्या प्रश्नाविषयीं उघड व निर्भीड उहापोह झाला नाहीं तर अर्धवट ज्ञान संपादन करण्याची प्रवृत्ति लोकांच्या अंगीं राहील व तसल्या प्रवृत्तीचे नेहमींचे सर्व दुष्परिणाम मागोमाग येतील, त्या प्रश्नाविषयीं भलता सोंवळेपणा दाखविण्यांत कोणतीही सूज्ञता नाहीं. एखाद्या प्रश्नाची उपेक्षा करणें म्हणजे कांहीं तो सोडविणें नव्हे; आणि आज आपण त्याची उपेक्षा केली तरी त्याची सोडवणूक कायमची लांबणीवर टाकणें शक्य नाहीं. आपण आपल्या घराच्या खिडक्या बंद केल्या तरी सूर्यकिरणांचा आपण प्रतिबंध करूं शकूं काय? खिडक्यांच्या फटींतून, भिंतीच्या भोंकां-

तून, सांपडेल त्या झरोक्यांतून तीं प्रविष्ट झाल्यावांचून कधींही राहणार नाहींत. त्यापेक्षां मोकळ्या मनानें खिडक्या उघड्या टाकून त्यांचें स्वागत करणें अधिक हितावह नव्हे काय ?

ब्रह्मचर्याचा मार्ग अव्यवहार्य ठरल्यावर कृत्रिम गर्भप्रतिबंधकांच्या मार्गाचा विचार केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हे मार्ग शोधून काढण्याच्या हेतूनें अनेकांनीं अनेक प्रकारें विचार केला आहे व आपापल्या परीनें अनेक सूचना केल्या आहेत. त्यांपैकीं प्रमुख सूचनांचा आपण थोडक्यांत विचार करूं व सर्वांत ग्राह्य सूचना कोणती दिसते तें ठरवितां आल्यास पाहूं.

स्त्रीच्या ठिकाणीं गर्भ राहण्याच्या वेळीं काय काय घडामोड होते तें आमच्या वाचकांस माहीत झालेंच आहे. त्यावरून त्यांस हें सहज पटेल, कीं गर्भधारणा व्हावयाची झाल्यास पुढील चार गोष्टी घडल्याच पाहिजेत:—(१) गर्भाशयमुखापाशीं पुरुषाचें वीर्य पडलें पाहिजे, (२)त्या वीर्यांतील सूक्ष्मबीज गर्भाशयांत शिरले पाहिजेत, (३) सुफलित व्हावयास तयार अशा एका सूक्ष्मांडकांत त्यांपैकीं एका सूक्ष्मबीजानें प्रवेश केला पाहिजे, आणि (४) त्यामुळें तें सूक्ष्मांडक सुफलित झालें पाहिजे.

यावरून हें उघडच होतें, कीं गर्भधारणेचा प्रतिबंध करावयाचा असल्यास खालील चार उपाय शक्य आहेत:—

( १ ) गर्भाशयमुखापाशीं पुरुषाचें वीर्य पडणारच नाहीं असें करणें,

( २ ) वीर्य पडूं देणें परंतु कांहीं रासायनिक द्रव्यांनीं त्यांतील सूक्ष्मबीजांचा नाश करणें,

( ३ ) शस्त्रक्रियेच्या साहाय्यानें पुरुषास किंवा स्त्रीस किंवा दोघांसही निर्वीय करणें, आणि

( ४ ) कशा तरी प्रकारें गर्भाशयाचें मुख झांकून टाकून बंद करणें.

पहिला उपाय योजावयाचा झाल्यास, म्हणजे गर्भाशयमुखाजवळ वीर्यपात होण्यासच प्रतिबंध करावयाचा झाल्यास, तो दोन तऱ्हांनीं करतां येतो.

( १ ) त्रुटित संभोग, किंवा

( २ ) पुरुषाच्या इंद्रियावर घट्ट बसणारी रबराची पिशवी.

संभोग क्रिया कांहीं काळ झाली, कीं वीर्यपात होण्याचीं चिन्हें पुरुषास कळतात. हीं चिन्हें समजतांच वीर्यपात होण्यापूर्वींच इंद्रिय बाहेर काढून घेणें यास 'त्रुटित संभोग' असें नांव दिलेलें आहे. अशा प्रकारें संभोग तोडल्यानें व वीर्यपात योनिमार्गांत होऊं न देतां बाहेर होऊं दिल्यानें वीर्यांतील सूक्ष्मबीज गर्भाशयांत शिरण्याची शक्यता उरणार नाहीं, अशा समजुतीनेंच या पद्धतीची कल्पना प्रथम निघाली असली पाहिजे. ही समजूत पुष्कळांना खरी वाटते, व अनेक लोक या पद्धतीचें अवलंबन करतात असें आमच्या ऐकण्यांत आलें आहे. परंतु ही पद्धति सदोष व दुष्परिणामी असल्यामुळें संततिनियमनासाठीं या पद्धतीचा उपयोग कोणीही करूं नये असेंच विद्वानांचें आणि शास्त्रज्ञांचें मत आहे.

कारण पहिली गोष्ट अशी, कीं ज्या उद्देशानें या पद्धतीचा उपयोग करावयाचा तो उद्देश तिच्या योगानें खात्रीनें साध्य होईलच असें सांगवत नाहीं. संभोगाच्या वेळीं पुरुषाच्या भावना विलक्षण उद्दीप्त झालेल्या असतात व त्याच्या शरीराची अवस्थाही एखाद्या तंतुवाद्याच्या ताणलेल्या तारेप्रमाणें झालेली असते. अशा अवस्थेंत काय होईल किंवा काय न होईल तें निश्चयानें जाणणें त्यास कठीण असतें. त्यामुळें इंद्रिय बाहेर काढून घेण्याच्या आधीं एकाएकीं वीर्यपात व्हावयाचा संभव पुष्कळ असणार. शिवाय संभोग क्रियेची पूर्ण परिणति म्हणून अखेर जो वीर्यपात होतो, व जो होण्याच्या आधीं पुरुष थोडा फार सावध होऊं शकतो, त्या वीर्यपाताखेरीज संभोग-

समयीं वीर्याचा थोडा थोडा पाझर अगोदरपासूनच होत असतो. या पाझरणाऱ्या वीर्यांत सूक्ष्मबीज असण्याचा संभव नाहीं असें नाहीं. कारण पुरुषाचें इंद्रिय कांहीं वेळ उद्दीप्त स्थितींत राहिल्यानंतर त्याच्या मुखावर जे एक प्रकारच्या द्रवाचे बिंदू येतात त्यांत देखील सूक्ष्मबीज असल्याचें सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानें दाखवितां येतें परंतु वीर्यपात होण्यापूर्वीं संभोग त्रुटित केल्यानें गर्भाशयमुखाजवळ सूक्ष्मबीज पडण्याचा संभव पुरा बंद करितां येईल असें क्षणभर गृहीत धरलें तरी देखील दुसऱ्या एका महत्त्वाच्या कारणासाठीं ही त्रुटित संभोगाची पद्धति त्याज्य समजली पाहिजे. तें कारण हें कीं, अशा त्रुटित संभोगाचा पुरुषाच्या व स्त्रीच्या देहावर आणि मनावर अतिशय घातुक परिणाम होतो. वर आम्हीं म्हटलेंच आहे, कीं संभोगाच्या वेळीं पुरुषाच्या भावना अतिशय उद्दीप्त अवस्थेंत असतात. अशा वेळीं त्या भावनांचा निरोध करावयास आणि शांत गंभीर विचाराचें दडपण त्यांवर घालावयास पुरुषास सांगणें म्हणजे त्यास आपल्या प्रकृतीच्या वृक्षावर कुऱ्हाड मारून घ्यावयास सांगण्यासारखेंच आहे. असल्या कृतीचा प्रकृतीवर दुष्परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. शिवाय दुसरीही एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. नेहमींप्रमाणें योनिमार्गांत वीर्यपात झाला म्हणजे पुरुषाचें इंद्रिय योनिमार्गाच्या मऊ व मांसल आवरणांत धरल्यासारखें असतें, व त्या मऊ आवरणामुळें त्याच्या प्रक्षुब्ध अवस्थेचा परिहार चांगल्या प्रकारें होतो. प्रक्षोभानंतर असा परिहार होणें अत्यंत आवश्यक असतें. पण त्रुटित संभोगाच्या पद्धतीचें अवलंबन करून बाहेर वीर्यपात केल्यास हा परिहार अशक्य होऊन बसेल व त्यामुळें इंद्रियास कालांतरानें अपाय झाल्यावांचून राहणार नाहीं. स्त्रीस तर या प्रकारानें पुरुषापेक्षांही अधिक इजा होण्याचा संभव आहे. पहिली गोष्ट ही, कीं असल्या संभोगामुळें

स्त्री अतृप्त राहील आणि तिच्या शरीरावरही त्याचा वाईट परिणाम होईल. संभोगक्रियेमुळें अंडाशय, अंडवाहिनी, गर्भाशय आणि योनिमार्ग हीं सर्व अतिशय प्रक्षुब्ध होतात. आणि हा प्रक्षोभ शांत होण्यास स्त्री-पुरुषांच्या एकत्र वीर्यपातांतच त्या क्रियेची परिणति होणें जरूरीचें असतें. तशी परिणति न झाल्यास त्या क्षोभाची शांति होत नाहीं व त्याचा एकंदर शरीरावर परिणाम होतो. जे पुरुष त्रुटित संभोगाचें आचरण करतात त्यांच्या स्त्रियांस कमर दुखणें, ठणकणें, ओढ लागणें अशासारख्या व्यथा बहुतकरून कायमच्या जडतात. दुसरें असें कीं, वीर्यद्रव स्त्रीच्या ठिकाणीं पडून तें कांहीं अंशानें तरी स्त्रीच्या देहांत मुरल्यास त्यापासून फार चांगला परिणाम होतो. स्त्रीच्या देहाच्या संवर्धनास या द्रव्याची फार मदत होते. पण बाहेर वीर्यपात झाल्यानें ही गोष्ट अशक्य होऊन बसते. सारांश, त्रुटित संभोगाचा प्रकार साध्याच्या दृष्टीनें निरुपयोगी आहे, इतकेंच नव्हे तर तो हितपरिणामी नसून स्त्री व पुरुष या दोघांच्याही शरीराची त्यामुळें हानि झाल्यावांचून राहणार नाहीं.

गर्भाशयमुखाजवळ वीर्य पडूं न देण्याची तजवीज दुसऱ्याही एका प्रकारानें करतां येण्यासारखी असते. तो प्रकार म्हणजे पुरुषानें आपल्या इंद्रियावर एक पातळ रबराची पिशवी घालणें हा होय. अशा रबराच्या पिशव्या बाजारांत मिळतात व वीर्यपात झाला कीं तो पिशवींतल्या पिशवींतच रहावा, बाहेर पडूं नये अशा युक्तीनें त्या बनविलेल्या असतात. 'फ्रेंच लेटर्स' या नांवानें त्या विकल्या जातात. अशी पिशवी वापरल्यानें गर्भप्रतिबंध करतां येतो अशी पुष्कळांची समजूत आहे. पण ही समजूत चुकीची आहे. कारण एक तर या पिशवीची बनावट अतिशय सफाईची व निर्दोष असेल आणि प्रत्यक्ष संभोगक्रियेंत ती मागें पुढें किंचित्‌ही न सरकतां

पुरुषाच्या इंद्रियावर जागच्या जागीं घट्ट बसेल तरच त्यामुळें इष्ट कार्य सिद्धीस जाईल. पण या दोन अटी पाळल्या जाणें बहुतेक अशक्य असतें. बाजारांत मिळणाऱ्या पिशव्या अगदीं कनिष्ठ प्रतीच्या रबराच्या केलेल्या असतात, व शिवाय दुकानदाराच्या संग्रहीं त्या बऱ्याच जुन्या होऊन गेलेल्या असण्याचाही पुष्कळ संभव असतो. असें असलें म्हणजे पिशवीस बारीक बारीक भोंकें असतात. हीं बारीक भोंकें आपल्या साध्या डोळ्यांस दिसत नाहींत. पण त्यांतून वीर्य बाहेर गळेल इतकीं मात्र मोठीं तीं असतात. यासाठीं असल्या पिशव्या वापरावयाच्याच असतील त्यांनीं निदान पिशवी विकत घेतांना ती इंडिया-रबरची, 'गटापर्चा'ची किंवा 'काऊटकॉंक'ची बनविलेली आहे अशी खात्री करून घ्यावी, आणि घेतल्यावर ती उष्ण जागीं न ठेवण्याची व खिशांत घालून इकडे तिकडे वाटेल तशी न वागविण्याची खबरदारी घ्यावी. पण हें सर्व केलें तरी या प्रश्नावरील मुख्य आक्षेप कायम राहतोच, व तोच फार महत्त्वाचा आहे. तो हा कीं पुरुषानें ही पिशवी वापरली म्हणजे त्याचें इंद्रिय आणि योनिमार्गाचा मांसल भाग यांचा स्पर्श अशक्य होतो; आणि हा स्पर्श म्हणजे तर संभोगसुखाचें सारसर्वस्व होय. अर्थातच पुरुषानें पिशवी घातली असतां संभोगसुखांत पुष्कळच न्यूनता उत्पन्न होते. तसेंच वीर्यद्रव स्त्रीच्या शरीराशीं समरस होण्यापासून जे सुपरिणाम व्हावयाचे त्यांचाही संभव त्रुटित संभोग प्रकाराप्रमाणेंच याही प्रकारांत नाहींसा होत असल्यामुळें हा प्रकार अप्रशस्तच ठरतो, व या प्रकाराचा स्त्रीच्या प्रकृतीवर वाईट परिणाम होण्याचें भय आहे असेंच म्हणावें लागतें. आणि याखेरीज शारीर शास्त्रज्ञांचें असेंही म्हणणें आहे, कीं ज्या पुरुषाच्या इंद्रियाची नैसर्गिक स्तंभनप्रवृत्तिच फारशी जोराची नाहीं अशा पुरुषानें नेहमीं पिशवी वापरल्यानें त्याचें पुरुषत्वही कमी कमी होण्याची भीति असते.

सारांश, सर्व दृष्टींनीं विचार केला असतां पुरुषानें रबराची पिशवी—फ्रेंच लेटर—वापरणें हें निरुपयोगी व दुष्परिणामी असून गर्भप्रतिबंधासाठीं या पद्धतीचा अवलंब करणें केव्हांही हिताचें होणार नाहीं.

आतां योनिमार्गांत वीर्य पडूं देणें परंतु रासायनिक द्रव्यांनीं त्यांतील सूक्ष्मबीजांचा नाश करणें हा मार्ग कितपत श्रेयस्कर आहे तें पाहूं. प्रथम हें सांगितलें पाहिजे, कीं या मार्गाची सिद्धता दोन प्रकारांनीं करतां येण्यासारखी आहे. ( १ ) एक प्रकार असा कीं संभोगक्रियेच्या आधींच योनिमार्गांत कांहीं तरी बीजनाशक द्रव्य घालून ठेवून वीर्य त्या ठिकाणीं पडतांच त्यांतील सूक्ष्मबीज नष्ट होतील अशी व्यवस्था करणें. (२) दुसरा प्रकार असा कीं, संभोग क्रियेनंतर ताबडतोब योनिमार्ग कोणत्या तरी द्रव्याची पिचकारी मारून धुवून काढून सूक्ष्मबीजांस नाहींसें करणें.

दुसऱ्या प्रकाराचा विचार प्रथम करूं. योनिमार्ग धुण्यासाठीं पिचकारी मारावयाची झाल्यास अनेक लोकांनीं अनेक द्रव्यें सुचविलेलीं आहेत. परंतु पिचकारीचे निरनिराळे प्रकार किंवा पिचकारीसाठीं वापरण्यांत येणाऱ्या निरनिराळ्या पदार्थांचे गुणधर्म यांची चर्चा करण्याचें आपणांस प्रयोजन नाहीं. पिचकारीसाठीं अमुक द्रव्य चांगलें किंवा वाईट हें सांगण्यापेक्षां पिचकारीच्या या प्रकारांत तत्त्वतः मुळांतच जो दोष आहे तो वाचकांस उघड करून सांगणेंच अधिक अगत्याचें आहे. तो दोष असा, कीं या प्रकारानें इष्ट हेतु सफल होण्याचा भरंवसा बाळगतां येण्यासारखा नाहीं. वीर्यपातांत पडणारे सूक्ष्मबीज अतिशय गतिमान असतात व ते योनिमार्गांत पडल्याबरोबर खूप वेगानें गर्भाशयाकडे जाऊं लागतात ही गोष्ट आम्हीं वाचकांस मागेंच सांगितली आहे. सूक्ष्मबीजांचा स्वभाव असा असल्यामुळें संभोगक्रियेनंतर स्त्रीनें उठून पिचकारी घ्यावयाची झाल्यास त्यास जो कालावधि लागणार तो कितीही अल्प असला तरी तेवढ्यांत देखील

सूक्ष्मबीजांचा गर्भाशयांत प्रवेश आधींच झालेला असणें अगदीं सहज शक्य आहे. अशा स्थितींत स्त्रीनें पिचकारी घेणें म्हणजे 'बैल गेला झोपा केला' या म्हणींतील सावधगिरीइतकेंच हास्यास्पद आहे. शिवाय संभोगाच्या वेळीं स्त्री व पुरुष दोघेंही जेव्हां सारखींच अत्यंत कामातुर व परस्परानुरक्त असतात आणि जेव्हां संभोग क्रिया पूर्णांशानें मनसोक्त अशी होते, त्या त्या वेळीं पुरुषाचें इंद्रिय गर्भाशयमुखांत शृंखलित होतें आणि मग गर्भाशयांत सूक्ष्म-बीजांचा प्रवेश कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध न उरतां आणि आल्पावधिही न लागतां एकदम होतो. असें झालें म्हणजे पिचकारी घेण्यांत काय अर्थ उरणार? आगीनें घर जळून खाक झाल्यानंतर आगीचा बंब बोलावण्याइतकेंच तें शहाणपणाचें ठरणार नाहीं काय? या पिचकारीच्या प्रकारावरील दुसराही एक आक्षेप विचार करण्यासारखा आहे. संभोग क्रिया संपून वीर्यच्युति झाल्यानंतरही कांहीं काळ त्या तशा परस्पर संलग्न स्थितींत पतिपत्नींनीं राहणें अनेक दृष्टींनीं हितकारक असतें. त्यामुळें असें पडून राहण्याचें सोडून संभोग संपल्याबरोबर आधीं त्वरेनें स्त्रीनें पिचकारीची व्यवस्था करण्यांत स्त्री-पुरुषांच्या शरीरास हानि होण्यासारखी आहे, आणि दोघांच्या मनाची प्रसन्नताही नाहींशी होण्याची भीति आहे.

संभोगक्रियेच्या अगोदरच योनिमार्गांत बीजनाशक द्रव्यें घालून ठेवण्याच्या पद्धतींत हा उपरिनिर्दिष्ट दुसरा दोष उत्पन्न होणार नाहीं हें कबूल आहे. असल्या द्रव्यांच्या बारीक चपटचा वड्या हल्लीं बाजारांत विकत मिळतात. त्या Tablets किंवा Pessraies या नांवानें ओळखल्या जातात. 'कोकोबटर' म्हणून जें एक रासायनिक द्रव्य मिळतें त्यांत कोयनेल मिसळून अशा वड्या बनवितां येतील. किंवा या कोकोबटरला जो एक प्रकारचा वास मारतो तो नकोसा वाटत असेल तर तो टाळण्यासाठीं 'जिलेटिन' नांवाच्या पदार्थांत

कोयनलचें मिश्रण तयार केल्यानेंही कार्यभाग साधतो. बाजारांत मिळणाऱ्या वड्या महाग असतात. त्या न घेतां घरच्या घरीं वड्या तयार करावयाच्या असल्या तर पुढील दोन प्रमाणें उपयोगी पडतील:—

### प्रमाण १ लें

| | |
|---|---|
| १ कोकोबटर | ¼ पाऊंड |
| २ बोरॅक्स | ९ ड्राम |
| ३ सॅलिसिटिक ॲसिड | १ ,, |
| ४ कोयनेलचें बायसल्फेट | १½ ,, |

प्रथम कोकोबटर मंदाग्नीवर ठेवून पातळ करावें आणि मग त्यांत बाकीचे पदार्थ टाकून लांकडी पळीनें घुसळून ढवळावें. सर्व पदार्थ एकजीव होईपर्यंत ढवळणें चालू ठेवावें. नंतर तें मिश्रण थंड होऊन घट्ट बनेपर्यंत वाट पहावी, व मग त्याच्या तीस सारख्या वड्या पाडाव्या.

### प्रमाण २ रें

| | |
|---|---|
| १ जिलेटिन | १ भाग |
| २ ग्लिसरीन | ९ ,, |
| ३ कायनेलचें बायसल्फेट, हायड्रो–क्लोराइड किंवा हायड्रो क्लोरेल | ½ ,, |
| ४ पाणी | २ ,, |

कोकोबटरमध्यें केलेल्या वड्या उपयुक्ततेच्या दृष्टीनें अधिक चांगल्या. त्याचा वास ज्यांना खपत नाहीं त्यांनीं त्याची एक सुगंधित केलेली जात विकत मिळते ती वापरावी.

परंतु या प्रमाणाप्रमाणें केलेल्या किंवा इतर तयार मिळणाऱ्या बाजारांतील वड्या वापरण्याची शिफारस आम्हांस करतां येत नाहीं. कारण या प्रकारानें इष्ट हेतूची साध्यता होणें कठिण आहे. आम्ही

पूर्वीं सांगितलेंच आहे, कीं सूक्ष्मबीज अत्यंत चपल असतात. त्यामुळें बीजनाशक वडीनें अस्पृष्ट अशी केंसाएवढी सूक्ष्म जागा जरी राहिली तरी तेवढी देखील पुरेशी होऊन सूक्ष्मबीज वर गर्भाशयांत जाणें अगदीं सहज शक्य आहे. आणि असें झाल्यावर गर्भसंभव उरणारच. शिवाय वडी कोणत्याही पदार्थांची बनविलेली असली तरी तिच्यांत एक मोठा दोष असा राहतो, कीं वीर्य योनिमार्गांत पडलें तरच त्यावर वडीची विनाशक क्रिया घडणें शक्य आहे. पण शास्त्रज्ञांच्या मतें पुष्कळ वेळां स्त्रीची वीर्यच्युति होतांना पुरुषाचें वीर्य गर्भाशयाकडून वर ओढलें जातें. अशा प्रकारें वर ओढल्या गेलेल्या वीर्याचा गर्भाशयांत प्रवेश आपोआप झाल्यामुळें त्याच्यावर वडीचा कोणताही परिणाम व्हावयाचा नाहीं हें उघड आहे. तसेंच मागें आम्ही दर्शविल्या-प्रमाणें, कित्येक वेळां संभोगक्रियेंत पुरुषाचें इंद्रिय व गर्भाशयमुख एकमेकांशीं शृंखलित होतात, व मग सूक्ष्मबीजांचा प्रवेश गर्भाशयांत एकदमच होतो. असें झालें म्हणजेही वड्यांचा विनाशक परिणाम वीर्यावर होणें अशक्य होऊन बसतें. सारांश, रासायनिक द्रव्यांच्या योगानें सूक्ष्मबीजांचा नाश करण्याचा कोणताच प्रकार निर्दोष नाहीं. मात्र रासायनिक द्रव्यें वापरण्याच्या या प्रकाराला दुसऱ्या एका उपायाची जोड दिली असतां गर्भप्रतिबंधकाचें कार्य चांगल्या प्रकारें साधेल. तो उपाय कोणता तें आपण पुढें पाहूं. त्यापूर्वीं शस्त्रक्रियेच्या साहाय्यानें स्त्रीस किंवा पुरुषास किंवा दोघांसही निर्वीर्य करण्याचा मार्ग कितपत आचरणीय आहे तें पाहूं. इंग्लंडमधील नॉर्मन हेअर नांवाच्या डॉक्टरानें या विषयाचा विशेष विचार करून त्याबद्दल अनेक प्रयोगही करून पाहिले आहेत. क्ष-किरणांच्या साहाय्यानें स्त्रीस किंवा पुरुषास निर्वीर्य करण्याचा एक प्रयोग कांहीं शस्त्रवैद्य करतात. परंतु हा प्रयोग विशेष प्रशस्त नाहीं असें डॉ० नॉर्मन हेअरचें मत आहे. शस्त्रक्रियेच्या साहाय्यानें निर्वीर्यता उत्पन्न

करण्याचा प्रयोगच तो पसंत करतो. पुरुषावर हा प्रयोग करावयाचा झाल्यास “ Vas deferens ” नांवाची दोन्ही बाजूची शीर मध्यें कापून टाकतात. स्त्रीवर प्रयोग करावयाचा असल्यास दोन्ही बाजूच्या अंडवाहिनी कापतात.

परंतु या वीर्यत्वनाशक शस्त्रप्रयोगांत एक मोठा दोष असा आहे, कीं त्यामुळें स्त्री व पुरुष प्रजोत्पादनास कायमचीं असमर्थ होऊन बसतात. संततिनियमनासाठीं जो मार्ग आपणांस निश्चित करावयाचा आहे तो असा असला पाहिजे, कीं त्या मार्गामुळें पतिपत्नींस आपल्या इच्छेप्रमाणें गर्भाचा प्रतिबंध करतां आला पाहिजे, व सोयीप्रमाणें गर्भधारणेस मोकळीक ठेवतां आली पाहिजे. पण गर्भप्रतिबंधासाठीं शस्त्रक्रिया केल्यास तो प्रतिबंध इष्टकालपर्यंतच न होतां कायम जन्माचाच होऊन बसेल. एकदां शस्त्रक्रिया होऊन गेली म्हणजे पतिपत्नींस जर अपत्याची इच्छा झाली तर ती पुरी होणें सर्वस्वी अशक्य आहे. आणि असा कायमचा वांझपणा पतकरण्यास वृद्ध पतिपत्नींखेरीज दुसरें कोण तयार होईल ? एका अपत्यानंतर चार पांच वर्षेंच गर्भप्रतिबंध करणें अवश्य व इष्ट असतें. अगदीं दरिद्री कुटुंबाची गोष्ट सोडून दिली व मध्यम स्थितींतील सामान्य स्त्री-पुरुषांविषयीं बोलावयाचें असेल तर असेंच म्हटलें पाहिजे, कीं दर पांच वर्षांनीं स्त्रीच्या ठिकाणीं गर्भधारणा होणें इष्ट आहे. पण उपरि-निर्दिष्ट शस्त्रप्रयोग केल्यास संततिनियमन होण्याऐवजीं संततीची शक्यताच सर्वस्वी नष्ट होईल. या कारणानें शस्त्रप्रयोगाचा हा मार्ग त्याज्यच ठरतो.

आतां कांहीं तरी योजनेनें गर्भाशयमुख बंद करून टाकण्याच्या मार्गाचा विचार करूं.

पुरुषाच्या वीर्यांतील सूक्ष्मबीज गर्भाशयमुखांतून आंत शिरल्या-खेरीज त्यांपैकीं एक सूक्ष्मांडकापर्यंत पोंचेल व त्यांत शिरेल या गोष्टी

शक्य नाहींत, हें आम्ही मागेंच स्पष्ट केलें आहे. ही गोष्ट लक्षांत घेतली तर अशी कल्पना सहजच मनांत येते, कीं कशा तरी प्रकारें हें गर्भाशयाचें मुख किंवा द्वारच बंद केलें तर सूक्ष्मबीजांस त्यांत प्रवेश मिळणें अशक्य होऊन गर्भप्रतिबंध खात्रीनें करतां येईल. ही कल्पना उचलून अनेक लोकांनीं अनेक युक्त्या काढल्या आहेत. कोणी असें म्हणतात, कीं स्पंजाचा बोळा घेऊन तो नुसताच, किंवा त्यावर साबणाची पूड किंवा दुसरें कांहीं विनाशक द्रव्य फांसून, योनिमार्गांत सरकवून गर्भाशयमुखावर दाबून बसविला कीं कार्यभाग होतो. कोणी स्पंजाऐवजीं साधा कापूस किंवा दवाखान्यांत वापरतात तसला 'लिंट' नांवाचा कापूस वापरावा असें म्हणतात. जपानमध्यें एक प्रकारचा मऊ रेशमी कागद वापरतात तोही कांहीं लोक पसंत करतात. या सर्व उपायांचा उद्देश एकच. तो हा कीं गर्भाशयाचें मुख पुरें बंद करणें. पण यासाठीं रबराची बनविलेली अशी एक लहान 'टोपी' विकत मिळते तिनेंच हा उद्देश सर्वांत चांगल्या रीतीनें साध्य होतो असें आम्हांस वाटतें.


या 'टोपी'ला चेक पेसरी कॅप—Check Pessary Cap— असें म्हणतत. बाजारांत अनेक तऱ्हांच्या असल्या टोप्या विकत मिळतात. त्यांपैकीं दोन तऱ्हांचा आपण विचार केला म्हणजे पुरें आहे. बाकीच्या तऱ्हा म्हणजे यांपैकींच एखाद्या तऱ्हेची थोडी फार बदललेली आवृत्ति असते किंवा तसें नसेल तर ती वापरणेंच घातक असतें. आम्ही ज्या दोन महत्त्वाच्या तऱ्हा म्हणतों त्या दोहोंचीही बनावट करण्यांत गर्भाशयमुख बंद करण्याचाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवलेला आहे.

गर्भप्रतिबंधाच्या विषयांत ज्यांनीं आज कित्येक वर्षें मन घातलें आहे, व त्या विषयाचा ज्यांनीं आज अनेक वर्षें पुरस्कार व प्रचार मोठ्या जोरानें केला आहे अशा डॉ॰ मेरी स्टोप्स नांवाच्या एक विदुषी


इंग्लंडमध्यें आहेत. त्यांच्या मतें 'प्रो रेस' -Pro race—या नांवाची जी रबराची टोपी विकत मिळते ती सर्वांत चांगली. या टोपीचा आकार एखाद्या घुमटासारखा असतो. थंडीच्या दिवसांत आपण डोक्यावर पांढरी गवळी टोपी सरकवून बसवितो त्याप्रमाणें ही टोपी स्त्रीच्या गर्भाशयावर घातली कीं घट्ट बसते व गर्भाशयमुख बंद होतें. ही टोपी गर्भाशयावर बसविणें अगदीं सोपें आहे. हिची रचना समोरच्या पानावर दिलेल्या आकृतींत दर्शविल्याप्रमाणें असते:—

एखादी गांधी टोपी आपण दुमडून हातांत धरतों त्याप्रमाणें ही रबराची टोपी स्त्रीनें दुमडून आंगठा व तर्जनी यांच्या चिमटींत धरावी. नंतर उकिडवें बसून तिनें टोपी योनिमार्गांत सरकविल्यास ती सहज आंत जाईल. वाटल्यास थोडेसें व्हॅसलीन योनिमार्गास आधींच लावावें म्हणजे ती अगदीं सहजपणें आंत शिरेल. गर्भाशय बोटाला लागेपर्यंत टोपी आंत सरकवून मग तिची घडी उलगडावी आणि तिच्या पोकळींत गर्भाशयाचें टोंक राहील अशी ती बसवून गर्भाशयमुख उत्तम प्रकारें साफ झांकलें गेलें अशी खात्री करून घ्यावी. पुढें दिलेली आकृति पहावी म्हणजे ही टोपी कशी बसवावयाची त्याची अधिक स्पष्ट कल्पना येईल.


ही टोपी बसविण्यांत कांहींही कठीण नाहीं. कोणत्याही स्त्रीला ती अगदीं सहज घालतां येईल. तसेंच ती बाहेर काढून घेण्यांतही कांहीं अवघड नाहीं. स्त्रीनें तर्जनी आंत घालून तिच्या टोंकानें नुसती त्या टोपीची कड सरकविली कीं टोपी जागची हालेल व योनिमार्गांतून बाहेर काढतां येईल. असली टोपी विकत घ्यावयाची झाल्यास ती चांगली आहे किंवा नाहीं हें पाहणें व आपल्याला हवी त्या मापाचीच पाहून घेणें मात्र फार अगत्याचें आहे. याविषयीं डॉ० मेरी स्टोप्स यांनीं केलेल्या सर्व सूचना लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. त्या म्हणतात:—




प्रो रेस टोपी
( बाहेरील भाग )
[ पृष्ठ ८०




प्रो रेस टोपी
( आंतील भाग )
[ पृष्ठ ८०



डच पेसरी आंत घालण्यापूर्वी
दुमडण्याची रीत
[ पृष्ठ ८१

१. ज्या स्त्रीला टोपी वापरावयाची असेल तिच्या गर्भाशयावर बरोबर बसेल अशा मापाचीच टोपी घेणें अवश्य आहे. प्रो रेस टोपीचीं तीन निरनिराळीं मापें मिळतात. नं. १ किंवा नं. २ हीं मापेंच बहुतेक स्त्रियांना ठीक होतात. नं. ३ ची टोपी सर्वांत मोठी असते. एखाद्या स्त्रीला दोन तीन मुलें झालेलीं असलीं तरी बाळंतपणाच्या वेळीं तिच्या योनिमार्गावर किंवा गर्भाशयावर जर कांहीं फाजील ताण पडलेला नसेल तर तिला नं. ३ ची टोपी सैलच होईल. टोपीचा कोणता नंबर पाहिजे तें स्त्रीच्या एकंदर स्थूलपणावरून आणि तिला मुलें आहेत किंवा नाहींत व झालीं असल्यास किती झालीं आहेत त्यावरून ठरविलें पाहिजे.

२. कांहीं टोप्या बनवितांना त्यांच्या कडा पोकळ करून हवेनें फुगविलेल्या अशा असतात. पण त्यापेक्षां भरीव कड असलेल्या टोपीचा उपयोग करणेंच अधिक चांगलें.

३. घुमटाच्या आकाराचा असा जो टोपीचा भाग असतो तो जितका उंचट असेल तितका चांगला व त्याचें रबर अतिशय पातळ आणि सफाईदार असेल तर तें उत्तम.

परंतु डॉ॰ नार्मन हेअर यांस या प्रकारची टोपी पसंत नाहीं. ते दुसऱ्याच प्रकारची टोपी विशेष पसंत करितात. 'डच पेसरी'—Dutch Pessary—किंवा 'मेनसिंगा पेसरी'—Mensinga pessary—या नांवानें ती ओळखली जाते. ही रबराचीच बनविलेली असते. मुसलमान किंवा बोहरी लोक फेट्याच्या आंतल्या बाजूस जी एक वाटीसारखी बारीक टोपी घालतात तिच्यासारखी ही टोपी दिसावयास दिसते. गर्भाशयमुख बंद करून सूक्ष्मबीज गर्भाशयापासून अलग ठेवण्याच्या तत्त्वावरच या टोपीचीही बनावट केलेली आहे. पण प्रो रेस टोपीपेक्षां ही टोपी निराळ्याच रीतीनें गर्भाशयावर बसते. प्रो रेस टोपी बसविली, कीं तिच्या पोकळींत

गर्भाशयाचें तोंड राहतें. या टोपीचें असें नाहीं. हिची खोलगट पोकळ बाजू गर्भाशयाच्या उलट बाजूला करावयाची असते, व हिचा माथा गर्भाशयाकडे ठेवावयाचा असतो. म्हणजे ही नीट बसली कीं हिचा माथा गर्भाशयावर दाबून टेंकतो, खोलगट बाजू योनिमार्गाच्या द्वाराकडे रहाते आणि गर्भाशयाजवळचें जें योनिमार्गाचें मऊ आणि मांसल वर्तुलाकार तोंड असतें त्याच्या पकडींत टोपीचा कंगोरा घट्ट पकडला जातो. अशा प्रकारें टोपी बसली कीं पुरुषाचें वीर्य पलीकडे गर्भाशयमुखापर्यंत पोंचूं शकतच नाहीं. प्रो रेसप्रमाणेंच या जातीची टोपीही सहज घालतां काढतां येते. चाळीस मिलिमिटरपासून तों नव्वद मिलिमिटर परिघाचे या टोपीचे पुष्कळ नंबर आहेत. हा नंबर टोपीवर लिहिलेला असतो. ज्या स्त्रीला मुळींच मूल झालेलें नाहीं अशा स्त्रीस बहुधा पन्नास नंबरची टोपी चालते. दोन तीन मुलें झालेल्या स्त्रीला पंचावन नंबरची टोपी ठीक पडते. मग पुढें जसजशी अधिक संतति झालेली किंवा फार स्थूल देहाची स्त्री असेल त्या मानानें पंचावनाहून वरच्या मापाची टोपी तिनें वापरावी.

डॉ॰ मेरी स्टोप्स यांस या जातीची टोपी पसंत नाहीं. त्यांचा मुख्य आक्षेप असा आहे, कीं ही टोपी घट्ट जागच्या जागीं बसावयाची म्हणजे योनिमार्गाच्या मऊ पकडींत ती पक्की दाबून धरली गेली पाहिजे असें असल्यामुळें ही टोपी नेहमीं वापरणाऱ्या स्त्रीच्या योनिमार्गाच्या बाजूवर फाजील ताण पडण्याचा संभव आहे. तसेंच या टोपीच्या कंगोऱ्याच्या आंतल्या बाजूस धातूची तार असते तिच्यावरचें रबर एखादे वेळीं फाटल्यास त्या तारेचा धक्का योनिमार्गाच्या मांसास लागून तेथील तंतूस इजा होण्याचीही भीति आहे.

उलट डॉ॰ नॉर्मन हेअर यांस प्रो रेस टोपी पसंत नसून डच टोपीचीच ते शिफारस करतात. प्रो रेस टोपींत त्यांच्या मताप्रमाणें दोन मोठे दोष आहेत. (१) एक दोष असा, कीं

प्रो रेस टोपीचीं तीनच निरनिराळीं मापें विकत मिळतात. त्यामुळें कोणत्याही स्त्रीच्या गर्भाशयावर अगदीं ठीक बसेल असें नेमकें माप घेतां येत नाहीं. नं. २ च्या मापाची टोपी बहुतेक वापरण्यांत येते; परंतु कांहीं स्त्रियांस ती सैल व कांहींस ती घट्ट होण्याचा चांगलाच संभव आहे. (२) शिवाय, संभोगक्रियेच्या वेळीं पतिपत्नींची जी अनेकविध हालचाल होते तिच्यामुळें ही टोपी गर्भाशयावरून इकडे तिकडे सरकण्याचा संभव असतो, व अशी ती सरकली म्हणजे गर्भाशयमुख उघडें पडून सूक्ष्मबीजांचा गर्भाशयांत शिरकाव होणें कठीण नाहीं.

डॉ० मेरी स्टोप्स आणि डॉ० नॉर्मन हेअर या दोघांच्याही मताला सारखाच मान दिला पाहिजे. कारण दोघांनींही या विषयाचा सूक्ष्म दृष्टीनें, कळकळीनें आणि सप्रयोग विचार व अभ्यास केलेला आहे. या दोन अधिकारी व्यक्तींच्या मतांत अशी भिन्नता उत्पन्न झाली असतां अमकेंच मत ग्राह्य असें वाचकांस सांगणें सोपें नाहीं. डच जातीच्या टोपीमुळें योनिमार्गाच्या मांसल बाजूंवर फाजील ताण पडतो हा डॉ० स्टोप्स यांचा मुद्दा मननीय आहे; आणि उलट संभोगक्रियेच्या वेळीं प्रो रेस टोपी इकडे तिकडे सरकून गर्भाशयमुख उघडें पडण्याचा संभव आहे हें डॉ० नॉर्मन हेअर यांचें म्हणणेंही उपेक्षणीय नाहीं. म्हणून अमक्याच जातीची टोपी निःसंशय अधिक चांगली असें वाचकांस निक्षून सांगणें शक्य नाहीं. दोन्ही जातींच्या टोप्या काळजीपूर्वक वापरल्या असतां सारख्याच उपयुक्त ठरतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र या दोन जातींमध्यें तारतम्य ठरवावयाचेंच असेल तर आमचें स्वतःचें वैयक्तिक मत डच टोपीकडेच अधिक झुकतें इतकें आम्ही सांगतों. आणि याचें कारण इतकेंच, कीं गर्भाशयावरून प्रो रेस टोपी सरकण्याचा जो संभव आहे तो डच टोपीच्या बाबतींत मुळींच नसतो. गर्भाशयाच्या बरोबर

मापाची प्रो रेस टोपी मिळविणें अशक्यप्रायच असतें. परंतु, डच टोपीच्या बाबतींत योनिमार्गाच्या मापापेक्षां किंचित् अधिक परिघाची टोपी घेतली म्हणजे ती घट्ट बसेलच बसेल व ती जागेवरून सरकण्याचा यत्किंचितही संभव उरणार नाहीं. तथापि या दोन जातींपैकीं कोणत्या जातीची टोपी वापरावयाची तें ज्याचें त्यानें ठरवावें असेंच आम्ही शेवटीं म्हणतों. त्या दोन्ही जातींचे गुणदोष वाचकांपुढें मांडणें येवढेंच आम्ही आपलें काम समजतों.

कृत्रिम उपायांनीं गर्भप्रतिबंध करण्याच्या निरनिराळ्या प्रचलित पद्धतीसंबंधानें येथवर क्रमशः चर्चा झाली. या सर्व पद्धतींत टोपीचीच पद्धति अधिक उपयुक्त व परिणामकारक असल्याचें वाचकांस वरील विवेचनावरून कळलेंच असेल. परंतु या पद्धतीचाच फक्त अवलंब करण्यापेक्षां तिला दुसऱ्या एका पद्धतीची जोड दिल्यास परिणामाच्या दृष्टीनें आपणांस अधिक निर्भय राहतां येईल. वर बीजनाशक रसायनांच्या पद्धतीचें विवेचन करीत असतांना आम्ही असें म्हटल्याचें वाचकांस स्मरतच असेल, कीं त्या पद्धतीवरच फक्त अवलंबून राहण्यापेक्षां दुसऱ्या एखाद्या अधिक चांगल्या पद्धतीस पूरक म्हणून तिचा उपयोग करणेंच अधिक फलदायक होईल. ही पद्धति म्हणजेच टोपीची पद्धति होय. या टोपीच्या पद्धतीविषयीं डॉ० मेरी स्टोप्स यांचा इतका दृढ विश्वास आहे, कीं नुसती टोपी वापरल्यानें गर्भप्रतिबंध हमखास होईल असें त्या प्रतिपादतात. परंतु या बाबतींत एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही, कीं कोणत्याही जातीची टोपी वापरली तरी तिच्यामुळें फक्त गर्भाशयमुखच काय तें झांकलें जातें, आणि गर्भाशयाच्या आजूबाजूस वीर्य पडण्यास प्रतिबंध होत नाहीं. या वीर्यांतील सूक्ष्मबीजही नष्ट करण्याची आपण तजवीज केल्यास गर्भप्रतिबंधाची शक्यता सर्वस्वी नाहींशी होईल. निदान 'अधिकस्याधिकं फलम् ।' हा न्याय तरी तेथें

लागूं होईल हें खास. या दृष्टीनें रासायनिक द्रव्य आणि टोपी या दोन्ही गोष्टी वापरणें हा मार्ग सर्वांत उत्तम आणि खात्रीचा होय. सगळ्यांत चांगलें रासायनिक द्रव्य म्हणजे कोयनेलची केलेली वडी ( Quinine Pessary ) होय. या दुहेरी पद्धतीचा उपयोग करावयाचा झाल्यास:—

प्रथम टोपी (जर प्रो रेस जातीची टोपी असेल तर) गर्भाशयावर बसवावी, आणि मग कोयनेलची वडी आंत सरकवावी.

पण डच जातीची टोपी वापरावयाची असेल तर आधीं कोयनेलची वडी सरकवावी आणि नंतर टोपी बसवावी.

या दोन जातीच्या टोप्या निरनिराळ्या प्रकारें गर्भाशयावर बसत असल्यामुळें कोयनेलची वडी घालण्याच्या क्रमांत फरक करावा लागतो हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल.

या बाबतींत खालील सूचना महत्त्वाच्या आहेत:—

१. निजावयाच्या आधीं कोणत्याही सोयीच्या वेळीं पत्नीनें टोपी बसवून ठेवावी. प्रत्यक्ष संभोगाच्या आधीं पांच मिनिटें जरी वडी व टोपी घातली तरी हरकत नाहीं.

२. संभोगानंतर टोपी तात्काल काढूं नये. निदान सकाळपर्यंत ती त्या ठिकाणीं राहूं द्यावी. टोपी आंत असली तरी स्त्रीस कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाहीं.

३. सकाळीं टोपी काढल्यानंतर ती साबणाच्या पाण्यानें अत्यंत स्वच्छ धुवून काढावी.

४. टोपी धुतल्यानंतर वाटेल तेथें टाकूं नये. कोरडी टोपी बरेच दिवस बाजूला टाकून दिलेली असल्यास ती तशीच घेऊन वापरल्यास निकामी ठरेल. कारण तिला चिरा पडलेल्या असण्याची भीति आहे. उत्तम मार्ग म्हणजे कांचेची एक लहानशी झांकणाची बरणी घ्यावी

व तिच्यांत नेहमीं ताजें स्वच्छ पाणी भरण्याचा प्रघात ठेवून त्यांत टोपी नेहमीं ठेवावी. ती अशी ठेवल्यानें तिचें रबर उत्तम स्थितींत टिकतें.

९. केव्हांही टोपी बसविण्यापूर्वीं ती धड आहे किंवा नाहीं तें नीट तपासून पहावें.

ब्रह्मचर्याच्या साधनापेक्षां या कृत्रिम गर्भप्रतिबंधकांच्या साधनानें संततिनियमन खात्रीपूर्वक करतां येईल हें वरील विवेचनावरून वाचकांस पटलेंच असेल. शिवाय, दुसरी एक महत्त्वाची गोष्ट वाचकांच्या लक्षांत यावयास पाहिजे ती ही, कीं ब्रह्मचर्याचा मार्ग व्यवहार्य नाहीं, पण कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा हा उपाय असा आहे, कीं तो कोणत्याही सामान्य पतिपत्नींस अंमलांत आणण्यासारखा आहे.

मात्र असें असलें तरी कृत्रिम गर्भप्रतिबंधक साधनें वापरण्याचा उपदेश सरसकट सर्व समाजास जाहीरपणें करावा किंवा नाहीं याविषयीं दुमत होण्याचा संभव आहे. कृत्रिम गर्भप्रतिबंधकांविरुद्ध अनेक प्रकारचे आक्षेप घेण्यांत येतात व त्यांचा सर्वस्वी धिःकार करणारींही माणसें वारंवार भेटतात. हे आक्षेप कोणत्या स्वरूपाचे आहेत आणि त्यांत कितपत सत्यांश आहे त्याचा सविस्तर विचार केल्याखेरीज हा विषय पुरा होणार नाहीं. तो विचार पुढच्या प्रकरणांत करूं.

प्रकरण सातवें

# कृत्रिम उपायांचा धिःकार व पुरस्कार

कृत्रिम गर्भप्रतिबंधक उपायांची विस्तृत चर्चा आम्हीं मागील प्रकरणांत केली, आणि संततिनियमनार्थ ब्रह्मचर्याचें साधन व्यवहार्य नसल्यामुळें, कृत्रिम उपायांचा अवलंब करण्यांत समाजाच्या नीतीची किंवा आरोग्याची कांहीं विशेष हानि होण्यासारखी नसेल तर त्या उपायांचा पुरस्कार करावयास पाहिजे असेंही आम्ही त्या चर्चेंत सूचित केलें. अर्थात् कृत्रिम गर्भप्रतिबंधक उपाय योजिल्यानें समाजाचें कसलेंही नुकसान होणार नाहीं आणि धर्माचें किंवा नीतीचेंही उल्लंघन आपल्या हातून फारसें घडणार नाहीं, अशाविषयीं समाजांतील स्त्री-पुरुषांची खात्री पटविणें अवश्य आहे.

कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा मार्ग ज्यांस अश्लाघ्य वाटतो त्यांचें म्हणणें काय आहे तें आपण प्रथम शक्य तितक्या सविस्तरपणें पाहूं.

कृत्रिम गर्भप्रतिबंधकांवर एक मोठा आक्षेप असा आहे, कीं त्यांचा उपयोग करूं लागल्यानें संभोग आणि प्रजोत्पत्ति या दोन गोष्टी परस्पर भिन्न समजाव्या आणि प्रजोत्पत्तीची जबाबदारी अंगावर न घेतां संभोगसुख अनुभवावें ही कल्पना स्त्री-पुरुषांच्या मनांत अधिक दृढ होत जाईल. ज्या वेळीं आपल्या हातून प्रजा निर्माण व्हावी अशी स्त्री-पुरुषांची इच्छा असेल त्या वेळींच त्यांनीं आपल्या वीर्याचा किंवा बीजाचा उपयोग करावा हें चांगलें. प्रजोत्पत्ति होण्याचा संभव नसेल अशा वेळीं संभोगरत होणें, किंवा प्रजा उत्पन्न होऊं नये असा हेतु मनांत धरून संभोगसुख घेणें म्हणजे आपल्या ठिकाणच्या बीजाचा अपव्यय करण्यासारखें आहे. संभोगापासून मिळणाऱ्या सुखाचा तेवढा उपभोग घ्यावयाचा आणि

त्यामुळें उत्पन्न होणारी जबाबदारी मात्र टाळावयाची ही वृत्तिच अतिशय गर्हणीय आहे, आणि कृत्रिम गर्भप्रतिबंधकांच्या मुळाशीं ही वृत्तिच असल्यामुळें त्यांचा निषेध करणेंच उचित होय.

महात्मा गांधी यांनीं संततिनियमनाच्या प्रश्नावर आपले विचार प्रगट करतांना या मुद्यावरच विशेष जोर दिला असल्यामुळें याला बरेंच महत्त्व प्राप्त झालें आहे. हिंदुस्थानांतील स्त्री-पुरुषांनीं संततिनियमन केलें पाहिजे असें महात्मा गांधींनाही वाटतें. परंतु त्यांच्या मतें अल्प-प्रसविता साध्य करण्यासाठीं लोकांनीं कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा उपयोग करणें अत्यंत अनिष्ट आणि दुष्परिणामकारक असून ब्रह्मचर्याचें साधनच फलदायक आणि सर्वांत हितपरिणामी ठरेल. ब्रह्मचर्या-विषयींची ही कल्पना कितपत ग्राह्य आहे तें आपण पूर्वींच पाहिलें आहे. तेव्हां त्याविषयींची पुनरुक्ति येथें करण्याचें कारण नाहीं. पण कृत्रिम गर्भप्रतिबंधकांमुळें स्त्री-पुरुषांच्या मनांत बेजबाबदारीची दूषणीय वृत्ति रुजत जाईल या मुद्याचा मात्र येथें विचार केला पाहिजे. या बाबतींत महात्मा गांधींचे—व त्यांच्याप्रमाणें विचार करणाऱ्या इतर लोकांचेंही—असें म्हणणें आहे, कीं मनुष्यानें आपल्या प्रत्येक कृत्याचें चांगलें किंवा वाईट फळ भोगण्यास तयार असलें पाहिजे. कर्म मात्र करावयाचें आणि त्याचा परिणाम मात्र आप-णांस भोगावा लागूं नये अशी इच्छा करावयाची हें अक्षम्य पाप होय. पाश्चात्य देशांतील जे धर्माधिकारी कृत्रिम उपायांचा जोरानें निषेध करतात त्यांचें म्हणणें हेंच आहे, आणि 'यंग इंडिया' पत्राच्या ता. १२ मार्च १९२५ व ता. ७ एप्रिल १९२९ या दोन अंकांत महात्मा गांधींनीं जे दोन विस्तृत लेख लिहिले त्यांतही हीच विचारसरणी त्यांनीं पुढें मांडली होती. प्रजोत्पत्ति थांबवा-वयाची असेल तर पतिपत्नींनीं संभोगाचाच त्याग केला पाहिजे असा गांधींचा कटाक्ष आहे, आणि संभोगास उद्युक्त होणाऱ्या

स्त्री-पुरुषांनीं प्रजोत्पत्तीच्या जबाबदारीस आनंदानें तयार असलेंच पाहिजे असें त्यांस वाटतें. त्यांची एक ठराविक उपमा अशी आहे, कीं एखाद्या मनुष्यानें अधाशीपणानें आपल्याला पचेल त्यापेक्षां अधिक अन्न खाल्लें तर अजीर्णापासून उत्पन्न होणाऱ्या ज्वरादि विकारांच्या यातना सहन करण्यास त्यानें तयार असलेंच पाहिजे. अशी तयारी ठेवणें हाच त्याचा धर्म होय. उलट, खातांना भरपूर खावयाचें आणि मग त्या आहारामुळें उत्पन्न होणाऱ्या व्याधींचा प्रतिबंध करण्यासाठीं औषध घ्यावयाचें हें निंद्य होय. फाजील खाणारानें ताप सोसावयासही तयार असलें पाहिजे. तो ताप टाळूं पाहणें हें पाप होय. गांधींची ही उपमा कोणाला पटत असेल ती पटो. आम्हांस तरी ती अगदीं अप्रस्तुत आणि डळमळीत वाटते, आणि अशी उपमा गांधींनीं योजिली नसती तर त्यांच्या म्हणण्यांत अधिक तर्कशुद्धता राहिली असती असें आम्हांस वाटतें. माणसानें आपल्या अदमासा-बाहेर खाऊं नये हें कोणीही कबूल करील. पण कांहीं कारणानें तसें करणें त्याला भाग पडलें किंवा अविचारानें त्याच्या हातून तसें वर्तन घडलें तर त्या वर्तनामुळें आपल्या आरोग्यांत उत्पन्न होणारी विकृति टाळण्याऐवजीं त्यानें ती खुशाल उत्पन्न होऊं द्यावी हें म्हणणें कितपत सुविचाराचें ठरेल याविषयीं शंकाच आहे. शिवाय आहार, निद्रा व मैथुन हे सर्व व्यापार सारखेच निसर्गप्राप्त आहेत. मैथुनावर ब्रह्मचर्याचा आणि सारासार विचाराचा निर्बंध असला पाहिजे याविषयीं दुमत होणें शक्य नाहीं. परंतु हा निर्बंध पाळल्या-नंतरही त्यापासून उद्भवणाऱ्या परिणामांचें ओझें सहन करण्याची शक्ति अंगीं नसल्यास ते परिणाम घडूनच येणार नाहींत अशी योजना पतिपत्नींनीं केल्यास त्यांत त्यांचा गुन्हा तो काय झाला? शरीरधारणास आवश्यक असणारें दोन वेळचें जेवणही एखाद्या मनुष्यास पचेनासें झालें म्हणजे शक्य तितकें जेवण जेवावयाचें

आणि तें पचावें म्हणून जरूर तो व्यायाम करावयाचा आणि कांहीं पाचक औषधांचें सेवन करावयाचें अशा उपायाचीच शिफारस वैद्यकशास्त्रज्ञ लोक त्यास करतात ना? आणि त्या उपायानेंच शेवटीं त्यांचें हित झालेलें आपण पाहतों ना? मग त्या उपायाची योजना करणाऱ्या त्या माणसास पापी म्हणण्यांत कोणतें औचित्य उरलें? गव्हाची पोळी खावयाची असल्यास ती आंतड्याला न लागतां सहज पचावी आणि तिच्यांतील सात्त्विक अंश शरीराच्या पोषणास मिळावा म्हणून लोक त्या पोळीला बरेंचसें तूप लावून खातात. गांधींच्या तत्त्वाप्रमाणें अशा प्रकारें पोळीबरोबर तूप खाणें पापमयच ठरणार! कारण, नुसती पोळी पचत नसेल तर ती खाऊंच नये, आणि खावयाचीच असेल तर तशीच तुपाशिवाय खावी आणि तिच्या दुष्परिणामांचें दुःख भोगावें, हेंच गांधींच्या विचारसरणीशीं सुसंगत होईल. परंतु पोळीबरोबर तूप खाणाऱ्या मनुष्याच्या डोक्यावर पापी म्हणून शिक्का मारणें कितपत समंजसपणाचें होईल? आणि योग्य त्या निर्बंधांची अंमलबजावणी करूनही तशा परिमित संभोगामुळें हवें त्या प्रमाणांत संततिनियमन करतां येत नसल्यास कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा उपयोग करणारास दोषी ठरविणें तरी अधिक समंजसपणाचें होईल काय? कर्म केलें कीं त्याचीं फळें भोगण्यास माणसानें तयार असलें पाहिजे हा वेदान्त सांगावयास ठीक आहे. पण या वेदान्ताप्रमाणें खरोखरच वागावयाचें म्हटल्यास लोकांना काय काय करावें लागेल! चुकून विस्तवावर पाय पडला तरी त्यावर औषधी उपाय न करतां लंगड्या पायाच्या वेदना बरेच दिवस सोसाव्या लागतील, डोंगर चढून जाऊन पाय थकले तरी ते चेपून न घेतां त्यांचा शीण तसाच सहन करावा लागेल, एखाद्या खेळाचा सामना भर उन्हांत खेळणाऱ्या खेळगड्यास सूर्यतापनिवारणार्थ कोणतीही युक्ति न करतां तो तसाच सोसावा लागेल, तास दोन

तास कंठरवानें कीर्तन करणाराला किंवा जाहीर व्याख्यान देणाराला कंठशोष पडला तरी खडीसाखरेचा खडा तोंडांत ठेवतां येणार नाहीं, पावसांत काम करणाऱ्या माणसाला छत्री वापरतां येणार नाहीं, किंवा थंडींत प्रवास करणाऱ्या प्रवाशाला गरम कपडे घालावयाची परवानगी राहणार नाहीं. आमचीं हीं उदाहरणें वाचून वाचकांस कदाचित् असें वाटेल, कीं गर्भप्रतिबंधकें निषिद्ध ठरविणाऱ्यांची वृथा टर उडविण्यासाठीं आम्हीं त्यांची योजना केली आहे. पण वास्तविक तसें नाहीं. आणि वाचकांस तसें वाटत असल्यास त्याचें खरें कारण हेंच, कीं कर्मफल हें माणसानें भोगलेंच पाहिजे हें मूळ म्हणणेंच अतिशय हास्यास्पद आहे. आपण ज्या लोकांत राहतों तो कर्मलोक आहे व कर्म केल्याशिवाय आपणास गत्यंतर नाहीं याविषयीं शंका नाहीं. परंतु ही आपली भूमि कर्मभूमि आहे हें जितकें खरें तितकेंच या जगांत आपल्या हातून घडणाऱ्या कर्मापासून आपल्याला सुख तेवढें मिळावें आणि दुःख तेवढें टळावें असा प्रत्येक स्त्री-पुरुषाचा प्रयत्न चालला आहे आणि चालत राहील हेंही खरेंच आहे. हा प्रयत्न कितपत साध्य होतो किंवा होण्यासारखा आहे तो प्रश्न निराळा. पण तो साध्य होणार नाहीं असें क्षणभर गृहीत धरलें तरी फार तर त्यास असाध्य म्हणतां येईल. परंतु त्यास पापमय आणि निंद्य ठरविण्यांत कोणती सूज्ञता आहे ?

गर्भप्रतिबंधकांवरील दुसरा आक्षेप असा आहे कीं, त्यांचा उपयोग करणें हें धर्मनीतीच्या तत्त्वांच्या विरुद्ध आहे. हा आक्षेप जी मंडळी घेतात त्यांची समजूत अशी आहे, कीं जीवन हें अत्यंत पवित्र तत्त्व आहे आणि या जीवनतत्त्वाची हत्त्या ज्या ज्या गोष्टीं-मुळें होते त्या त्या सर्व गोष्टी अत्यंत दूषणीय आणि त्याज्यच समजल्या पाहिजेत. कृत्रिम गर्भप्रतिबंकांच्या उपयोगामुळें खरोखर जीवहत्त्या होत असेल तर हा आक्षेप अतिशय महत्त्वाचा

आहे यांत संशय नाहीं. जगांतील कोणताही धर्म घेतला आणि कोणत्याही देशांतील रूढ नीतीचा विचार केला तरी जीवहत्त्या ही निंद्यच ठरेल. वेदान्ताच्या मायावादाप्रमाणें किंवा निराशावादाच्या सदराखालीं येणाऱ्या कोणत्याही पाश्चात्य तत्त्वविचारपद्धतीप्रमाणें संसार असार असून जीवित हें केवळ भ्रममूलक आहे. परंतु असें असलें तरी या भ्रमाधिष्ठित जीविताची मुद्दाम हत्त्या करावी असा उपदेश श्रीशंकराचार्यांसारख्या वेदान्तप्रतिपादकाच्या कोणत्याही सूत्रांत किंवा पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांच्या कोणत्याही ग्रंथांत सांपडणार नाहीं. जीवहत्त्या ही केव्हांही निषिद्धच ठरेल आणि कृत्रिम गर्भप्रतिबंधकांमुळें जर जीवहत्त्या घडत असेल तर त्यांचा निषेध करणेंच योग्य होईल. परंतु कृत्रिम गर्भप्रतिबंधकांमुळें जीवाची हत्त्या होते किंवा काय हें मात्र नीट पाहिलें पाहिजे. आणि हें पाहूं लागलें म्हणजे मात्र प्रस्तुत आक्षेपांतील सर्व जोर एकदम नाहींसा होतो. कारण मागील प्रकरणांत कृत्रिम गर्भप्रतिबंधक उपायांच्या प्रकारांचें जें सविस्तर वर्णन आम्हीं केलें तें वाचकांच्या लक्षांत असेल तर ते उपाय केल्यानें जीवहत्त्या घडत नाहीं असें आम्हीं म्हटल्यास तें त्यांना चटकन पटेल. गर्भधारणा कशी होते तें आपण पूर्वीं एका प्रकरणांत पाहिलें आहे. त्यावरून स्त्रीच्या ठिकाणचें सूक्ष्मांडक आणि पुरुषाच्या वीर्यांतील एक सूक्ष्मबीज या दोहोंचें सम्मीलन झाल्याखेरीज गर्भाची घटना होत नाहीं हें आपणांस स्पष्टपणें दिसून आलें आहे. अर्थात् स्त्री-पुरुषांच्या वीर्याचें सम्मीलन झाल्यानंतर त्यापासून तयार होणाऱ्या गर्भाची हत्त्या जर गर्भप्रतिबंधकांमुळें होत असेल तरच त्यांच्यावर जीवहत्त्येचा आरोप करतां येईल. पण कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचें कार्य अशा स्वरूपाचें नाहीं. त्यांचें कार्य येवढेंच, कीं पुरुषाच्या वीर्यांतील सूक्ष्मबीजांस गर्भाशयापर्यंत पोंचूंच द्यावयाचें नाहीं, किंवा त्यांचा नाश करावयाचा. जोंपर्यंत पुरुषाच्या

सूक्ष्मबीजाचें स्त्रीच्या सूक्ष्मांडकाशीं सम्मीलन झालें नाहीं तोंपर्यंत त्यांस जीव ही संज्ञा देणें निखालस चुकीचें होय; आणि या सूक्ष्म-बीजांचा नाश करणाऱ्या गर्भप्रतिबंधकांच्या योगानें जीवहत्त्या घडते असें समजणेंही तितकेंच चुकीचें ठरेल. गर्भप्रतिबंधक उपायांमुळें गर्भास प्रतिबंध होतो, आधींच बनलेल्या गर्भाचा घात होत नाहीं हें केव्हांही विसरतां कामा नये. हे कृत्रिम उपाय गर्भ'प्रतिबंधक' आहेत, गर्भ'नाशक' किंवा गर्भ'घातक' नाहींत. अर्थात् जीवहत्त्येचा आरोप ठेवून गर्भप्रतिबंधकांस निषिद्ध ठरविणें म्हणजे बादरायण संबंध जोडून संन्याशास सुळीं देण्याच्या प्रकारापेक्षां कांहीं फारसें समंजसपणाचें ठरणार नाहीं.

यावर कांहीं आक्षेपक कदाचित् असें म्हणतील, कीं पुरुषाच्या वीर्यातील सूक्ष्मबीज 'जीव' या संज्ञेला कदाचित् पात्र नसतील, परंतु त्यांच्या ठिकाणीं जीवांश तरी आहे खास, व तो असल्यामुळें त्यांचा नाश करण्याची क्रियाही पापमयच ठरते. निदान इतकें तरी खचित, कीं या सूक्ष्मबीजांचें स्त्री-सूक्ष्मांडकाशीं सम्मीलन व्हावें अशी निसर्गाची योजना असून तें सम्मीलन या कृत्रिम उपायांमुळें आपण ज्या अर्थीं अशक्य करून टाकतों त्या अर्थीं ते उपाय निसर्गविरुद्ध आहेत व तसे असल्यामुळें ते निषिद्धच म्हटले पाहिजेत.

पण हा आक्षेप साधार केव्हां म्हणतां येईल? योनिमार्गांत पड-लेल्या सूक्ष्मबीजांपैकीं एकाचाही नाश होऊं नये, सगळे जसेच्या तसे राहून त्यांच्याकडून गर्भघटनेचें कार्य व्हावें अशी जर निसर्गा-ची योजना असेल, आणि त्या योजनेच्या विरुद्ध कृत्रिम गर्भ-प्रतिबंधकांचा परिणाम घडत असेल, तरच त्यांचा निसर्गविरुद्ध-त्वाच्या मुद्यावर निषेध करतां येईल. पण अशी स्थिति आहे काय? कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा उपयोग न करतां संभोगाची क्रिया नैसर्गिक रीतीनें ज्या वेळीं होते तेव्हां काय घडतें? गर्भधारणा

कशी होते त्याविषयीं मागें जें विवेचन आम्हीं केलें त्यावरून वाचकांच्या ध्यानांत हें आलेंच आहे, कीं पुरुषाच्या वीर्यपातांत हजारों सूक्ष्मबीज असतात. ते योनिमार्गांत पडल्यानंतर त्यांच्यापैकीं कांहीं गर्भाशयमुखावाटे आंत शिरतात आणि बाकीचे नाश पावतात. तसेंच गर्भाशयांत शिरलेल्या या सूक्ष्मबीजांपैकीं एकाचेंच क्वचित् प्रसंगीं स्त्रीच्या सूक्ष्मांडकाशीं सम्मीलन होतें व उरलेले सूक्ष्मबीज नष्ट होतात. म्हणजे गर्भाची घटना शेवटीं ज्या एका सूक्ष्मबीजाकडून होते तो वगळला तर पुरुषाच्या प्रत्येक वेळच्या वीर्यपातांतील सूक्ष्मबीज नेहमीं नष्ट होत असतात. त्यांचा नाश व्हावा अशी निसर्गाचीच योजना आहे. कोणत्याही प्रकारचें गर्भप्रतिबंधक द्रव्य वापरलें नाहीं तरी त्यांचा नाश होणारच. त्यांचा नाश ही निसर्गाची नेहमींची वहिवाट. त्यांच्यापैकीं एकाकडून स्त्रीसूक्ष्मांडक सुफलित होणें हा कधीं काळीं येणारा अपवादात्मक योग. हाही योग घडून येऊं नये इतकाच काय तो कृत्रिम गर्भप्रतिबंधक उपाय योजण्यांतील उद्देश. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे हे उपाय योजण्यांत निसर्गास असंमत अशी कांहीं कृति आपण करतों असें वाटावयाचें कांहींच कारण उरत नाहीं. कृत्रिम गर्भप्रतिबंधकांमुळें सूक्ष्मबीजांचा नाश होतो हें खरें; पण त्यांचा उपयोग केला नाहीं तर त्यांचा नाश टळतो असें थोडेंच आहे? कधीं काळीं सूक्ष्मांडकांशीं संलग्न होणाऱ्या एका अपवादात्मक सूक्ष्मबीजाची हत्त्या निसर्गाकडून होत नाहीं, व कृत्रिम गर्भप्रतिबंधकाच्या योगानें ती होते, येवढ्या गोष्टीच्या जोरावर त्यांचा धिःकार करणें समर्थनीय होणार नाहीं. कारण सूक्ष्मबीजांचा संहार हें तत्त्व एकदां निसर्गासिद्ध म्हणून मान्य केलें म्हणजे मग लक्षावधि सूक्ष्मबीजांचा नेहमीं होणारा नाश पुण्यमय, आणि सूक्ष्मांडकाशीं ज्याचें सम्मीलन वास्तविक व्हावयाचें त्याचा एकट्याचाच तेवढा नाश हत्येच्या पापानें भरलेला, असें कोणत्या

तर्कशास्त्रास धरून म्हणतां येईल ? सारांश, पुरुषवीर्यांतील सूक्ष्मबीजांचा—निदान बहुतेकांचा—नाश व्हावा अशी निसर्गाचीच नेहमींची व्यवस्था आहे ही गोष्ट एकदां ध्यानांत घेतली म्हणजे योनिमार्गांत पडणाऱ्या सूक्ष्मबीजांचा नाश करण्याकरितां योजलेल्या गर्भप्रतिबंधकांस पापमय किंवा निसर्गविरुद्ध असें म्हणण्यास जागाच उरत नाहीं.

कांहीं लोकांच्या दृष्टीनें कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा उपयोग करणें हें सदभिरुचीस सोडून असलेलें असें बीभत्सपणाचें अश्लील कृत्य होय. त्यांना वाटतें, कीं स्त्रियांनीं रासायनिक द्रव्यें किंवा रबराची टोपी वापरणें, किंवा पिचकारी घेणें किंवा तत्सदृश कोणतीही गोष्ट करणें म्हणजे स्त्रियांचें भूषण जो विनय किंवा लज्जा त्याचा त्याग करण्यासारखें आहे. अशा विनयविघातक गोष्टींपासून स्त्रिया अलिप्तच असल्या पाहिजेत आणि पुरुषांनींही त्यापासून दूर असावें हेंच बरें. संभोगकर्म हें अत्यंत पवित्र होय आणि एखाद्या मामुली गोष्टीप्रमाणें त्याची चिकित्सा करण्यानें सदभिरुचीस धक्का बसतो. या कर्माविषयीं स्पष्ट व उघड चर्चा करणें किंवा होऊं देणें केव्हांही श्लाघ्य नाहीं. निसर्गाच्या प्रवृत्तीप्रमाणेंच हें कर्म होऊं देण्यांतच सदभिरुचीचा माणूस समाधान मानील.

या आक्षेपाला उत्तर देणें एका दृष्टीनें फार सोपें आहे तर एका दृष्टीनें फार कठीण आहे. कारण सदभिरुचीची व्याख्या ज्या प्रकारची करावी त्या प्रकारावर हें उत्तर अवलंबून राहील. थंड वाऱ्याच्या लहानशा झुळकेनें वठून जाणारी एखाद्या लतेची पालवी असावी त्याप्रमाणें हळू प्रकृतीची ज्यांची सदभिरुचि असेल त्यांना कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा उपयोग तर राहिलाच पण नामनिर्देश देखील वावडा वाटणें साहजिक आहे, व अशा लोकांशीं कितीही वाद घातला तरी त्याचा उपयोग होईल व त्यांच्या सदभिरुचीची अढी

सेल होईल अशी आशा करणें व्यर्थ आहे. एखाद्या माणसाला उंच बांध्याच्या स्त्रीपेक्षां ठेंगणी स्त्री अधिक सुंदर वाटत असली तर वादविवाद करून त्याची रुचि बदलणें थोडेंच शक्य आहे? निरनिराळ्या लोकांच्या रुचि निरनिराळ्या असावयाच्या हें जसें खरें तसेंच सदभिरुचि कोणती याविषयींच्या लोकांच्या कल्पना वेगवेगळ्या असणार हेंही निसर्गसिद्धच होय.एकाला अमृतासमान वाटणारा पदार्थ दुसऱ्याला विषसमान वाटेल अशी इंग्रजींत एक म्हण आहे. त्याच न्यायास अनुसरून एकाची सदभिरुचि दुसऱ्याच्या दृष्टीनें अधम ठरेल असेंही आपणांस म्हणतां येईल. व्यवहारांत आपल्याला असा अनुभवही येतो. तत्त्वज्ञानविवेचक ग्रंथ वाचण्यांतच ज्याला आनंद होतो अशा माणसास कादंबरी हातांत धरणेंही सदभिरुचीच्या विरुद्ध वाटेल. जुन्या वळणाच्या वृद्ध माणसांना तरुणांचे केशकलाप आणि विलायती फॅशनचा पोषाक सदभिरुचीस सोडून वाटतो. जुन्या पिढींतल्या स्त्रियांना आजच्या तरुण सुशिक्षित मुलींचीं टांचेपर्यंत रुळणारीं लुगडीं आणि लांबलचक पदर सदभिरुचीशीं विसंगत वाटतात. सारांश, कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा उपयोग कांहीं लोकांना बीभत्सपणाचा वाटला तर उलट कांहीं लोकांना त्यांत अश्लील असें कांहींच वाटणार नाहीं. आधुनिक शास्त्रीय दृष्टीनें जी मंडळी सर्व गोष्टींचा विचार करतात त्यांना उलट असें वाटतें, कीं मनुष्यानें कोणतीही गोष्ट करावयाची ती अगोदर तिच्याविषयीं सर्व प्रकारची माहिती मिळवून व तिच्या संबंधींच्या प्रत्येक गोष्टीची पूर्ण चिकित्सा करून मगच केली पाहिजे. जेवणाच्या क्रियेपासून आपल्याला पूर्ण फायदा मिळावा अशी आपली इच्छा असेल तर आपल्या पचनेंद्रियाविषयीं आपण पुरें ज्ञान करून घेतलें पाहिजे आणि कोणतें अन्न किती पुष्टिदायक आहे त्याविषयींही यथास्थित चिकित्सा अगोदर केली पाहिजे. असें आपण केलें तरच तें खरें सशास्त्र भोजन होईल. जेवण्याप्रमाणेंच

बसणें, उठणें, चालणें, बोलणें या सर्व क्रिया सशास्त्र आणि डोळसपणें आपल्या हातून झाल्या पाहिजेत. ही विचारसरणी आज विसाव्या शतकांत बहुतेक लोकांना पटूं लागलेली आहे आणि या विचारसरणीप्रमाणें पाहिलें तर इंद्रियविषयक ज्ञानाची माहिती करून घेणें, आणि आपल्या मनाला पटलेल्या अशा कांहीं विशिष्ट हेतूंच्या साध्यतेसाठीं कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा उपयोग करणें यांत कसलाच बीभत्सपणा उरत नाहीं.

कधीं कधीं असें म्हणण्यांत येतें, कीं कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा उपयोग केल्यानें स्त्रीच्या शरीरास व विशेषतः स्त्रीच्या गर्भाशयास इजा होण्याचा संभव आहे. या आक्षेपाचा फार विस्तारानें विचार करण्याचें कारण नाहीं. कारण एक तर मागील प्रकरणांत ज्या गर्भप्रतिबंधकांची चर्चा आम्हीं केली त्यांची कल्पना काढणाऱ्या लोकांनीं या मुद्याचा विचार केलेला आहे, आणि स्त्रीच्या गर्भाशयास किंवा एकंदर शरीरास कोणत्याही प्रकारची इजा ज्यामुळें होणार नाहीं अशींच साधनें त्यांनीं शोधून काढलीं आहेत. शिवाय, या बाबतींत केवळ तर्कापेक्षां प्रत्यक्ष अनुभवाचा पुरावा अधिक महत्त्वाचा ठरेल, व तो पाहिला तर या आक्षेपास मुळींच आधार मिळत नाहीं. ज्या स्त्री-पुरुषांनीं कृत्रिम गर्भप्रतिबंधक साधनांचा—विशेषतः रबराची टोपी व कोयनेलची वडी या दुहेरी पद्धतीचा—उपयोग केला आहे त्यांपैकीं कोणाचाही अनुभव असा नाहीं कीं त्यामुळें स्त्रीच्या प्रकृतीवर किंवा गर्भाशयावर कांहीं दुष्परिणाम होतो. असें असतांना कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा वैद्यक दृष्ट्या निषेध केला पाहिजे असें प्रतिपादण्यांत काय अर्थ आहे?

आतां एकाच आक्षेपाचा विचार उरला. तो आक्षेप असा, कीं कृत्रिम गर्भप्रतिबंधकांची माहिती एकदां लोकांना झाली, कीं त्या माहितीचा उपयोग पतिपत्नीच करतील असें नव्हे तर धर्मनियमांचें

आणि नीतीचें उल्लंघन करून दुराचार करणाऱ्या वाममार्गी लोकांना आपल्या दुष्कृत्यांचे परिणाम टाळण्याचें एक अमोलिक साधन हातीं मिळाल्यासारखें होईल, व त्याचा फायदा घेऊन ते आपले दुराचार अधिक बेफिकिरीनें आणि अधिक विस्तृत प्रमाणावर करूं लागतील. इतकेंच नव्हे तर अनीतीनें वागून गर्भधारणा झाली असतां आपली बेअब्रू होऊन लोकांत उजळ माथ्यानें वावरण्याची सोय आपल्याला उरणार नाहीं या भीतीनें जे लोक आज दुराचारापासून विन्मुख रहात आहेत त्यांना कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचें ज्ञान झाल्यास त्यांच्या मनावरचें भीतीचें दडपण पार नाहींसें होईल आणि ते उच्छृंखलपणें वागावयास प्रारंभ करतील. अशा प्रकारें एकंदर समाजांत अनीति फार माजेल. पाश्चात्य देशांत ती माजलेली आपण पहातच आहोंत. इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांत गर्भप्रतिबंध करणाऱ्या साधनांची माहिती मोठ्या माणसांपासून तों लहान पोरासोरांपर्यंत झालेली आहे; आणि त्याचा परिणाम असा झाला आहे, कीं लग्नाची जबाबदारी अंगावर न घेतां संभोगसुखाचा उपभोग घेण्याची प्रवृत्ति बेसुमार वाढली आहे. कौमार्यावस्थेंत राहून चैन करण्याची नीच इच्छा बायकांच्या मनांत रुजत चालली आहे; विवाहित आयुष्य कंठण्यास कोणी तयार नाहीं अशी स्थिति येत चालली आहे; संसाराची घडी विस्कटल्यासारखी झाली आहे; आणि या सर्व गोष्टींचा समाजाच्या मानसिक व शारीरिक तेजावर घातुक परिणाम होत चालला आहे. पाश्चात्य देशांतील भ्रष्टाकाराच्या या उदाहरणावरून आपण बोध घेतला पाहिजे आणि कृत्रिम गर्भप्रतिबंधकांच्या ज्ञानाचे भावी दुष्परिणाम ओळखून त्या ज्ञानाच्या प्रसारास आपण वेळींच आळा घातला पाहिजे.

महात्मा गांधी यांच्या ज्या लेखांचा आम्ही वर एकदां उल्लेख केलेल्या लेखांत हा मुद्दाही प्रामुख्यानें पुढें मांडलेला आहे. कृत्रिम

गर्भप्रतिबंधकांच्या ज्ञानामुळें अनीतिमान लोकांची एक मोठी सोय झाल्यासारखी होईल व समाजांत अनेक प्रकारचे दुराचार माजतील अशी महात्मा गांधींना व त्यांच्या विचारसरणीच्या लोकांना भीति वाटते. पाश्चात्त्य देशांतही या भीतीमुळेंच कित्येक धर्मोपदेशक कृत्रिम गर्भप्रतिबंधकांच्या विरुद्ध जोराचा उपदेश करीत आहेत.

या आक्षेपांत कांहींच तथ्य नाहीं असें म्हणणें शक्य नाहीं. कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचें ज्ञान सर्वांना झाल्यास सर्वच लोक त्याचा सदुपयोग करतील अशी अपेक्षा करणें वेडेपणाचें होईल. वाममार्गी लोक आपल्या पापाचीं फळें चुकविण्यासाठीं या कृत्रिम साधनांचा उपयोग करतील हें संभवनीय आहे. परंतु हें सर्व खरें असलें तरी तेवढ्यावरून कृत्रिम गर्भप्रतिबंधकांवर एकदम कडक बहिष्कार पुकारला पाहिजे असें सिद्ध होईलसें वाटत नाहीं. कारण आज कृत्रिम गर्भ-प्रतिबंधक उपाय लोकांना माहित नाहींत म्हणून समाजांत कोणत्याही प्रकारचे दुराचार नाहींत असें आपल्याला म्हणतां येईल काय? विवाहित स्त्रियांचे परपुरुषांशीं संबंध, कुमारिकांच्या व्रताचा भंग, आणि विधवा स्त्रियांस पापाचरणामुळें प्राप्त झालेली पतितावस्था, हे सर्व निंद्य प्रकार आजही आपल्या समाजांत प्रत्यहीं दृष्टीस पडत आहेत. पापाचरणाची प्रवृत्ति आज लोकांमध्यें नाहीं आणि गर्भ-प्रतिबांधकांच्या या नव्या माहितीमुळें ती नवीन उत्पन्न होईल असें मुळींच नाहीं. कोणत्याही समाजांत पापी आणि व्यसनी माणसें हीं थोड्या बहुत प्रमाणांत असावयाचींच, व त्याप्रमाणें तीं हिंदुस्थानांत चालू घटकेलाही आहेत. नवीन गर्भप्रतिबंधक उपाय माहीत झाल्यामुळें तीं नवीन अस्तित्वांत येतील असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. उलट या बाबतींत असा एक विचार करण्यासारखा आहे, कीं हल्लीं जे स्त्री-पुरुष पापमार्गाचें आचरण करतात ते गर्भ-प्रतिबंधक इलाज योजतातच. पाश्चात्त्य शास्त्रज्ञांनीं काढलेले नवे

इलाज त्यांना ठाऊक नसले तरी इतर कोणत्या तरी इलाजांची त्यांनीं माहिती मिळविलेली असते. आर्यवैद्यकावरील कांहीं ग्रंथांत पुष्कळ गर्भप्रतिबंधक उपायांचें वर्णन केलेलें आहे. विशेषतः मोंगल बादशहांच्या कारकीर्दीच्या वेळीं या विषयाकडे वैद्य आणि हकीम यांचें लक्ष गेलें व त्यांनीं बऱ्याच योजना शोधून काढल्या, असें आम्हांस एका विद्वान् आयुर्वेदपारंगत विद्वानांनीं सांगितलें आहे. या योजना आज शेंकडों वर्षें वैद्य व हकीम लोकांना माहीत आहेत, आणि दुराचारी पुरुष त्यांच्यापासून ही माहिती मिळवितात आणि आपल्या पापकर्मावर पांघरूण घालतात. अशी स्थिति असतांना नव्या गर्भप्रतिबंधकांच्या पुरस्कारामुळें पापाचरण अधिक माजेल असें म्हणण्यांत काय अर्थ आहे? सध्यां ज्या गर्भप्रतिबंधकांचा उपयोग लोक करतात तीं स्त्री-पुरुषांच्या प्रकृतीला अत्यंत अपायकारक असतात. आज दुराचारी लोक अपत्यजन्माची आपत्ति गर्भप्रतिबंधापेक्षां गर्भ राहिल्यानंतर तो पाडण्याचे उपाय करूनच टाळतात. गर्भ राहिल्यानंतर तो पाडण्यासाठीं स्त्रीला अतिशय ऊष्ण पदार्थांचें सेवन करावें लागतें, आणि तिच्या आरोग्यावर त्याचा दुष्परिणाम हटकून होतो. शिवाय गर्भधारणेनंतर केलेला गर्भपात जीवहत्त्येच्या सदराखालीं येतो हें मागें एकदां आपण पाहिलेंच आहे. यावरून दोन गोष्टी उघड होतात. एक तर पापकर्मी लोक आजही आपल्या समाजांत आहेत; आणि दुसरें हें कीं हे लोक अपत्यसंभव टाळण्यासाठीं स्त्रीच्या आरोग्याचा नाश करणारीं औषधें वापरतात किंवा जीवहत्त्येसमान असलेल्या गर्भपाताच्या उपायाचें अवलंबन करतात. मग नवीन शास्त्रशुद्ध गर्भप्रतिबंधकांचें ज्ञान लोकांस करून दिल्यानें दुराचारी लोकांचा एक नवीन वर्ग निर्माण होईल असें कसें म्हणतां येईल? आणि त्याचप्रमाणें आरोग्यविघातक आणि जीवहत्त्यामय उपायांच्या ऐवजीं शास्त्रशुद्ध आणि जीवहत्त्येच्या पापापासून अलिप्त

असे उपाय दुराचरणी लोकांना ठाऊक झाले तर त्यांपासून अहित होईल असें म्हणणें तरी कितपत सयुक्तिक ठरेल ?

शिवाय एखादी गोष्ट बहुतांशीं हितकारक असतांना केवळ दुष्ट लोकांच्या हातून तिचा दुरुपयोग होण्याचा संभव आहे या एकाच शंकेनें ती सर्वस्वी त्याज्य ठरविणें युक्त होईल किंवा काय याचाही विचार केला पाहिजे. कृत्रिम गर्भप्रतिबंधकांमुळें स्त्री-पुरुषांच्या प्रकृतीस कोणत्याही प्रकारची इजा होण्यासारखी नाहीं, त्यांचा उपयोग करण्यांत धर्माच्या मूलतत्त्वांचें उल्लंघन होत नाहीं, आपल्याला जितक्या मुलांचें पालन पोषण उत्तम प्रकारें करतां येईल तितकींच मुलें आपल्या पोटीं यावींत अशी योजना त्यामुळें पतिपत्नींस करतां येते, आणि अशा प्रकारें संततिनियमन साध्य झाल्यामुळें सुप्रजा निर्माण होऊन देशाची आर्थिक, शारीरिक व मानसिक स्थिति झपाट्यानें सुधारते. या सर्व गोष्टी सिद्ध झाल्या असतां, केवळ गर्भप्रतिबंधकांच्या ज्ञानाचा दुरुपयोग करून पापी लोक वाटेल तसें स्वैराचरण करतील व समाजांत अनीति माजवितील येवढ्या सबबीवर तें ज्ञान सर्वथैव त्याज्य समजणें हटवादीपणाचें होईल. तसेंच म्हटलें तर अशी कोणती गोष्ट जगांत आहे, कीं तिचा दुरुपयोग होण्याचा संभव नाहीं ? प्रत्येक गोष्टीच्या सदुपयोगाप्रमाणें दुरुपयोगही नेहमीं शक्य असतोच. अन्न हें शरीराच्या संवर्धनास आवश्यक आणि मनुष्यास जीवनाचा लाभ करून देणारें आहे. त्याच्या हितकारित्वा-विषयीं वादच नाहीं. पण असें असूनही अधाशीपणानें अन्न पोटांत घालून अनेक लोक आपल्या आरोग्याचा नाश करून घेतातच कीं नाहीं ? म्हणून अधाशी लोक अन्नाचा दुरुपयोग करतील यासाठीं अन्नसेवनाचा प्रचारच बंद केला पाहिजे असें जर कोणी प्रतिपादन केलें तर तें कितपत समर्थनीय ठरेल ? पाणी, हवा, अग्नि या सर्व गोष्टी अशा आहेत कीं त्यांचा सदुपयोग किंवा दुरुपयोग करणें

*

सारखेंच शक्य आहे. अग्नीच्या साहाय्यानें स्वयंपाक तयार करून उत्तम भोजनाचा आस्वाद घेतां येईल किंवा आगगाडी चालवून शहरांशहरांतील दळणवळण सुलभ करतां येईल. परंतु त्याचप्रमाणें पेट्रोलच्या किंवा दारूच्या वखारीवर एक जळती काडी टाकून त्या वखारीची क्षणार्धांत राखरांगोळी करून टाकणेंही तितकेंच सोपें आहे. विजेच्या कारखान्याच्या साहाय्यानें साऱ्या शहरांत रोषनाई करून टाकणें आणि लोकांना नाना तऱ्हेच्या सुखसाधनांची प्राप्ति करून देणें शक्य आहे. पण त्याच कारखान्याची चावी एखाद्या दुष्टाच्या हातीं दिली तर निमिषार्धांत सारें शहर जाळून खाक करून टाकण्याची आपली चांडाळपणाची लहर पुरवून घेणें त्याला तितकेंच सहज साध्य आहे. पण असें असूनही अग्नि, विद्युत् यांसारख्या शक्ति वापरूं नयेत असें कोणी म्हणणार नाहीं, व कोणीं म्हटलें तरी तें कोणी ऐकणार नाहीं. त्याच न्यायानें कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा दुरुपयोग होण्याचा संभव असला तरी तेवढ्या एका दुष्परिणामाचा परिहार करण्याच्या हेतूनें त्यांच्या अनेक सुपरिणामांवर पाणी सोडणें फारसें इष्ट समजतां येणार नाहीं.

शिवाय, कोणतीही नवी गोष्ट प्रथम प्रचारांत आली कीं तिचे जे दुष्परिणाम ताबडतोब दिसून येऊं लागतात त्यांस भिऊन जाण्याचें कारण नसतें. कारण कालांतरानें ती गोष्ट रूढ होऊन तिच्यांतील नाविन्य नाहींसें झालें कीं ते दुष्परिणाम हळुहळू नाहींसे होतात व तिचे सुपरिणाम तेवढे शिल्लक राहतात. इंग्रजी शिक्षण हिंदुस्थानांत प्रथम सुरू झालें तेव्हां तें घेणाऱ्या तरुणांच्या ठिकाणीं व्यसनमग्नता, उच्छृंखलपणा, स्वाभिमानशून्यता इत्यादि दुर्गुणांचा प्रादुर्भाव झालेला लोकांना दिसला, आणि इंग्रजी शिक्षणामुळें मुलें बिघडतात अशी लोकांची समजूत होण्यापर्यंत पाळी आली. पण कालांतरानें एखाद्या झऱ्यावरील शेवाळें हलके हलके निघून जाऊन

त्याचें पाणी निवळावें त्याप्रमाणें इंग्रजी शिक्षण घेतलेल्या लोकांकडून देशोद्धाराच्या कामाचा पाया घातला गेला, आणि त्या शिक्षणाच्या दुष्परिणामाऐवजीं सुपरिणामच लोकांना पटूं लागले. स्त्री-शिक्षणाच्या इतिहासांतही हीच गोष्ट प्रत्ययाला आली; आणि विधवाविवाहाच्या नव्या सुधारणेच्या बाबतींतही याच गष्टिाचा अनुभव येईल असें म्हणावयास हरकत नाहीं?

कृत्रिम गर्भप्रतिबंधकांवर कोणकोणते आक्षेप येण्यासारखे आहेत, व उलट त्यांचें समर्थन कसें करतां येईल तें आम्हीं येथपर्यंत दाखविलें. परंतु पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष या दोहोंचीही मांडणी सारख्याच जोरानें आम्हीं केलेली पाहून वाचकांचें समाधान होणार नाहीं व ते कदाचित् विचारतील, कीं वादाच्या दृष्टीनें दोन्ही बाजूंचें विवेचन परिपूर्ण झालें हें खरें; परंतु कृत्रिम गर्भप्रतिबंधकांच्या बाबतींत शेवटीं कोणता सिद्धान्त ग्राह्य मानावा, आणि लोकांनीं कशा प्रकारची वृत्ति ठेवावी?

या प्रश्नाचें निश्चित उत्तर देणें कठीण आहे. सुप्रजाजननाची आज आपल्या देशांत पराकाष्ठेची आवश्यकता आहे आणि त्या दृष्टीनें आपल्या देशांतील लोकांनीं संततिनियमन करणें अत्यंत अगत्याचें आहे. त्याचप्रमाणें संततिनियमन साध्य करावयासाठीं ब्रह्मचर्याच्या मार्गाची सर्व लोकांस शिफारस करणें व्यवहार्य होणार नाहीं हेंही आपण पाहिलें आहे. असें असल्यामुळें कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा पुरस्कार करणें हा एकच मार्ग शिल्लक उरतो; आणि त्या मार्गाच्या आचरणाचे परिणाम फारच आक्षेपार्ह नसले तर तो मार्ग लोकांस दाखविण्यास हरकत दिसत नाहीं. पण उलट, हा मार्ग व्यवहार्य ठरला तरी त्याचें ज्ञान समाजांतील वाटेल त्या स्त्री-पुरुषांस आणि लहान थोरांस बिनहरकत खुशाल करून द्यावें किंवा काय हा प्रश्न कांहीं कमी महत्त्वाचा नाहीं. कृत्रिम गर्भप्रतिबंधकांची

माहिती सर्व लोकांस झाल्यानें अनाचार माजण्याचा संभव असला तरी तेवढ्या भीतीनें ती माहिती अजीबात कोणालाच होऊं देऊं नये असें म्हणणें निरर्थक होईल हें खरें. पण हे अनाचारही टळतील असें कांहीं धोरण ठेवून ती माहिती लोकांस करून देणें शक्य असेल तर सोन्याहून पिवळें होईल यांतही कांहीं शंका नाहीं.

अशा परिस्थितींत उत्तम मार्ग हाच दिसतो, कीं पतिपत्नींस कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचें ज्ञान असावयास हरकत नसावी, परंतु संभोगाच्या बाबतींत मनःपूत आचरण करावयाची एक चांगली सोय या दृष्टीनें गर्भप्रतिबंधकांकडे पाहण्याची प्रवृत्ति त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होणार नाहीं अशी तजवीज करण्याचा प्रयत्न करावा. पतिपत्नींचीं मनें अधिक सुसंस्कृत केल्यास ही गोष्ट साध्य होईल. कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा उपयोग पतिपत्नींनीं केल्यास तें दूषणास्पद मानलें जाऊं नये. पण ब्रह्मचर्याचें महत्त्वही त्यांच्या मनावर पूर्णपणें ठसलेलें असावें, आणि परिमित संभोग करण्याची संवय त्यांनीं स्वतःस लावून घ्यावी. ब्रह्मचर्याचा आणि संयमनाचा उपदेश समाजांतील स्त्री-पुरुषांस अतिशय मोठ्या प्रमाणावर करण्यांत यावा. विवाहाखेरीज वैधव्यावस्थेंत किंवा विधुरावस्थेंत संभोगाचा उपभोग घेण्याचा कोणासही अधिकार नाहीं, आणि तो घेणें हें भयंकर पाप असून त्या पापामुळें व्यक्ति, कुटुंब आणि राष्ट्र या सर्वांची हानि झाल्यावांचून राहणार नाहीं ही कल्पना समाजांतील प्रत्येक लहान मोठ्या माणसाच्या मनांत दृढ बिंबलेली असावी. विवाहित अवस्थेंतदेखील संभोगाचा अनुभव स्वैरपणें घेण्यापासून आपलें कल्याण होणार नाहीं असें पतिपत्नींना मनापासून वाटलें पाहिजे. विवाह म्हणजे संभोगविषयक अत्याचारांचा परवाना, असला कुविचार त्यांच्या मनाला स्वप्नांतही शिवतां कामा नये. संतति-नियमनाचें साधन या दृष्टीनें ब्रह्मचर्यास महत्त्व नसलें तरी आरोग्य-

रक्षण आणि तेजसंवर्धन करण्याचें साधन या दृष्टीनें ब्रह्मचर्याची महति अमर्याद आहे याविषयीं त्यांच्या मनांत पूर्ण श्रद्धा असली पाहिजे. गृहस्थाश्रमी स्त्री-पुरुषांसही ब्रह्मचर्यव्रताचें परिपालन करतां येतें हें त्यांस समजलें पाहिजे. सारांश, पतिपत्नींच्या मनोवृत्तींना असें शुद्ध आणि पुण्यशील वळण लावलें पाहिजे, कीं संतति-नियमनासाठीं कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा उपयोग त्यांनीं केला तरी ब्रह्मचर्याचें आचरणही त्यांच्या हातून सहज आणि मनापासून व्हावें.

शिवाय, कृत्रिम गर्भप्रतिबंधक उपायांचें ज्ञान लोकांना करून देतांना त्याचा दुरुपयोग होणार नाहीं अशी सक्त खबरदारी घ्यावी. तें ज्ञान केवळ पतिपत्नींसच मिळेल आणि ब्रह्मचाऱ्यांस किंवा कुमारिकांस मिळणारच नाहीं अशी योजना करतां आल्यास उत्तम. पण ती करणें फारच कठीण आहे. कारण त्या उपायांचें ज्ञान पुस्तकांच्या द्वारें एकदां उघड केल्यानंतर तीं पुस्तकें फक्त प्रौढ पतिपत्नींच्याच हातीं पडतील अशी व्यवस्था करणें अशक्य नसलें तरी दुष्कर आहे खास. आजचा काल असा आहे, कीं छापखान्याच्या ठशावाटे एखादी गोष्ट बाहेर पडली, कीं ती अमक्यानेंच पहावी आणि तमक्यानेंच वाचावी असलें नियंत्रण घालण्याचें मनांत आणणें वेडेपणाचें ठरेल. ज्या वेदांचा शब्द प्राचीन काळीं, किंवा अगदीं नुक्ता पन्नास वर्षांपूर्वींसुद्धां, ब्राह्मणांखेरीज इतर कोणाच्या कांनीं कधींही पडत नव्हता, त्या वेदांचीं छापील पुस्तकें होऊन महारां-मांगांसही आणि बायका-पोरांसही वाटल्यास त्यांचें श्रवणच नव्हे तर पठणही करतां येत आहे, असा आजचा काळ आहे. तेव्हां अशा काळांत कृत्रिम गर्भप्रतिबंधकांची चर्चा कांहीं विशिष्ट व्यक्तींच्याच कांनीं पडेल आणि इतरांस तिचा ध्वनि ऐकूं जाणार नाहीं असें करणें अशक्यप्राय आहे. म्हणून तसा प्रयत्न करण्याऐवजीं कृत्रिम गर्भप्रतिबंधकांच्या ज्ञानाचा दुरुपयोग होऊं न देण्यासाठीं

दुसराच एक उपाय योजावा. तो हा कीं, कृत्रिम गर्भप्रतिबंधकांचा उपयोग पापकर्मासाठीं करण्याची इच्छाच लोकांस होणार नाहीं असें सुशिक्षण लोकांस द्यावें. लोकांचीं मनें सुसंस्कृत आणि सुशिक्षित करण्याचा मार्गच या बाबतींत सर्वांत अधिक परिणामकारक ठरेल. कायद्याच्या सक्तीचा उपयोग करूनही ही गोष्ट साध्य करूं पाहणें हानिकारकच होईल. कायद्याच्या भीतीनें लोक अनीतीच्या मार्गापासून दूर कधींच रहात नाहींत. तसा कायदा असला म्हणजे त्या कायद्याला बगल मारून आपले हेतू कसे साध्य करतां येतील हा विचार करण्यांतच लोक आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करूं लागतात. क्रियेमुळें प्रतिक्रिया व्हावी त्याप्रमाणें लोकांना कायद्याचा धाक दाखविला, कीं त्या धाकानें त्यांच्या मनांतील पापाचरणाची इच्छा नाहींशी होण्याऐवजीं तिची गुप्तपणानें पूर्तता करण्याची प्रवृत्तिच त्यांच्या ठिकाणीं अधिक बळावते. कृत्रिम गर्भप्रतिबंधकांसंबंधीं कोणत्याही प्रकारचा कायदा करण्यापेक्षां सुप्रजाजननाच्या महत्त्वाविषयींच्या कल्पना शिक्षणाच्या द्वारें लोकांच्या मनावर बिंबविणेंच अधिक श्रेयस्कर होय असेंच गाल्टन, हेव्हलॉक एलिस वगैरे पाश्चात्त्य विद्वानांचें मत आहे. एलन काय या विदुषीचें मत तर कायदेशीर सक्तीच्या अतिशय विरुद्ध आहे. प्रीतिविवाहाची मोकळीक सर्व स्त्री-पुरुषांस पूर्णपणें असावी असें प्रतिपादन करतांना, प्रेमामुळें बहकून जाऊन आपण स्वतः प्रजोत्पादनास सर्वस्वी कुपात्र आहोंत असें धडधडीत दिसत असूनही कांहीं अविचारी स्त्री-पुरुष विवाह करतील व मग त्यांच्या विवाहाचे दुष्परिणाम समाजास भोगावे लागतील, ही शंका एलन काय यांस साहजिकपणेंच आडवी आली; परंतु या शंकेचें समाधान करतांना एलन काय स्पष्टपणें लिहितात, कीं कुपात्र स्त्री-पुरुषांच्या विवाहास कायदेशीर बंदी करणें मुळींच इष्ट नाहीं. त्यापेक्षां अधिक परिणामकारक उपाय हाच, कीं आपल्या प्रेमाचे समाजावर अनिष्ट

परिणाम होतील असा संभव दिसत असल्यास, विवाह करून समाजाचा घात करण्यापेक्षां समाजाच्या कल्याणासाठीं विवाहसौख्यावर पाणी सोडण्यास स्त्री-पुरुष तयार होतील, असें सुसंस्कृतीचें वळण त्यांच्या मनास सुशिक्षणानें लावलें पाहिजे.

एलन काय यांचे हे विचार कृत्रिम गर्भप्रतिबंधकांच्या प्रश्नासही लागू पडतात. गर्भप्रतिबंधकांच्या ज्ञानापासून अप्रौढ स्त्री-पुरुषांस अलिप्त ठेवण्यासाठीं कायदेशीर सक्ति करणें इष्ट व्हावयाचें नाहीं. अशा बाबतींत सक्तीपेक्षां व्यक्तीची खुषीच अधिक सुपरिणामी ठरते. म्हणून गर्भप्रतिबंधकांचें ज्ञान मिळालें तरी त्याचा दुरुपयोग करण्याची बुद्धि कोणास सुचणार नाहीं असें करण्यासाठीं सुप्रजाजननविषयक शिक्षणच सर्व लोकांस इतक्या मोठ्या प्रमाणावर दिलें पाहिजे, कीं एकंदर समाजाच्या कल्याणाची जबाबदारी आपल्यावर आहे याची जाणीव प्रत्येक व्यक्तीस अहर्निश राहील. हें शिक्षण कशा स्वरूपाचें असावें त्याचें सविस्तर विवेचन या ठिकाणीं करणें सोयीचें होणार नाहीं. गर्भप्रतिबंधकांमुळें समाजांत जे अनाचार माजतील अशी एक कल्पना आहे ती खरी धरली तरी त्या अनाचारांचा प्रतिबंध करण्याचा एक मार्ग कसा संभवतो तें सुचविण्यासाठीं केवळ या मुद्याचा उल्लेख करावासा वाटला. तेवढा करून हा विषय येथेंच पुरा करणें उचित होईल.

**All about Birth Control in a nutshell.**

# BIRTH-CONTROL

BY

Prof. N. S. PHADKE, M.A.

***2nd Revised Edition***

PRICE AS. 8.

*Can be had of :—*

(1) The author C/o Vijaya Press, Poona.
(2) Taraporewalla & Sons., Bombay.
(3) Other Book-Sellers.

# आमचेकडे मिळणारीं पुस्तकें.

मोठमोठे वाङ्मयभक्त व रसिक विद्वान् आणि पत्रकार यांनीं मुक्तकंठानें स्तुति केलेलीं सर्वमान्य व संग्राह्य पुस्तकें.

१ टेरेन्स् मॅक्स्विनी ( सचित्र चरित्र ) किं. १- ०-०
२ डी व्हॅलेरा ( सचित्र चरित्र ) किं. १- ४-०
३ कुलाब्याची दांडी ( सचित्र सामाजिक स्वतंत्र कादंबरी ) किं. १-१२-०

हीं तीन पुस्तकें "विजय साहित्य" संस्थेचीं असून १२ आणे प्रवेश फी भरून कायम ग्राहक होणारास प्रत्येक पुस्तक **पाउणपट किंमतीस मिळतें.**

| | |
|---|---|
| १ कांहीं तरी ( काव्यग्रंथ ) [ गोखले ] | ... १- ०-० |
| २ नेपोलियन बोनापार्ट चरित्र [ भावे ] | ... २- ०-० |
| ३ दादाभाई नौरोजी चरित्र [ फडके ] | ... १- ४-० |
| ४ दोष कोणाचा ( कादंबरी ) [ चिपळूणकर ] | ... १- ८-० |
| ५ स्वातंत्र्यदीप ( राजकीय ) | ... ०- ६-० |
| ६ विक्रम चरित्र ( पोथी ) | ... ०- ८-० |
| ७ संगीत अहंकार नाटक [ कोराने ] | ... ०-१२-० |
| ८ सुंदर मठ ( नाटक ) [ दीक्षित ] | ... १- ०-० |
| ९ राजाचें बंड ( नाटक ) [ कारखानीस ] | ... १- ०-० |
| १० सं. स्थानिक-स्वराज्य ( नाटक ) [ विनोदकर्ते ] | ... ०-१२-० |
| 11 Birth Control [Phadke] | .... 0- 8-0 |
| १२ लो० टिळकांचें ओवीबद्ध चरित्र ( पोथी ) | ... ०- १-० |

**विजय-साहित्य**, ५७० शनवार पेठ, पुणें शहर.